म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

वर्ष ३ रें

# सम्राटांचा सारिपाट

— लेखक —

शांताराम गणेश वरटीकर

प्रकाशन–स्थल
"नवयुगमाला" कार्यालय, पुणें

REFBK-0004082

१

ग्लेज प्रत किं. १२ आणे )*( रफ प्रत किं. ८ आणे

ॐ

# सम्राटांचा सारिपाट

— लेखक —

शांताराम [illegible] [illegible]

REFBK-0004082

शके १८५२ सन १९३०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

प्रकाशन–स्थल

“ नवयुगमाला ” कार्यालय, पुणे

ग्लेज प्रत किं. १२ आणे) (रफ प्रत किं. ८ आणे

# प्रस्तावना

ज्याप्रमाणें एखाद्या समाजामध्यें नवखा मनुष्य आला म्हणजे त्याची कोणीतरी ओळख करून देण्याचा शिष्टाचार आहे, त्याप्रमाणें .. ...................नवीन ग्रंथकारानें वाङ्मयक्षेत्रांत प्रथम पाऊल टाकावयाचा प्रयत्न केला म्हणजे त्याची व त्याच्या प्रथम अपत्याची समाजास ओळख करून देण्याकरितां कोणीतरी मध्यस्थ लागतो. हें मध्यस्थाचें काम मी करावें अशी नवयुग मालेचे उत्साहि कार्यकर्ते रा. भुस्कुटे यांनीं विनंति केल्यावरून प्रस्तुत पुस्तकास प्रस्तावना लिहून ग्रंथकाराची व ग्रंथाची ओळख करून देण्याचें कार्य मी अंगावर घेतलें आहे. रा. शां. ग. वरटीकर हे नवीन तरुण व होतकरू लेखक असून महाराष्ट्रांतील वाचकांचें त्यांनीं आपल्या निरनिराळया मासिकांत लिहिलेल्या लेखांनीं आधींच लक्ष वेधून घेतलें आहे. प्रस्तुत पुस्तक हें जरी त्यांचा ग्रंथलेखनाचा प्रथमच प्रयत्न आहे, तरी त्यांतील तडफदार व ओजस्वी भाषा व त्यांतील विविध ग्रंथांतील अत्यंत उद्बोधक व अन्वर्थक अशीं अनेक प्रकारचीं अवतरणें यांवरून त्यांचें अनेक ग्रंथांचें खोल परिशीलन व वाचनाचा दांडगा व्यासंग चांगलाच व्यक्त होतो. महाराष्ट्र-वाङ्मयमंदिरांत जरी ते प्रथमच प्रवेश करीत असल्यामुळें त्यांना थोडी भीड वाटत असली तरी, या प्रथम प्रवेशांतच त्यांचें जें स्वागत-सहृदय वाचकवर्गाकडून होईल अशी आमची खात्री आहे— त्यावरून त्यांस शुभशकूनच होऊन पुढें अधिकाधिक कार्य करण्यास

उत्साह मिळेल व वाचकवर्ग त्यांच्या अशाच आणखी प्रयत्नांची मार्ग प्रतीक्षा करीत राहील अशी आशा करण्यास पूर्ण जागा आहे.

प्रस्तुतच्या बिकट व निराशामय परिस्थितींत अशा तेजस्वी व कर्तव्यबोधक वाङ्मयाची अत्यंत आवश्यकता आहे व ग्रंथकारांनीं प्रस्तुत पुस्तक अगदीं योग्य वेळीं लिहिल्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. ग्रंथ जरी आटोपशीर लिहिलेला असला तरी त्यामध्यें निरनिराळ्या प्रश्नांची थोडक्यांत पण सोपपत्तिक व सोदाहरण मांडणी केल्यामुळें वाचकाला विषयाचें आकलन सुलभतेनें व स्वल्पतेनें करितां येतें. शिवाय ग्रंथकारानें निरनिराळया मान्य अशा ग्रंथकारांचीं व ग्रंथांचीं साक्ष अवतरणरूपानें दिल्यामुळें विवेचन परिणामकारी व खात्री पटविण्यासारखें झालें आहे. एकंदर विषयाची मांडणीहि अशा स्वरूपांत केली आहे कीं, एकांतून दुसरा सहज निघाल्याप्रमाणें वाटून वाचकाचें मन सारखें आकर्षून शेवटपर्यंत खेंचीत नेईल.

प्रथम मानवीजीविताचें स्वरूप थोडक्यांत पुढें मांडून स्वतः आपण आत्मपरीक्षण करून स्वतःचे गुण, दोष, कर्तव्यकर्म यांचा विचार केल्याशिवाय आपल्या हातून कोणतेंहि कार्य व्हावयाचें नाहीं, हें दुसऱ्या प्रकरणांत विषद केलें आहे; नंतर पुरुषार्थाचें जें मुख्य साधन शरीर तें सुदृढ केल्याशिवाय मानवानें कोणतेंहि कार्य करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणें व्यर्थ आहे हें जाणून तें सुदृढ करण्याकरितां योजावयाचीं जीं साधनें, व्यायाम, शुद्ध हवा, शुचिर्भूतता, निर्व्यसनता, विषयत्याग, खेळ इत्यादिकांचें थोडक्यांत चटकदार रीतीनें दिग्दर्शन केलें आहे. नंतर कोणत्याहि कार्यास भगवंताचें अधिष्ठान पाहिजे ही गोष्ट ध्यानांत

आणून ईश्वरोपासनेचें महत्त्व दाखविलें आहे. नंतर प्रस्तुत हिंदुसमाज व धर्म यांचें निरीक्षण करून धर्माच्या पायावर आपल्या कार्याची उभारणी केली पाहिजे हें स्पष्ट केलें आहे. तसेंच आपलें आयुष्य आपलें कर्तव्यकर्म करण्यांत खर्च व्हावें, त्यांतील एकहि क्षण वाया जाऊं नये व उद्योग करून कालावर जय मिळवावा ही यशाची खरी गुरुकिल्ली आहे. हें विशद केलें आहे. तसेंच कार्यकर्त्यानें दुसऱ्यावर अवलंबून न राहतां स्वतःच कष्टत गेलें पाहिजे व स्वावलंबनाच्या आधारानें सर्व सिद्धी हस्तगत केल्या पाहिजेत. हें तत्त्व मनावर बिंबवून घेतल्याशिवाय कार्यसिद्धीची अपेक्षा करूं नये, ही गोष्ट ध्यानांत ठेवून आयुष्यांतील आपल्या भोंवतीं असणारे आपले आप्त, स्नेही, आयुष्यांत येणारे मोहाचे प्रसंग इत्यादी आनुषंगिक गोष्टी त्या संबंधींहि आपण कशी दक्षता बाळगली पाहिजे, हें पुढील प्रकरणांत थोडक्यांत दिग्दर्शित करून तरुणांना आपल्या आयुष्याचा मार्ग आक्रमण करण्याची दिशा एकंदरींत योग्य प्रकारें दाखविली आहे. या एकंदर विवेचनावरून हें पुस्तक नवीन पिढीस इष्टमार्गदर्शक होईल यांत संशय नाहीं. अशा तऱ्हेचे ग्रंथ सध्याच्या काळीं जितके तयार होतील तितके पाहिजे आहेत व विद्यालयीन संस्था वगैरे अशीं पुस्तकें आपल्या छात्रगणांच्या हातीं वाचनाकरितां किंवा बक्षिस वगैरे देऊन त्याचा जितका प्रसार करतील तितका थोडाच आहे.


प्रस्तुत लेखक हाच उपक्रम जर पुढें चालवितील तर महाराष्ट्र वाङ्मयक्षेत्रांत ते लवकरच बरेच पुढें येतील अशी खात्री वाटते. प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध करून, अशा योग्य ग्रंथकारास संधि दिल्याबद्दल

व त्यांच्या लेखनाचा वाचकवर्गास लाभ करून दिल्याबद्दल नवयुग मालेचे संपादक रा. भुस्कुटे हे अभिनंदनास पात्र आहेत. या सदुद्योगास महाराष्ट्रीय वाचकवर्ग, विद्यालयें व संस्था शक्य तें प्रोत्साहन देतील अशी आशा करून वाचकांना आम्ही हें पुस्तक मोठ्या आनंदानें सादर करितों.

आपला नम्र,

यशवंत रामकृष्ण दाते,
बी. ए., एल्एल्. बी.
संपादक—महाराष्ट्र शब्दकोश.

'कर्तव्याश्रम'
डेक्कन जिमखाना,
१ ऑगष्ट १९३०.



"नवयुग माला" कार्यालय
५९१ बुधवार, पुणें शहर.

# अभिप्राय

१. ' साम्राटांचा सारिपाट ' हें छोटें पण स्फूर्तीदायक पुस्तक मी वाचिलें. हल्लींच्या काळीं 'यत्नदेवाची पूजा' मनोभावें होत नाहीं, हेंच आपल्या सर्वापत्तींचें मूळ आहे.. या रोगावर उद्योग ही महामात्रा आहे. इत्यादी आशादायक व बोधकारक प्रतिपादन या पुस्तकांत केलें आहे. तें सर्वांनीं विशेषत: तरुणांनीं अवश्य वाचण्यासारखें आहे.

" ग्रंथांतील उपदेश लेखकांनीं मोठ्या कळकळीनें केला आहे. हिंदु धर्माचा करडा अभिमान ग्रंथांत जागजागीं दिसतो तथापि 'बुळा' किंवा 'खुळा' हिंदु धर्म त्यांस संमत नाहीं हें त्यांनीं स्पष्ट केलें आहे. मतभेदाची एखाद दुसरी बाब ग्रंथांत असली तरी त्याची जाणीव ठेवूनच ग्रंथकारानें आपले विचार प्रकट केले आहेत. हा ग्रंथ हें कर्मयोगावरील एक छोटें भाष्यच असल्यानें सर्वांनीं संग्रही ठेवण्यासारखें आहे.

प्रो. दत्तो वामन पोतदार, बी. ए.,
सुपरिंटेंडेंट नूतन मराठी विद्यालय, पुणें.

श्रावण शु. १ शके १८५२.

२. ' सम्राटांचा सारिपाट ' हें छोटेखानी पुस्तक मानवीकर्तव्याचें सुंदर व सुलभ विवेचन करणारें असून, भाषा तडफदार आणि अनेक सदुक्तींच्या योगें खरोखरीच तें वाचनीय झालें आहे. विशेषत: कर्मभूमींत ज्यांनीं नुकताच पदन्यास केला आहे, ज्यांना जगाचें भेसूर सत्य-स्वरूप ( कळलेसें वाटतें पण- ) मुळींच कळलेलें नाहीं व त्यामुळें साह-जिक फसून आपल्या बहुमोल जीविताचा पुढें फुकट नाश झालेला पाहण्याचें ज्यांच्या कपाळीं येण्याचा संभव आहे अशा सर्व आधुनिक हिंदी तरुणांनीं या त्यांच्याच एका अगदीं तरुण देशबांधवानें अंत:करण तुटून लिहिलेल्या या पुस्तकाचें मन:पूर्वक अध्ययन करावें अशी कर्तव्य-बुद्धीनेंच मी शिफारस करतों. अशीं पुस्तकें शाळांतून लावून आमच्या विद्यार्थ्यांना संसारांतील भावी आपत्तींची जाणीव करून दिली पाहिजे व त्या आपत्ती टाळण्याचे अचुक मार्ग सुद्धां त्यांना दाखविले पाहिजेत. आज विद्यार्थी अधिकाधिक शीलभ्रष्ट होत चाललेले आहेत; घरांतून किंवा शाळांतून कोठेंहि धार्मिक अथवा नैतिक शिक्षणाची सोय दिसत नाहीं. तेव्हां राष्ट्रोन्नतीला पोषक असे गुण भावी पिढींत कसे येणार ? तर या पुस्तकासारखीं अनेक उद्बोधक पुस्तकें एकसारखीं काढून व तीं योग्य स्थळीं उपयोजून हें महान् राष्ट्रीय संकट दूर करण्याचा सर्व देशहितेच्छूंनीं प्रयत्न करण्यास हवा. या पुस्तकांतील किरकोळ दोष बाजूस ठेवून पाहिल्यास सॅम्युएल स्माईलच्या ' सेल्फहेल्प ' च्या तोडीचें तें ठरावें. तेव्हां अशा पुस्तकांचा अवश्य संग्रह करावा.

सरस्वती-मंदिर,<br>३१ जुलै १९३० पुणें

चिंतामण गणेश कर्वे, बी. ए.,<br>संपादक व सुपरिंटेंडेंट,<br>महाराष्ट्र शब्दकोश, व पूना नाईट हायस्कूल.

३. 'सम्राटांचा सारिपाट' या पुस्तकाचे कांहीं भाग वाचून पाहिले. मानवीस्वरूप, आत्मपरीक्षण, पुरुषार्थाचें साधन, ईश्वरोपासना हिंदु धर्म आणि समाज, 'यशाची गुरुकिल्ली, स्वावलंबन, सन्मित्र-समागम इत्यादीं तेरा प्रकरणें यांत आहेत. हीं सर्वच फार महत्त्वाचीं आहेत. पुस्तकाची भाषा प्रौढ, मधुर, सुबोध व शुद्ध असून विषयानुरोधानें मधून मधून चमकणाऱ्या सुंदर संस्कृत, मराठी व इंग्रजी सुभाषितांनीं त्याला अतिशयित चटकदारपणा आला आहे. पुस्तक मनोरंजक व बोधप्रद आहे. प्रत्येक तरुणानें हें संग्रहीं ठेवून वारंवार वाचण्यासारखें आहे. " पुस्तक लिहून प्रसिद्ध केल्याबद्दल लेखक व प्रकाशक यांचें पुन्हां पुन्हां अभिनंदन करणें जरूर वाटतें.

पुणें शहर,
श्रावण शु. ५ शके १८५२.

प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले,
सर परशुरामभाऊ कॉलेज.

# अनुक्रमणिका


| प्रकरण | नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ लें | मानवीस्वरूप .... ... | ... १-१२ |
| २ रें | आत्मपरीक्षण ... .. | ... १३-२२ |
| ३ रें | पुरुषार्थांचें साधन .. | ... २३-३७ |
| ४ थें | ईश्वरोपासना ... ... | ... ३८-४६ |
| ५ वें | आमचा हिंदु धर्म आणि समाज | ... ४७-६७ |
| ६ वें | यशाची गुरुकिल्ली .. | ... ६८-८६ |
| ७ वें | स्वावलंबन .... .. | ... ८७-९५ |
| ८ वें | सन्मित्र-समागम ... | ... ८६-१०७ |
| ९ वें | इंद्रियदमन आणि मोहिनीविद्या | ...१०८-११४ |
| १० वें | स्वदेशभक्ति ... ... | ...११५-१२२ |
| ११ वें | निष्काम कर्माचरण ... | ...१२३-१२८ |
| १२ वें | शांति, सौख्य व दिव्यदृष्टि ... | ...१२९-१३६ |
| १३ वें | सम्राटाचा सारिपाट ... | ...१३७-१४४ |

( इतर कोणत्याहि भाषेंतील पुनर्मुद्रणाचे सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन)

# प्रकाशकाचे दोन शब्द

पृथ्वीच्या पाठीवर नवीन असें कांहीं नाहीं. प्रत्येकाच्या मांडणींत व विचारसरणींत मात्र वैचित्र्य असतें. हा ग्रंथ त्याचाच एक वाङ्मयीन पर्याय आहे. या विषयावर अनेक मोठमोठे ग्रंथ उपलब्ध आहेत. प्रत्येकानें आपापल्या मतानुरूप या विषयाचें सशास्त्र, सोपपत्तिक, मुद्देसूद व सविस्तर विवेचन करून मानवजातीची उन्नति होण्यासाठीं प्रयत्न केले आहेत. पण हा विषय इतका व्यापक स्वरूपाचा आहे कीं, त्यावर कितीहि ग्रंथ झाले तरी ते थोडेच वाटतील. तरुणांचें **आत्मबल, ज्ञानबल** व **नैतिकबल** हीं आमच्या मालेच्या ध्येयानुसार वाढावींत व त्यांच्यांत सद्विचारांची प्रेरणा व्हावी हाच मूलभूत उद्देश ग्रंथ लिहून घेतांना आम्ही सदैव डोळ्यांपुढें ठेविला होता. हा उद्देश कितपत सफल झाला आहे तें रसिक वाचकांनींच ठरवावें. त्यांत कांहीं पुनरुक्तीचे किंवा इतर कांहीं दोष राहिले असतील तर ते वाचकांनीं सुधारून घ्यावेत, व '**हंसक्षीर**' या न्यायानें सार तेवढें ग्रहण करावें अशी सविनय प्रार्थना आहे.

दुसरी विनंति म्हणजे आपल्या इष्टमित्रमंडळींतून एखाद दुसरा वर्गणीदार आमच्या मालेला मिळवून देण्याची खटपट करून '**दसकी लकडी एकका बोजा**' या न्यायानें वाङ्मयसेवेसारख्या उच्चतम व पवित्र ध्येयाच्या कामीं हस्तेंपरहस्तें आम्हांस मदत करण्याची सुसंधी आमचे प्रिय वाचक दवडणार नाहींत अशी आम्हांस दृढ आशा वाटत आहे.

तसेंच आमच्या विनंतीप्रमाणें आश्रयदात्यांचा वाढता आश्रय मिळाल्यास आमच्या कृतनिश्चयाप्रमाणें येत्या जानेवारीपासून 'नवयुगमाले' च्या या 'बक्षिस पुष्पा'व्यतिरिक्त दर तिमाहीस मालेच्या ध्येयानुसार लहानमोठीं पण उच्च प्रतीचीं वाङ्मयपुष्पें आम्ही प्रसिद्ध करणार आहोंत.

श्री. य. रा. दाते, बी. ए., एल्एल्. बी. संपादक 'महाराष्ट्र-शब्दकोश' यांनीं आमच्या विनंतीस मान देऊन वेळेवर प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत. तसेंच विद्वद्वर्य श्री. प्रो. द. वा. पोतदार, बी. ए., श्री. प्रो. चिं. ग. कर्वे, बी. ए., व श्री. प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं उत्कृष्ट अभिप्राय दिले याबद्दल व सदरहु पुस्तक अल्पावधींत, शुद्ध व सुंदर छापून दिल्याबद्दल 'समर्थ भारत' प्रेसचे मालक श्री. रा. स. रा. सरदेसाई, बी.ए., एल्एल्. बी. यांचे आणि आमच्या मालेच्या ध्येयानुरूप हें मालेचें प्रथम 'बक्षिसपुष्प' लिहून देण्यांत रा. शां. ग. वरटीकर, यांनीं जी कार्यतत्परता दाखविली त्याबद्दल जितके आभार मानावेत तितके सर्वथैव थोडेच होणार आहेत. तरीपण ज्या अकुंठशक्तिस्वरूप ईश्वरीकृपेनें हें मालेच्या तिसऱ्या वर्षाचें 'बक्षिस पुष्पा' चें काम शेवटास नेलें त्याचे, व ज्यांनीं ज्यांनीं आमच्या संकटसमयीं उदारहस्तें पण स्वयंस्फूर्तीनें मदत केली त्यांचे पुनः एकदां अंतःकरणपूर्वक उपकृतता दर्शवून हे दोन शब्द पुरे करितों.

आपला,
नम्र साहित्यसेवक,
टी. के. भुसकुटे.

"नवयुगमाला" कार्यालय,
पुणें शहर.

वाञ्छा सज्जनसंगमे परगुणे प्रीतिर्गुरौ नम्रता ।
विद्यायां व्यसनं स्वयोषिति रतिर्लोकापवादाद्भयम् ॥
भक्तिः शूलिनि शक्तिरात्मदमने संसर्गमुक्तिः खले—।
ष्वेते येषु वसन्ति निर्मलगुणास्तेभ्यो नरेभ्यो नमः ॥१॥



श्री.—एन्. बी. ठाकूर, पुणें.

या भर्तृहरीच्या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें आपले ठिकाणीं वसत असलेल्या सद्गुणांवर लुब्ध होऊन प्रस्तुतची अल्प कृति व मालेचें प्रथम पुष्प "पत्रं पुष्पं फलं तोयम्" या न्यायानें सप्रेम व सादर समर्पण केलें आहे.

ॐ तत्सत्

# सम्राटांचा सारिपाट

## प्रकरण १ लें

## मानवी स्वरूप

मानुष्यं वरवंशजन्म विभवो दीर्घायुरारोग्यता।
सन्मित्रं सुसुतः सतीप्रियतमा भक्तिश्च नारायणे ॥
विद्वत्वं सुजनत्वमिंद्रियजयः सत्पात्रदाने रति-।
रेते पुण्येन विना त्रयोदगुणाः संसारिणां दुर्लभाः ॥१॥

**भावार्थः**—मनुष्यत्व, त्यांत श्रेष्ठ वंशांत जन्म, ऐश्वर्य, दीर्घायु, आरोग्यता, उत्तम मित्र, सुपुत्र, अति प्रिय असून पतिव्रता अशी स्त्री, नारायणाविषयीं भक्ति, विद्वत्ता, सुजनत्व, इंद्रियजय आणि सत्पात्रीं दान करण्याविषयीं प्रीति, हे तेरा गुण संसारी जनांस पुण्यावांचून दुर्लभ आहेत.

—सुबोधसार.

I know I am grass of the lowly sod;
I know I am worthless and small;
But am I not grass in the garden of God,
And is he not lord of all ?

—Sadis Gulistan ( पुष्पवन. )

गारगी (स्थळ

प्रत्येक मनुष्य हा त्या विराटस्वरूपी परमात्म्याचा एक स्फुलिंग आहे. ब्रह्मांडांतील यच्चयावत् वस्तुमात्रांत मनुष्यप्राणी हा श्रेष्ठ समजला जातो. ज्या परमेश्वरानें पशूंचा देह निर्माण केला किंवा स्थावर जंगम पदार्थांची उत्पत्ति केली त्यानेंच मनुष्यदेह निर्माण केला आहे. परंतु त्यानें ज्या अलौकिक देणग्या मनुष्याला बहाल केल्या आहेत त्या इतरत्र कोठेंहि दृष्टोत्पत्तीस येत नाहींत. त्यानें जरी सर्वांस बुद्धिरूपी देणगी दिली आहे, तरी जिला सद्-सद्विवेकबुद्धि अशी संज्ञा आहे ती एकट्या मनुष्यप्राण्यांतच आढळून येते. मनुष्याजवळ ज्ञानेंद्रियासारखें तिखट शस्त्र आहे. त्याचे अंगीं सारासार विचार करण्याची पात्रता आहे, तशी पशूमध्यें आढळणार नाहीं. मनुष्याइतकें प्रचंड सामर्थ्य व लोकोत्तर ज्ञानभांडार कुठेंहि प्रचितीस येणार नाहीं. यावरून एवढाच निष्कर्ष निघतो कीं, नरदेहासारखें उत्तम स्थळ जीवमात्राला दुर्लभ आहे; आणि म्हणूनच त्याची महति अवर्णनीय आहे यांत शंका नाहीं.

अशा या उत्तम नरजन्माला येऊन आपणांस काय करावयाचें आहे, याचा प्रत्येक ज्ञात्या व विचारी मनुष्यानें आपापल्या मनाशीं प्रश्न करणें अवश्य आहे. ह्या विषयाची व्याप्ति जगांतील अखिल मनुष्यप्राण्यांमध्यें असून हा एक अत्यंत विचारणीय प्रश्न आहे. रंकापासून राजापर्यंत ज्याला थोडेंबहुत तरी ज्ञान आहे त्याला ह्या प्रश्नाचें उत्तर दिलेंच पाहिजे. प्रस्तुत प्रश्नाचें निरसन करतांना प्रत्येकाचें उत्तर वेगळें येणें संभवनीय आहे;

कारण प्रत्येकाचा ध्येयमार्ग एकच नसतो. कोणाला संपत्ति, कोणाला राज्यतृष्णा, कोणाला विद्या, कोणाला सामर्थ्य, कोणाला कामिनी अगर कोणाला ईश्वरभक्ति याचें वेड असतें व त्या त्या मनुष्याचे आवडीप्रमाणें तें तें उत्तर तो देऊं शकतो. परंतु यावरून एवढीच गोष्ट सिद्ध होते कीं, प्रत्येक मनुष्याचा ध्येय-मार्ग एकाच तत्त्वाकडे खेंचला जाऊन तेथेंच तो केंद्रीभूत होणार! तें तत्त्व हेंच कीं, आपणांस कार्यामध्यें यश:सिद्धि प्राप्त व्हावी. परंतु खरें तत्त्व हेंच आहे कीं, मनुष्यानें सत्कृत्यें करणें, सदाचरणाकडे प्रवृत्ति ठेवणें हीच त्याच्या जीविताची इति-कर्तव्यता आहे.

परंतु हीं सत्कृत्यें करीत असतांना अनेक आपत्ति आपल्या-पुढें येऊन उभ्या रहातील! जगांतील मायावी पदार्थांमुळें आप-णांस कदाचित् मोह उत्पन्न होईल! द्रव्यैकदृष्टीमुळें म्हणजे संपत्तीच्या अभिलाषामुळें आपल्या हातून अनंत दुष्कर्में घडतील! नानाप्रकारच्या जबरदस्त विवंचना आपणांस त्रासवून सोडतील; किंवा आजन्म आपणांस जीवित-साफल्याचा एकही मार्ग सांपडणार नाहीं. अशी परिस्थिति उत्पन्न झाली असतां आपल्या हातून आत्मोन्नति होऊं शकणार नाहीं. प्रश्न खरा आहे; परंतु तो जितका वाटतो तितका भीतिप्रद नाहीं खास! 'Where there is a will there is a way.' इच्छा असल्यावर मार्ग हा सांपडलाच पाहिजे, असा अढळ सिद्धान्त आहे. ज्ञानेश्वर, राम-दास, तुकाराम, सा्क्रेटिस किंवा अगदीं आधुनिक काळांतील

रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, नृसिंहसरस्वती महाराज, पव्हरीबाबा प्रभृति सत्पुरुषांचीं उदाहरणें आपणांस असें बजावून सांगत आहेत कीं, "बाबारे, तुला वस्तुतः भिण्याचें मुळींच कारण नाहीं. तूं परमेश्वर आहेस, तूं राजाधिराज आहेस आणि तुझ्यांत जर खरी श्रद्धा जिवंत असेल तर तूं या कल्पित गोष्टींना इतकें महत्त्व देणार नाहींस. 'सत्य संकल्पाचा दाता भगवान्। सर्व करी पूर्ण मनोरथ ॥ १ ॥' हें तूं केव्हांहि विसरूं नको." श्रीसमर्थ म्हणतातः—

**धन्य धन्य हा नरदेहो। एथील अपूर्वता पहा हो।**
**जो जो कीजे परमार्थ लाहो। तो तो पावे सिद्धीतें ॥ १ ॥**

अशा प्रकारचे आनंदमय उद्गार निघण्यांतच खरा पुरुषार्थ आहे. भीति, निराशावाद, हृदयदौर्बल्य, अज्ञानग्रस्तता, दुःख आणि संशय हे आपले अति भयंकर असे शत्रु आहेत. त्यांना बिलकुल थारा देतां उपयोगी नाहीं. 'जोंपर्यंत हा देह निरोगी व सामर्थ्यसंपन्न आहे आणि मृत्यु दूर असून जीवित स्वाधीन आहे, तोंपर्यंत मनुष्यानें आत्महित करावें. अंतकाल समीप आल्यावर मग हित कसें होईल' असें सुभाषितांत एका ठिकाणीं म्हटलें आहे.

स्वामी रामतीर्थ यांचा जाहीरनामा पहा:—"सर्व तऱ्हेचे मोह आणि दुर्बलता यांच्या अतीत होऊन आपलें ईश्वरत्व प्रस्थापित करा. ज्या महात्म्याला स्वानुभव झाला आहे, त्याला रस्ता देण्यासाठीं सर्व जगानें बाजूला झालेंच पाहिजे. सर्व

जगाचें आधिपत्य करा; नाहींतर तें तुमच्यावर आधिपत्य गाजवील. संशय किंवा वेडगळ धर्मसमजुती यांना थारा देणारांना जगांत यत्किंचितहि आशा नाहीं. त्यांची आत्मप्रौढी फोल आहे. आपल्या परमात्मस्वरूपाबद्दल तुम्हांला शंका आहे काय? हृदयांत असली शंका असण्यापेक्षां छातींत बंदुकीची गोळी घुसलेली पत्करली ! तुमचें धैर्य गलित झालें आहे काय? तसें असेल तर असलें हृदय बाहेर खेंचून झुगारून द्या. आत्मस्वरूपाकडे धैर्यानें आणि आनंदानें मोर्चा वळवा. तुम्ही भीतिग्रस्त झालां आहांत काय? पण भितां कोणाला आत्मस्वरूपाला? तो तर तुमचा अनादिसिद्ध हक्क आहे. भितां कोणाला मनुष्याला? तसें असेल तर तें निखालस दौर्बल्य आहे. भितां कोणाला पंचमहाभूतांना? त्यांच्यावर स्वामित्व गाजवा. भितां कशाला स्वतःला? तसें असेल तर त्या भीतीचें कारणच नाहीं. '**अहं ब्रह्मास्मि**' हा जयघोष करून स्वराज्यपदावर आरूढ व्हा !" या जाहीरनाम्यांतील प्रत्येक वाक्य तरुणांनीं अवश्य मनन करण्याजोगें आहे.

मनुष्यावर अनेक जबाबदारीचीं कर्तव्यें आहेत, व तीं कर्तव्यें यथासांग पार पाडण्याखेरीज तरणोपाय नाहीं. परमेश्वरानें जें आपणांस जन्माला घातलें आहे त्यांत कांहींतरी हेतु आहे. शिवाय कारणाशिवाय कार्य घडूंच शकत नाहीं. तेव्हां परमेश्वराचा हेतु आपण अखंड हृदयांत जागृत ठेवून आणि विचार व ज्ञानशक्ति यांचा उपयोग करून आपलें ध्येय गांठिलें पाहिजे.

साधनांचा उपयोग करतां येईल तितका केला पाहिजे; तरच आपण '**फूल ना फुलाची पाकळी**' या न्यायानें परमेश्वराचें कांहीं तरी ऋण फेडल्यासारखें होईल. अजागलस्तनाप्रमाणें आपलें आयुष्य उपहासास्पद करून घेऊं नये. कांहींतरी जीविताचें सार्थक होणें जरूर आहे. प्रत्येक मनुष्याची भावना कांहींतरी उच्च असावी व कांहींतरी उच्च आदर्श नेत्रांपुढें ठेवून उच्च ध्येयाप्रत जाण्याचा त्यानें संकल्प करावा! कारण ध्येयशून्य जीवित व्यर्थ होय.

महाभारताला सुरुवात करण्यापूर्वी जो आदिम श्लोक घातला आहे त्यांत नारायणाला, व्यासाला आणि देवी सरस्वतीला नमस्कार करून नरांमध्यें जो उत्कृष्ट नर त्यालाहि नमस्कार केला आहे. यावरून मनुष्याची योग्यता केवढी आहे हें निदर्शनाला येईल; पण ही योग्यता जगाच्या दृष्टोत्पत्तीला येण्या-करितां आपली आत्मोन्नति करून मी परमेश्वराचा अंश कसा आहें याचें प्रत्यंतर आपल्या कर्तबगारीनें सिद्ध करून दिलें पाहिजे. नाहींतर तुकारामबुवांनीं म्हटल्याप्रमाणें:—

**मांडे पुऱ्या मुखें सांगूं जाणे मात ।**
**तोंडीं लाळ हात चोळी रिते ॥ १ ॥**
**ऐसियाच्या गोष्टी फिक्या मिठेंवीण ।**
**रुचि नेदी अन्न चवी नाहीं ॥ २ ॥**
**बोलों जाणें अंगीं नाहीं शूरपण ।**
**काय तें वचन जाळावें तें ॥ ३ ॥**

६४८०

तुका म्हणे बहु तोंडें जे वाचाळ ।
तंग तेंचि मूळ लटिक्याचें ॥ ४ ॥

अशीच आपली चोहोंकडे निर्भर्त्सना होईल. मिठाशिवाय मिष्टान्न, चैतन्याशिवाय जीव आणि गुणाशिवाय रूप ज्याप्रमाणें बहुजनसमाजाच्या आदरास पात्र होत नाहीं, त्याप्रमाणें कृतिशिवाय बोल निष्फळ होत. '**बोलाचाचि भात बोलाचीच कढी**' खाऊन कोणी तृप्त कां झाला आहे?

कित्येक लोक असे खप्पी असतात कीं, कर्तव्य हा शब्द त्यांच्या कानीं पडला कीं, ते ताबडतोब खवळून जातात आणि त्यांतहि कांहीं सत्पुरुषांचीं उदाहरणें सांगितलीं कीं, त्यांचा अगदीं तिळपापड होऊन जातो व डोक्यांत राख घालून ते म्हणूं लागतात:—"कर्तव्य ही काय चीज आहे कांहीं कळत नाहीं! ज्यानें उठावें त्यानें कर्तव्याची ओरड सुरू करावी. प्रत्येकानें कर्तव्याची मीमांसा करण्याचें जणूं सत्राच चालू केलें आहे. अहो! पोटाची दीड वीत खळगी भरायला कोण यातायात पडते, किती रक्ताचें पाणी अन् हाडांचीं काडें करावीं लागतात आणि त्यांत तुमचीं कर्तव्यांचीं भुतें कशाला आमचे पाठीस लावतां? सत्पुरुषांची गोष्टच और! त्यांचे पाठीमागें कांहीं संसार नसतो. आम्ही पोटार्थी माणसें जर हीं कर्तव्यें पहात बसलों तर आमचे डोळे पटाराला जाण्याची पाळी येईल; आणि समजा आम्ही आमचें कर्तव्य अगदीं मनःपूर्वक पाळलें तरी दैवाचें तर उल्लंघन आमच्यानें करवणार नाहीं. साक्रेटिस, तुकाराम व येशूख्रिस्त

एवढे महात्मे होते तरी त्यांना देखील प्रारब्धाची धोंड चुकवितां आली नाहीं. मग आमची गणना तर काय **'कोटश्च कीटायते'** एवढीच आहे. गंगा तेल्यानें भोजराजाची बरोबरी करण्याचा **'अव्यापारेषु व्यापारः'** कधींच करूं नये."

या लोकांची ही एक मोठी गंमत असते कीं, ते वाईट तेवढी बाजू चटकन् घेतात आणि चांगल्या गोष्टीकडे कानाडोळा करतात. यामुळें होतें काय कीं, ते आपण होऊनच आपली योग्यता तुच्छ लेखतात. या दुर्लक्षामुळें हे लोक स्वतःच्याच पायांवर धोंडा पाडून घेतात. आपल्या बाजूचें समर्थन करण्याची गुरुकिल्ली तर यांच्या जणूं काय हस्तगतच झालेली असते. त्यांची आधार देण्याची शैली पाहिली म्हणजे तर मनुष्याची मतिच कुंठित होते. त्या वेळेस असा आभास उत्पन्न होतो कीं, जणूं काय देवी सरस्वती यांच्या जिव्हाग्रीं तांडवनृत्य करीत आहे. या माणसांचे हातून कोणतें कार्य होऊं शकणार! दया, क्षमा, शान्ति, भक्ति, प्रेम, वीरता, धैर्य, भूतदया, स्वावलंबन, उद्योग, सामर्थ्य इत्यादि दैवी संपत्तीचा तर त्यांना वाराहि लागलेला नसतो. धर्म नाहीं, देव नाहीं, नीति नाहीं, सत्य नाहीं, कांहीं एक नाहीं. अशा उजाड माळरानाप्रमाणें अंतःकरण असणाऱ्या मनुष्याचे अंतःकरणांत एवढे सद्गुणांचे अंकुर निर्माण होऊन त्यांचें बीजारोपण व्हावें कसें?

पण या लोकांना एवढें तारतम्यज्ञान नसतें कीं, या जगांत असें कोणतें कर्तव्य आहे कीं, ज्यापासून महदानंद प्राप्त होणार

नाहीं; आणि दुराचरणास प्रवृत्त करणारा असा कोणता जबरदस्त मोहपाश आहे कीं त्यापासून मनुष्यास मुक्त होतां येणार नाहीं? अवश्यमेव होतां येईल. जर आपली त्यापासून सुटका करून घेतां येणार नाहीं तर मग—

**उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।**
**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥**

गीता, अ० ६ श्लोक ५.

या भगवद्गीतेंतील श्लोकाची वाट कशी लावावयाची? त्याची जोंपर्यंत वाट लागणार नाहीं, तोंपर्यंत आपलें अंतःकरण ईश्वरी सामर्थ्यापासून पराङ्मुख करणें, शंकाकुशंकांचें माहेरघर बनविणें, निराशेच्या अभ्रपटलानें आच्छादित करून टाकणें आणि दैवी संपत्तीपासून तें अधिकाधिक दूर नेणें यांत कोणताहि पुरुषार्थ नसून ही एक अधःपाताची पाऊलवाट आहे.

मनुष्यानें आपलें स्वरूप लक्षांत घेऊन असा विचार केला पाहिजे कीं, माझ्यामध्यें इतकी अलौकिक बुद्धिमत्ता आणि इतकें प्रचंड व दांडगें सामर्थ्य वास करीत आहे कीं, गारेचा हिरा अगर मातीचें सोनें करणें माझ्याच हातीं असून मला ही गोष्ट '**करतलामलकवत्**' आहे. पूर्वसंचित किंवा प्रारब्ध हे कांहींतरी थोतांड असून त्यांत कांहीं एक तात्पर्य नाहीं. हा अलम् दुनियेचा विस्तार परमेश्वरानें माझ्या सेवेसाठीं सादर केला आहे आणि

जिकडे तिकडे आनंदाचें साम्राज्य पसरलें आहे. किती हें सृष्टीचें मनोहारित्व प्रत्ययास येत आहे !

**"सुखद असे हें जगत्। मानवसेवा कारणीं रत ॥**
**येथें दास असती अनंत,। गणना त्यांसी असेना ॥१॥**
**मार्गीं पायीं तुडविली। ऐशी अनेक क्षुद्रवल्ली,**
**रोगें तनू पीडिली। तीतें आरोग्यदायक ॥ २ ॥**
**हें प्रेम देवाचें !। मनुज एक जगत साचें ॥**
**तयाभोंवतीं दुजे नाचे। हुजरीयापरी ॥ ३ ॥**

—हर्बर्ट.

इतकी उच्च मनोभूमिका ज्या वेळेस आपली बनेल त्या वेळेस आपण मानवी स्वरूप यथार्थ जाणिलें असें होईल. पक्षांचें सुस्वर संगीत, सरितेचें मंजुळ गायन, वायूच्या मंद लहरी आणि निर्झरांचीं सुश्राव्य प्रेमगीतें हीं परमेश्वरानें आपल्या मनोरंजनार्थ निर्माण केलीं आहेत. परंतु याच गोष्टी निराशावादी रडगाणें समजून त्यांचा निषेध करील व परमेश्वरकृपेच्या या दिव्य आनंदाला पारखा होईल; पण त्यांपासून कांहींच हित नाहीं. '**येथें कुणाचें काय वा गेलें। ज्याचें त्यानेंच अनहित केलें।**' असेंच म्हणावें लागेल. सुखोत्पत्तीचीं सर्व साधनें स्वाधीन असतांना व हृद्रोग-उपाय हातांमध्यें असतांना आपण जर निराशतेचेंच स्तोम माजवून ठेवलें तर आंधळ्याप्रमाणें आपणांस खड्ड्यांत पडण्याची पाळी केव्हां येईल हें सांगतांच येणार नाहीं.

वरील एकंदर विवेचनावरून मानवी स्वरूपाची रूपरेखा अंशतः तरी वाचकांचे ध्यानांत येईल. मनुस्मृतीमध्यें मनूनें म्हटलें आहे, "आपल्या अंतरात्म्याला जें केल्यानें संतोष वाटेल तें कृत्य प्रयत्नानें करावें व त्याच्या उलट प्रकारचें कृत्य आपल्या हातून होऊं नये अशी खबरदारी घ्यावी." तसेंच मिल्टन कवि म्हणतो:—

**निंदूं नको विधीला, त्यानें कर्तव्य आपुलें केलें ॥**
**तूं आचरी स्वधर्मा, ह्याहुनि कांहीं दुजें नसे उरलें ॥ १ ॥**

हेंच आपलें खरें कर्तव्य होय. कर्म करीत रहाणें हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे असें समजून त्यांत मुळींच हयगय करूं नये. हें कर्तव्य आपणांस केव्हांहि सोडतां येणार नाहीं. कारण जन्मापासून मरेपर्यंत आपल्या पाठीमागें कांहींना कांहींतरी कर्म लागलेलें आहेच! उदाहरणार्थ, श्वासोच्छ्वास हें सुद्धां एक प्रकारचें कर्मच नव्हे काय?

**कर्मत्यागाहुनी कर्म। श्रेष्ठ तें नित्य तूं करी ॥**
**देहनिर्वाहहि तूझा। न घडे कर्म टाकितां ॥ १ ॥**

—वामन.

हेंच खरें आहे.

तेव्हां आत्मोन्नति करूं इच्छिणारांनीं मानवी स्वरूप लक्षांत घ्यावें व यशोमंदिराची वाट चालूं लागावी. '**कसें करूं? काय करूं?**' या अष्टाक्षरी मंत्राचा जप करीत बसूं नये. कांहींतरी

करण्याचे तयारीस लागावें व जें हातीं घेतलें जाईल तें पुरें सोळा आणे म्हणजे सर्वांगसुंदर करावें. मग आपणांस असा अनुभव येईल कीं:—

**सुखस्य दुःखस्य न कोपि दाता ॥**
**परो ददातीति कुबुद्धिरेषा ॥**

—अध्यात्मरामायण.

'सुख आणि दुःख हीं दुसऱ्यापासून प्राप्त होतात ही कल्पना अगदीं मिथ्या आहे.' मीच माझ्या कर्माचा नियंता आहें. **'तत्त्वमसि' 'अहं ब्रह्मास्मि'** हींच माझीं सत्य स्वरूपें आहेत. मी परमेश्वराचा अंश आहें—नव्हे मीच परमेश्वर आहें. दगडाचा जर देव होतो तर मला तरी कां होतां येऊं नये! सर्व जगानें माझ्या पायांशीं नम्र व्हावें इतकी माझी योग्यता आहे आणि ती मी माझ्या कमालीच्या कर्तबगारीवर सिद्ध करून दाखवीन.

इतका तुमचा दृढनिश्चय झाला असेल तर उठा आणि कंबर बांधून कर्तव्याशीं नेटानें लढा, म्हणजे विजयश्री तुमचीच आहे. चला, **'शुभस्य शीघ्रम्'** याच घटकेपासून आपण असा पवित्र संकल्प करूं या कीं, मी माझा उत्कर्ष करून घेईन.

Ring out the old, ring in the new,
Ring happy bells, across the snow:
The year is going; let him go,
Ring out the false, ring in the true.

—Tennyson.

## प्रकरण दुसरें

# आत्मपरीक्षण

एकदम राष्ट्राची अगर जगाची सुधारणा करण्याकरितां ज्यांनीं चंग बांधलेला असेल, त्यांनीं अगोदर आत्मसुधारणा झाली कीं नाहीं याचें पूर्ण अवलोकन करावें; आणि मग व्यापक सुधारणा करण्यांत काळाचा सदुपयोग करावा.

—कार्लाईल.

कडाडीं लोटला गाडा । कां शिखरौनी सुटला धोंडा ॥
तैसा देखे न जो पुढां । वार्धक्य आहे ॥ १ ॥
कां आड ओहळा पाणी आलें । कां जैसें म्हैसयाचें झुंज माजलें ॥
तैसें तारुण्याचें चढलें । भुररें जया ॥ २ ॥
न करावें तें करी । असंभाव्य मनीं धरी ॥
चिंतू नये तें विचारी । जयाची मति ॥ ३ ॥
रिघे जेथ न रिघावें । मागे जें न घ्यावें ॥
स्पर्शे जेथ न लगावें । अंग मन ॥ ४ ॥

—ज्ञानेश्वरी.

प्रत्यहं प्रत्यवेक्षेत । नरश्चरितमात्मनः ॥
किं नु मे पशुभिस्तुल्यं किं नु सत्पुरुषैरिति ॥ १ ॥

भावार्थः—प्रति दिवशीं मनुष्यानें आपल्या वर्तनाचें सूक्ष्म निरीक्षण करावें व तें पशुतुल्य होत आहे किंवा सत्पुरुषतुल्य होत आहे हें पहावें.

—सुभाषित.

आपलें जीवित ही कर्तव्यभूमि आहे. या आखाड्यांत उडी टाकतांना म्हणजे या कर्तव्यभूमीवर पाऊल ठेवण्यापूर्वी अनेक गोष्टींचा शान्तपणें विचार करणें जरूर आहे. उत्कर्षगिरीवर आरोहण करण्यापूर्वी, अर्थात् यशोमंदिराची वाट चोखाळण्यापूर्वी ज्या बाबी अत्यंत अवश्यक आहेत त्यांत **'आत्मपरीक्षण'** या सद्गुणाला अग्रस्थान दिलें पाहिजे. कारण कीर्तिमंदिराच्या मार्गाची हीच पहिली पायरी होय; आणि आपल्या अंगचे सद्गुण व दुर्गुण यांची नीट ओळख पटल्याखेरीज पुढें पाऊल टाकणें म्हणजे मृत्यूला आमंत्रण दिल्याप्रमाणें धोक्याचें होणार आहे. उदाहरणार्थ, आपल्या हातून असत्य भाषणाचे प्रमाद क्षणोक्षणीं प्रतिघटकेला घडत आहेत; पण ते आपल्या लक्षांतच आले नाहींत तर आपण त्यांत सुधारणा करावी अशा नुसत्या इच्छेचा शिरकाव तरी अंत:करणांत होऊं शकेल काय? आपलें चुकतें कोठें हें ओळखणें आणि मन:प्रवृत्ति सतत सन्मार्गाकडे वळवीत राहणें यालाच **'आत्मनिरीक्षण'** असें म्हणतात. आत्मनिरीक्षण करून अंतरात्मा जो संदेश सांगेल तो बिनतक्रार मान्य करणें याला कोणी कोणी स्वावलंबन अशीहि संज्ञा देतात. तें कांहींहि असलें तरी आत्मपरीक्षण या सद्गुणा-

लाच प्राधान्य दिलें जावें. कारण उत्कर्षाचा डोलारा याच सद्गुणावर उभारलेला आहे, असें अनेक ग्रंथकर्त्यांनीं आपलें स्पष्ट मत नमूद करून ठेविलें आहे. कौन्ट टॉलस्टॉय म्हणतात, "तुम्हांला कीर्तिमंदिराच्या शिखरावर जावयाचें असेल तर सद्गुणांच्या शिडीवरून गेलें पाहिजे. या शिडीची प्रत्येक पायरी म्हणजे एक एक सद्गुण होय. अगदीं पहिली पायरी 'आत्मनिरीक्षण' ह्या सद्गुणाची आहे. हा सद्गुण तुमच्या अंगीं उतरला कीं, तुमचें जीवित सर्वांगसुंदर बनेल. आस्थेवाईकपणानें आणि प्रेमानें संगोपन केलेल्या मातेचें मूल जसें बाळसेदार बनतें तसेंच तुमचें जीवन या सद्गुणांनीं होईल."

'**बाबावाक्यं प्रमाणम्**' हें गतानुगतिकत्वाचें धोरण आहे. कोणतीहि महनीय व आदरणीय व्यक्ति जगद्वंद्य असली तरी त्या विभूतीचा प्रत्येक शब्द आपण झेलला व पाळलाच पाहिजे आणि तो खरा असलाच पाहिजे असें कोणत्याच ग्रन्थांत सांगितलें नाहीं. '**रुचेल तेंच घ्यावें**' हा सर्वमान्य सिद्धान्त आहे. विभूतीपेक्षां सत्याला महत्त्व देण्यांतच खरा पुरुषार्थ आहे. केवळ अंधश्रद्धेनें कोणत्याहि गोष्टीवर विश्वास ठेवणें आणि आंधळ्यांच्या मालिकेप्रमाणें दुसऱ्यांचे पाऊलावर पाऊल टाकणें यांत काय अर्थ आहे ? उत्तमोत्तम म्हणून नांवाजलेले विद्वच्छिरोमणी, प्रत्येक गोष्टीकडे चिकित्सक दृष्टीनें पाहणारे शोधक, महान् तत्त्ववेत्ते, अलोट बुद्धिवैभवानें जगाला थक्क करून सोडणारे पंडित, मोठमोठाले ग्रंथकार, मुत्सद्दी, नाटककार, कवि यांच्या सिद्धांतवजा

नियमांतून अनेक वेळां अनियमितपणा दृष्टोत्पत्तीस येतो. चार लोकांचीं चार भिन्न मतें ऐकण्यांत कमीपणा नाहीं; पण मूढासारखी परप्रत्ययनेय बुद्धि ठेवून दुसऱ्याच्या अभिप्रायावर आपलें मत बनविणें निःसंशय वाईट आहे. स्वतः शोधक बुद्धीनें, मोकळ्या व उदार मनानें आणि निःपक्षपाती दृष्टीनें प्रत्येक गोष्टीचें सुविचारपूर्वक सूक्ष्म परिशीलन करावें व मग आपली न्यायबुद्धि जें सांगेल तेंच बिनदिक्कत सत्य आहे असें समजावें. न्यायबुद्धीनें कुमार्ग सांगितला तर तो धरावयाचा असा विपरीतार्थ वाचकांनीं कृपा करून घेऊं नये. केव्हांहि झालें तरी न्यायदेवता सत्याचा अपलाप करणार नाहीं आणि आपण तर करूंच नये. हा साधा व्यवहार ज्यांच्या लक्षांत येत नाहीं ते दुर्दैवी समजावे. समर्थ म्हणतातः—‘**अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधूनी घ्यावें**’ हाच सर्वोत्तम असा राजमार्ग आहे. म्हणून ‘**पुराणमित्येव न साधु सर्वं, न चापि काव्यं नवमित्यवन्द्यम्**’ ही कालिदासोक्ति ध्यानांत ठेवून ‘**सन्तः परीक्षान्यतरद्भजन्ते**’ या श्रेष्ठ व श्रेयस्कर मार्गाचा अवलंब करावा आणि आत्मपरीक्षणास प्रारंभ करावा.

आयुष्यांत एकंदर तीन अवस्था आहेत. त्या बाल्यावस्था, तारुण्यावस्था आणि वृद्धावस्था या होत. या तिन्ही अवस्थांमध्यें तारुण्य हा महत्त्वाचा काल असून आपल्या हातून चांगल्या अगर वाईट गोष्टी याच काळामध्यें घडून येतात. तारुण्यामध्यें आपलें रक्त नुसतें सळसळत असतें. हिमालयासारखी हिंमत याच

काळामध्यें आपल्या आंगीं वास्तव्य करीत असतें आणि आपले निश्चय तर या वेळीं इतके प्रचंड स्वरूपाचे असतात कीं, जी गोष्ट आपल्या मनांत येईल ती गोष्ट आपण सहज लीलेनें पार पाडूं शकतों. तेव्हां या काळामध्यें जी आपली अस्थिर व चंचल बुद्धि आपणांस कार्यभ्रष्ट करूं पहाते तिला विवेकरूपी वेसणीनें खेंचणें जरूर आहे. आपल्या आंगीं जे सद्गुण वा दुर्गुण वास्तव्य करीत आहेत त्यांचें या काळामध्यें निरीक्षण झालें नाहीं व आपण विषयासक्त होऊन कर्तव्याची हेळसांड केली तर आपणांस जन्मभर दुःख करीत बसण्याची पाळी येईल हें सूर्यप्रकाशाइतकें सत्य आहे. आत्मपरीक्षण करून जीवन सर्वांगसुंदर बनविणें हें आपलें आद्य, प्रमुख व श्रेष्ठ कर्तव्य आहे. या पवित्र कार्याकरितांच आपला जन्म आहे असें समजावें. महत् पुण्याईनें आपणांस ईश्वराकडून ही शरीररूप नाव प्राप्त झाली आहे, तर तिला आयुष्य समाप्तिरूप भोंक पडलें नाहीं तोंपर्यंत हा दुःखमूळ संसाररूप समुद्र तरून जाणें नितान्त आवश्यक आहे.

तेव्हां प्रथम आत्मपरीक्षण करण्यास शिकलें पाहिजे. आत्मपरीक्षणामुळें आपणांस सत् आणि असत् चांगलें कळून येतें. सद्गुण आणि दुर्गुण यांतील भेद कळूं लागतो. कर्तव्य आणि अकर्तव्य यांचा उलगडा होतो व आपली कोणती सुधारणा झाली पाहिजे याचा मार्ग दिसूं लागतो. विवेकानंद म्हणतातः— "जीवमात्राच्या अंतःकरणावर जो पडदा पडला आहे त्यामुळें त्याचें पूर्णत्व झाकून गेलें आहे. हा पडदा दूर होतांच पूर्णत्व

तेथें स्वयंभू असतेंच. हें पूर्णत्व स्पष्टत्वास आलें कीं, इच्छा आणि तिची तृप्ति हीं बरोबरच घडून येतात." एवंच काय कीं, हें स्वयंभू पूर्णत्व अविष्कृत होण्यास व त्यावरील पडदा दूर होण्यास 'आत्मपरीक्षण' पाहिजे. म्हणजे आरशावर ज्याप्रमाणें प्रकाश पडला असतांना त्याचीं प्रतिबिंबें उमटतात त्याप्रमाणें आपल्या अंत:करणांत 'आत्मपरीक्षण' प्रकाशाचा झोत पडला कीं, दुर्गुण व सद्गुण यांचीं प्रतिबिंबें पडून आपणांस सुधारणेचा मार्ग दिसूं लागेल. अशा प्रकारें अध:पाताचें मूळ आत्मपरीक्षणानें सांपडलें म्हणजे वृक्षाच्या मूळावर कुऱ्हाड पडली असतांना तो ज्याप्रमाणें जमीनदोस्त होतो त्याप्रमाणें आपला अध:पाताचा मार्ग दृष्टोत्पत्तीस येऊन आपणांस तो नामशेष करण्याचे अनेकविध मार्ग स्पष्टत्वास येतील आणि हें कार्य फक्त तारुण्यावस्थेमध्येंच होऊं शकेल; कारण शारीरिक, बौद्धिक, नैतिक आणि मानसिक शक्तींची वाढ याच कालामध्यें अत्यंत झपाट्यानें होऊं लागते. हाच काल सर्वांत श्रेष्ठ, प्रमुख व सर्वोत्तम होय. या वयांत आपली ज्या मानानें प्रगति होईल त्या मानानें '**कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें**' या न्यायानुरूप आपले सद्गुण व दुर्गुण वाढीस लागतील. पण आत्मपरीक्षणानें दुर्गुणांचा वृक्षच्छेद केल्याशिवाय सद्गुणांचा वृक्ष वाढीस लागणें अशक्य आहे. कारण—

**बालपणीं बाळांची कोमल तरुतुल्य बुद्धि वांकेल ॥**
**घेईल ज्या गुणाला तो गुण मति वेष्टुनीहि फांकेल ॥१॥**

अशी आपली तारुण्यामध्यें अवस्था असते. बालपण याचा अर्थ 'पाळण्यांतलें मूल' असा हास्यास्पद घेऊं नये. संवयी लागण्याचा—वाईट वा चांगल्या—तारुण्य हाच एक काल आहे. जराग्रस्त पुरुषाला किंवा तारुण्याच्या ठराविक मर्यादेचें ज्यानें उल्लंघन केलें आहे अशा मनुष्याला अनुलक्षून हा श्लोक नाहीं हें ध्यानांत धरावें. प्रत्येक अवस्थेची मर्यादा नियमित असल्यामुळें तरुणाला लहान किंवा प्रौढाला अथवा वृद्धाला तरुण होतां येणार नाहीं. जीविताचें हें तीन अंकीं नाटक आहे. तेव्हां या ठराविक मर्यादेच्या चाकोरींतून बाहेर पडतांना आपण आपलें साधेल तेवढें हित तारुण्यामध्यें आत्मपरीक्षणाच्या सहाय्यानें करून घेतलें पाहिजे. म्हणजे आपणांस आपला उत्कर्ष साधणें जड जाणार नाहीं.

आत्मपरीक्षण केलें नाहीं तर आपली स्थिति तुकाराम-महाराजांनीं म्हटल्याप्रमाणें :—

**संत मागे पाणी नेदि एक चूळ। दासीस आंघोळी ठेवि पाणी**
**संतासि देखोनि होय पाठमोरा। दासीचिया पोरा चुंबन देतो**
**संतासि देखोनि करितो टवाळ्या। भावें धुतो चोळ्या दासिचीया**
**सोइऱ्यासि करी पाहुणेर बरा । कांडितो ठोंबरा संतालागीं**
**गाईसी देखोनी बदबदा मारी। घोड्याची चाकरी गोड वाटे**
**फुलें, पानें नेतो वेश्येसी उदंड। ब्राह्मणासी खांड देऊं नेदी**
**बाइलेच्या गोता आवडीनें पोसी । मातापितयांसी दवडोनि**
**तुका म्हणे त्यांच्या थुंका तोंडावरी। जातो यमपुरी भोगावया**

इतक्या भयंकर स्वरूपापर्यंत मजल मारूं लागेल. ही चूक सुधारणें सर्वस्वीं आपल्या हातीं आहे. या चुकीचें कारण वस्तुतः एकच आहे तें हें कीं, आपण 'आत्मपरीक्षण' करण्यास चुकतों. आत्मपरीक्षण हा उत्कर्षाचा पाया, आत्मोन्नतीचा खजिना आणि यशोमंदिराची पहिली पायरी आहे. आत्मपरीक्षणानें दुर्गुणांचा व कुकर्मांचा तिरस्कार वाटूं लागतो; तिरस्कार वाटूं लागला कीं, आपण त्या पापापासून परावृत्त होतो; परावृत्त झालों कीं, पापाचें भयंकर स्वरूप दृष्टोत्पत्तीस येते, पापाचें भयंकर स्वरूप कळलें कीं, कुकर्माबद्दल पश्चाताप व खेद होतो व कृतकर्माबद्दल किळस, तिटकारा, शरम इत्यादि वाटूं लागतात. पश्चात्तापामुळें शुद्धता प्राप्त होते, शुद्धतेनें उत्कर्षाची हांव उत्पन्न होते आणि ही हांव एकदां उत्पन्न झाली कीं, त्या मनुष्याचा अभ्युदय हा ठेवलेलाच आहे. अशी ही एकंदर परंपरा असून शेवटच्या—म्हणजे यशोमंदिराशीं भिडलेल्या साखळीचे दुवे आत्मपरीक्षणाशीं असे संलग्न—निगडीत आहेत. आत्मोन्नति झालेल्या मनुष्याचा लौकिक मग आपोआपच जगांत फैलावूं लागून उजळ माथ्यानें त्याला समाजांत वावरतां येतें. हा कांहीं लहानसहान फायदा नव्हे. तात्पर्यार्थ हाच कीं, आत्मपरीक्षणामुळें मानवजातीची झपाट्यानें उन्नति होऊं लागते.

पूर्ण विचार केलेल्या कार्यापासून सहसा दुःख प्राप्त होत नाहीं, आणि झाल्यास त्याचा पश्चात्ताप वाटत नाहीं. म्हणून पुढील श्लोकांत दर्शविल्याप्रमाणें:—

**कः कालः कानि मित्राणि को देशः कौ व्ययागमौ॥**
**कस्याहं का च मे शक्ति रितिचिंत्यं मुहुर्मुहुः ॥१॥**

—सुबोधसार

पूर्ण विचारांतीं कोणतीहि गोष्ट करावी. आपली विचारशक्ती हीच मार्गदर्शक समजून तिच्या तंत्रानें चालावें. परंतु आपला उत्कर्ष होत नाहीं म्हणून मूर्ख ज्याप्रमाणें पंडितांचा, दरिद्री धनवंतांचा, व्यभिचारिणी पतिव्रतेचा, गतभर्तृका सौभाग्यवतीचा, अपयश आलेला जयशाली माणसाचा द्वेष करितात त्याप्रमाणें आपण सत्पुरुषाचा द्वेष करीत बसूं नये. त्यानें हित तर होणारच नाहीं, पण 'बुडत्याचा पाय खोलांत' या न्यायानें आपला अधिकाधिक अधःपात मात्र होईल. दुसऱ्याचें ज्यांना बरें पहावत नाहीं, दुसऱ्याच्या उत्कर्षानें ज्यांच्या अंतःकरणांत द्वेषमूलक भावना उत्पन्न होते आणि त्यांनीं वर चढू नये म्हणून जे आटोकाट परिश्रम करितात त्यांचीं मनुष्यांत तर गणना होणार नाहींच, पण पशूंइतके सुद्धां त्यांना कोणी महत्त्व देणार नाहीं. द्वेष ! या द्वेषानें तर अनेक राष्ट्रांचा निःपात केला. इतिहासांत याची साक्ष जागोजाग पहावयास मिळेल. या विषयाचें विवेचन करण्याचें प्रस्तुत स्थळ नव्हें. हा विषय इतका व्यापक स्वरूपाचा आहे कीं, त्यावर एक भला जंगी नवीन ग्रंथच निर्माण करावा लागेल. दुर्योधन, दुःशासन, आनंदीबाई, रावण, औरंगजेब यांच्या महत्त्वाकांक्षेचें रूपांतर द्वेषांत झाल्यामुळें काय काय गोष्टी घडल्या हें इतिहासज्ञांस विदितच आहे. म्हणून आत्मपरीक्षण करावें व दुर्गुणांना सोडचिठ्ठी द्यावी. म्हणजे आपला आयुःक्रमणः

चंदनाचे हात पायही चंदन । परिसा नाहीं हीन कोणी अंग १
दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधःकार । सर्वांगें साकर अवघी गोड २
तुका म्हणे तैसा सज्जनांपासून । पहातां अवगुण मिळेचि ना ३

इतका सर्वांगसुंदर बनेल. जीविताची इतिकर्तव्यता हीच आहे. उभ्या आयुष्यांतील अत्यंत रम्यतर प्रसंग जर कोणता असेल तर वरील अभंगांत दर्शित केलेला सर्वांगीण उत्कर्षाचा आहे.

---


विक्रीस तयार ! ] सर्वांगसुंदर [ विक्रीस तयार ! !

# नवयुगमाला

वर्षारंभ ] वर्ष १ लें अंक १ ते १२ [ ऑगष्ट
वर्ष २ रें अंक १ ते १२ पासून

प्रत्येकीं ] बांधणी जाड पुठ्याची [ १२ आ.

ट. ख. सह प्रत्येकीं १ रुपायाची मनिऑर्डर पाठवून आजच मागवा !

" नवयुगमाला " कार्यालय,
५९१, बुधवार, पुणें शहर.

## प्रकरण तिसरें

# पुरुषार्थाचें साधन

ब्रह्मचर्ये स्थितं तीर्थं ब्रह्मचर्ये स्थितं तपः ॥
ब्रह्मचर्ये स्थितं धैर्यं ब्रह्मचर्ये स्थितं यशः ॥ १ ॥
ब्रह्मचर्ये स्थितं पुण्यं पावित्र्यं च पराक्रमः ॥
स्वातंत्र्यमीश्वरत्वं च सर्वं वीर्ये प्रतिष्ठितम् ॥ २ ॥
नवे वयसि यः शान्तः स शान्त इति मे मतिः ॥
धातुषु क्षीयमाणेषु शान्तिः कस्य न जायते ॥३॥-महाभारत.

Orandum est ut sit mens sane in corpore sano. ( Pray for a healthy body, and a healthy mind.)—Juvenal " Sat., " X 356.

ज्यांना उघडया हवेंत व्यायाम घेण्याला वेळ सांपडत नाहीं. त्यांना आजारी पडण्याला वेळ काढावाच लागेल ! —लॉर्ड डर्बी

(श्लोकचरण)

शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् । —कालिदास

आजन्ममरणाद्यस्तु ब्रह्मचारी भवेदिह ॥
न तस्य किंचिदप्राप्यं सत्यं सत्यं वदाम्यहम् ॥ १ ॥
सिद्धे बिन्दौ सुयत्नेन किं न सिद्ध्यति भूतले ? ॥
महिम्नो यत्प्रसादस्य नरो नारायणो भवेत् ॥ २ ॥

—अ. गी.

( श्लोक )

**धर्मार्थकाममोक्षाणां मूलमुक्तं कलेवरम् ।**
**तच्च सर्वार्थसंसिद्ध्यै भवेद्यदि निरामयम् ॥ १ ॥**

**भावार्थः**—धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चारी पुरुषार्थांचें प्रमुख साधन हें शरीर आहे हें खरें; पण केव्हां ? निरोगी असेल तर. करितां त्याचें यत्नपूर्वक रक्षण करावें, म्हणजे सर्वार्थसिद्धि होईल.

—भावप्रकाश

आरोग्य हें सर्व उपभोग्य वस्तूंमध्यें श्रेष्ठ असून पुरुषार्थाचें साधन आहे. तें संपादणें, त्याचा सांभाळ करणें आणि आपल्या सर्व शरीरांतील इंद्रियें एकाद्या घड्याळाप्रमाणें व्यवस्थित चालतील इतकी त्यांची काळजी बाळगणें हें आपलें कर्तव्य आहे, परमेश्वराचा तो एक संदेश आहे. ज्याला द्रव्यादि गोष्टी अनुकूल आहेत, कोणत्याहि वस्तूंची वाण नाहीं, शारीरिक व्यंग नाहीं आणि ईश्वरदत्त सौंदर्य असून गुणांचाहि सांठा भरपूर आहे; पण एक आरोग्य नसेल तर त्या निसर्गसिद्ध देणग्या असून नसल्यासारख्याच होत. आरोग्य हा अभ्युदयाचा आधार व मार्ग आहे. किंग्जली म्हणतो, ‘शारीरिक सामर्थ्याचा प्रताप हा मर्दपणाच्या नंदनवनांत फिरण्याचा हक्क आहे.’ या जन्मसिद्ध हक्काला दुर्बल बनून बाध आणूं पहाणें म्हणजे आपण होऊन आपली किंमत कमी करून घेण्यासारखें आहे.

जी भारतभूमी एके काळीं अत्यंत सामर्थ्यसंपन्न असून तिच्याकडे वर डोळा करून पाहण्याची एकाहि राष्ट्राची हिंमत होत नसे, तें राष्ट्र इतकें निर्वीर्य, सामर्थ्यहीन, पराधीनताप्रिय, पतित व पुरुषार्थहीन होण्याचें प्रमुख कारण त्याला शारीरसामर्थ्याचें महत्त्व कळेनासें झालें आहे हें होय. हिंदु राष्ट्राला ही गोष्ट अत्यंत लाजिरवाणी, नरकप्रद व नामुष्कीची आहे यांत शंका नाहीं. कारण आपण शूर, वीर, धीर, गंभीर, महातेजस्वी, प्रौढप्रताप, षड्गुणैश्वर्यसंपन्न, सत्यमूर्ति, प्रतापी, ओजस्वी, सिंहतुल्य, विद्यासंपन्न, नरवीर, रणधुरंधर, व धर्मावतारी अशा आदर्शमय महात्म्यांचे वंशज आहोंत. या राष्ट्रांत ज्या नरपुंगवांचा जन्म झाला तें आपणांसारखें लेंचेपेंचे, परतंत्र, दुष्काळपीडित, त्राणहीन, दुर्बल व दुर्भागी नव्हते. त्यांच्यामध्यें अद्वितीय सामर्थ्य वास करीत होतें. तसलें दिव्य सामर्थ्य आपणांस आज हवें आहे. आपल्या हातून लोकोत्तर कार्यें घडावीं अशी आपली इच्छा असेल तर '**बलमुपास्स्व**' हाच मंत्र कोणीहि देईल. सांप्रत आपलें जें एवढें भीषण पतन झालें आहे, त्याचें कारण आपण शारीरिक आरोग्याची हेळसांड करीत आहोंत. जेथें आरोग्य नाहीं तेथें दिव्य सामर्थ्य प्रत्ययास येणार कोठून ? राष्ट्रोद्धार होण्यास तर या गोष्टीची अत्यंतावश्यकता आहे. एकदम राष्ट्रोद्धारासाठीं कंबर बांधणें म्हणजे पायाच्या पूर्वी कळसाला हात घालण्यासारखें आहे. ही गोष्ट '**मूले कुठारः**' या स्वरूपाची आहे.

म्हणून प्रंपचांत सुख होण्यास काय किंवा राष्ट्रोद्धारासाठीं शरीर पूर्ण निरोगी असलें पाहिजे. तरच आपणांमध्यें तसें सामर्थ्य निर्माण होईल. आरोग्याशिवाय कोणतीहि गोष्ट फलदायक होणार नाहीं हें लक्षांत ठेवावें. —रामदास म्हणतात.

( ओंव्या )

**नरदेह पांगुळा असतां । तरी तो कार्यास न येता ।**
**अथवा थोटा जरी असतां । तरी परोपकारास न ये ॥ १ ॥**
**नरदेह अंध असला । तरी तो निपट वाया गेला ।**
**अथवा बधिर जरी असला । तरी निरूपण नाहीं ॥ २ ॥**
**नरदेह अ सल मक ।। तरी घेतां नये आशंका ।**
**अशक्त रोगी नासका । तरी तो निष्कारण ॥ ३ ॥**
**नरदेह असला मूर्ख । अथवा फेंपऱ्या समंध दु:ख ।**
**तरी तो जाणावा निरर्थक । निश्चयेसी ॥ ४ ॥** —दासबोध

अशी स्थिती असणें हें अत्यंत क्लेशप्रद व दु:खदायक आहे. आरोग्याचा सांभाळ करणें ही प्रत्येक तरुणांवर एक प्रकारची जबाबदारी आहे. सामर्थ्याविना ज्ञान पंगु आहे आणि ज्यांच्यांत पौरुष नाहीं तो ' पुरुष ' या संज्ञेला सर्वथैव अपात्र होय. बळेंकरून जें हीन तें केव्हांहि शोभत नाहीं. बळ हा राष्ट्राचा प्राण-चैतन्य-आहे आणि चैतन्य नाहीं असें चैतन्यरहित राष्ट्र कधींहि जगज्जेतें, जयशाली, बलशाली व उदयोन्मुख राहणार नाहीं. **'देही आरोग्य नांदतें । भाग्य नाहीं यापरतें।'** ही संतोक्ति अक्ष-

रशः सत्य आहे.' विप्रांचें बळ विद्या, राजांचें बल सैन्य, वैश्यांचें बळ द्रव्य आणि शूद्रांचें बळ सेवा हीं होत.' अशा अर्थाचा सुभाषितांत एक श्लोक आहे. त्यावरून एवढेंच प्रत्ययास येतें कीं, बळ हाच जीवनकलहांत टिकाव धरून राहण्यास अमोघ उपाय आहे. बळाशिवाय एक क्षणभरदेखील जिवंत राहतां येणार नाहीं. मग दीर्घायु होण्याची गोष्ट तर दूरच राहिली. म्हणून प्रत्येकानें—

(श्लोक)

**पुनर्वित्तं पुनर्मित्रं पुनर्भार्या पुनर्मही ॥**
**एतत्सर्वं पुनर्लभ्यं न शरीरं पुनः पुनः ॥१॥**—सुबोधसार

ही गोष्ट अवश्य लक्षांत ठेवावी. पश्चात्तापाचा मार्ग स्वीकारूं नये. आरोग्य व बळ हींच या इहलोकची खरी व श्रेष्ठतम संपत्ति आणि रोग व दौर्बल्य हीच खरी विपत्ती होय. म्हणूनच या दौलतीचें काळजीपूर्वक संरक्षण करून नष्ट झालेलें आरोग्य मिळवावें व असलेलें रक्षण करावें. त्याची वाटेल तशी बेगुमानपणें उधळपट्टी करूं नये.

आरोग्य हें अनेकविध मार्गांनीं मिळवितां येतें. कारण या पृथ्वीच्या पाठीवर अशी एकहि गोष्ट नाहीं कीं, तिच्यावर कांहींहि रामबाण असा उपाय नाहीं. शारीरशास्त्रज्ञांनीं नष्ट झालेलें आरोग्य परत मिळविण्याची गुरुकिल्ली आपणांस देऊन ठेविली आहे. व उत्कृष्ट अशा ग्रंथकर्त्यांनीं नियम घालून दिले आहेत.

त्यांचा आपण क्रमशः विचार करूं. आरोग्य मिळविण्याचीं (१) नियमित व्यायाम, (२) मोकळी हवा, (३) निर्मलता व शुचिर्भूतता, (४) निर्व्यसनता, (५) प्रातः शीतस्नान, (६) युक्त, माफक, साधा ताजा व सात्विक आहार, (७) सदैव आनंदी मन आणि हास्य, (८) विषयत्याग व (९) खेळ. अशीं हीं मुख्य मुख्य साधनें आहेत. तीं कशीं तें आतां आपण पाहूं :—

( १ ) **नियमित व्यायामः**—प्रत्येक गोष्टींत नेमस्तपणा राखणें जरूर आहे. व्यायाम घेतांना तर ही गोष्ट अवश्य लक्षांत ठेविली पाहिजे. नाटक चांगलें असलें म्हणून आवांक्याबाहेर जाग्रण करूं नये. तीच गोष्ट व्यायामांतील नियमितपणास लागू होते. व्यायामानें अनेक फायदे होतात. आयुर्वृद्धि, बलवृद्धि व वीर्यवृद्धि होऊन सहनशीलता आंगीं बाणतें, मनःशान्ति वाढतें म्हणजे मन निर्विकार होतें. शरीर कान्तिमान्, सामर्थ्यशाली, पुष्ट व बलिष्ठ होतें. मेरूसारखें अढळ धैर्य व अखंड आरोग्य लाभतें, शारीरिक व मानसिक दुर्बलतेला अज्जीच फांटा मिळतो व रोगांची उचलबांगडी होते. व्यायामानें रोगी-निरोगी, दुराचारी-सदाचारी, दुर्बल-सबल, अल्पायु-दीर्घायु, व्यभिचारी-ब्रह्मचारी बनतो, एवढेंच नव्हें तर संपूर्ण जगाला वश करण्याचें आपल्या आंगीं सामर्थ्य उत्पन्न होतें. एकानें म्हटलें आहे, '**मन गया तो जाने दे मत जाने दो शरीर । न खींची कमान तो क्या करेगा तीर?**' आणि हें त्रिवार सत्य आहे. शरीराला स्वाधीन ठेवल्यावर बिचारें मन तरी काय करूं शक-

णार? ‘Sound mind in a sound body’ अशी म्हणच आहे. म्हणून प्रत्येक तरुणानें व्यायाम घेण्यास सुरुवात करावी. पण तो तीन दिवस घेऊन दहा दिवस सोडून दिला तर त्यानें लाभापेक्षां हानीच होईल. असा अव्यवस्थितपणा बरा नव्हे.

(२) **मोकळी हवा**:—शुद्ध व मोकळ्या हवेंत फिरल्यामुळें मस्तक शांत होतें व अंत:करणांत सुविचार निर्माण होतात. मनुष्य निरोगी बनून त्याची आयुर्मर्यादा वाढते. आपणांस जितका मोकळ्या हवेंत वेळ घालविण्यास मिळेल तितकें हितकारकच आहे. शरीर निकोप राहण्याकरितां नद्यांच्या कांठानें, रानावनांत, डोंगराच्या अगर टेकडीच्या माथ्यावर किंवा जेथें मनुष्यवस्ती नाहीं अशा निर्मनुष्य, सपाट मोकळ्या मैदानावर रोज निदान एक तासभर तरी फेरफटका–सहल करावी. इंग्लिश लोकांना मोकळ्या हवेची फार आवड असते. वर्डस्वर्थ कवि रोज नेमानें मोकळ्या हवेंत फिरावयास जाई. तो म्हणत असें कीं, ‘ कसलीहि हवा पडो, मी तिची पर्वा न बाळगतां बाहेर-मोकळ्या हवेंत फिरावयास जातों म्हणून मला वैद्याला बोलावण्याचा प्रसंग येत नाहीं.’ म्हणून प्रत्येक मनुष्यानें मुसळधार पाऊस आला अथवा कडाक्याची थंडी पडली तरी त्याचा विधिनिषेध न बाळगतां स्वच्छ, ताज्या व मोकळ्या हवेंत फिरावयास जावें. त्यायोगानें मन निरुत्साही न होतां उलट त्यास नवीन उमेद, हुरूप, तरतरी व हुषारी वाटून तें अधिक उत्फुल्ल होईल. वर्ड-

स्वर्थ कवीनें सृष्टिदेवतेच्या समागमापासून होणारे फायदे निवेदन करितांना म्हटलें आहे :—

"'Tis her privilege,
Through all the years of this our life, to lead
From joy to joy; for she can so inform
The mind that is within us, so impress
With quietness and beauty, and so feed
With lofty thoughts, that neither evil tongues,
Rash judgments, nor the sneers of selfish men,
Nor greetings where no kindness is, nor all
The dreary intercourse of daily life,
Shall e'er prevail against us, or disturb
Our cheerful faith that all that we behold
Is full of blessings." यावरून सृष्टिदेवता आपल्या सुखांत किती भर घालते हें लक्षांत येईल. निसर्गाकडे वळणारा मनुष्य मोकळ्या हवेचा आपोआपच फायदा मिळवूं शकतो. आरोग्याचें हें एक प्रमुख साधन आहे.

(३) **निर्मलता व शुचिर्भूतता** :—आपलें शरीर हें पवित्र आत्म्याचें मंदिर असल्यामुळें त्याची नासधूस करण्याचा आपणांस तिळमात्रहि हक्क पोहोंचत नाहीं. शरीराची हेळसांड करून तें मलिन ठेवणें यांत साधुत्व अगर सद्गुण प्रत्ययास येत नसून लवकरच मृत्युमुखीं पडण्याचें तें एक साधन आहे. इंग्रजी भाषेंत अशा अर्थाची म्हण आहे कीं, 'निर्मलतेची—

शुचिर्भूततेची योग्यता ईश्वरभक्तीच्या खालोखाल आहे.' आणि हें अगदीं खरें आहे. आपणांस होणाऱ्या रोगांवरून हल्लीं असा शोध लागला आहे कीं, बहुतेक रोग शरीरांतील फेरफारामुळें होत नसून ते बाहेरील सूक्ष्म जीव अथवा वनस्पति ह्यांचा आपल्या शरीरावर हल्ला झाल्यामुळें होतात. या वनस्पति आणि जीव इतके सूक्ष्म व बारीक असतात कीं, त्यांच्या थव्यांचे थवे सुईच्या एका अग्रावर राहूं शकतील. महामारी, कॉलरा, प्लेग इत्यादि रोगांचें सूक्ष्म जीव आहेत व त्यांनीं आपल्या शरीरांमध्यें वास्तव्य केलें कीं, हे रोग जडतात. तें आपणांस जडूं नयेत म्हणून प्रत्येकानें स्वतःचें घर, कपडे, पाणी, अन्न व ज्या हवेमध्यें आपणांस श्वासोच्छ्वास करण्याचा प्रसंग येतो ती हवा यांच्या निर्मलतेस जपले पाहिजे. शुचिर्भूततेचें व स्वच्छतेचें महत्त्व जो जाणीत नाहीं त्यानें आरोग्य मिळण्याची तिळमात्रहि आशा करूं नये.

( ४ ) **निर्व्यसनता**:—शारीरीक, आर्थिक, सामाजिक व मानसिक हानि होण्याचीं कारणें दुर्व्यसनें हीं होत. चहा, कॉफी, विडी, सिगारेट, पानतंबाखू, गांजा, अफू व मद्य हे आरोग्याचे भयंकर असे जालिम शत्रु आहेत. नानाविध देहयातनांचें माहेरघर किंवा कृतान्ताचे दूत हीं दुर्व्यसनेंच होत. आरोग्याचें महत्त्व ज्यांचें अंतःकरणांत पूर्णपणें ठसलें आहे ते अंमली पदार्थांना चुकूनहि शिवणार नाहींत. विचारशील मनुष्य देखील दारू-सारख्या व्यसनामुळें केवळ पशू बनून धुळीस मिळतो. संसाराची धुळधाण, शरीराचा नाश, इष्टमित्र व नातेवाईक यांची फार-

कत, शुद्ध सौख्याची होळी इत्यादीं भयंकर अधःपाताचीं कारणें हें दारूचें व्यसन होय. त्या मनुष्यावर कोणाचाहि विश्वास बसत नाहीं. व त्याचीं बायकापोरें देखील त्याचा तिरस्कार करूं लागतात. एका इंग्लिश लेखकानें म्हटलें आहे, ' मद्य हा सैतानाचा जणूं काय प्रतिनिधीच आहे. सैतानाला येण्यास सवड नसली म्हणजे तो आपल्या प्रतिनिधीला पाठवून देतो.' सहनशीलता, अखंड परिश्रम, परोपयोगित्व, अपत्यप्रेम इत्यादि गुणांत दारुबाज मनुष्याचें पशूंशीं देखील सादृश्य राहणार नाहीं.

सर्व दुर्व्यसनांमध्यें घातुक विषें आहेत व त्यांचा परिणाम 'थेंबें थेंबें तळें साचें.' या न्यायानें मनुष्य देहावर होऊं लागतो. विडीसिगारेटसारख्या समाजांत सभ्य गणल्या जाणाऱ्या व्यसनानें देखील छाती हलकी व डोकें जड होतें. कफ, पित्त, खोकला, दमा इत्यादि हृद्रोग जडतात व अशा रीतीनें देह अकालींच खंगून शेवटीं मृत्यूला उदार आश्रय देतो. व्यसन हा वाईट गुण आहे आणि ' **दुर्गुणाचें हातीं। आहे अवघीच फजीति** ' ही संतोक्ति त्रिकालाबाधित सत्य आहे. तस्मात् त्यांचा एकदम त्याग करून वीर्यवान् बनावें. शरीराचें आरोग्य पुनश्च मिळविण्याचें व सुस्थिति प्राप्त करून घेण्याचें निर्व्यसनता हें महत्त्वाचें साधन आहे.

( ५ ) **प्रातःशीतस्नान** :—थंड पाण्याचें स्नान आरोग्याला अत्यंत हितावह आहे. स्नानामुळें रंध्रांतील मलीनता नष्ट होऊन आंगीं नवचैतन्य आल्याचा भास होतो. स्नान करतांना पाणी भरपूर व ताजें घ्यावें. काकस्नानाचा मार्ग कधींहि स्वीकारूं नये. पोहणें

हें तर आरोग्याचें सर्वोत्कृष्ट असें साधनच आहे. छाती मजबूत व विस्तीर्ण, अवयव पीळदार, श्वासोच्छ्वासाची क्रिया जोमदार व सर्व प्रकारचे हृद्रोग पोहण्यामुळें नाहींसे होतात असा अनुभव आहे. तेव्हां स्नान करणें हें शरीर पवित्र करण्याचें चांगलें साधन आहे. शरीर कधींहि घाणेरडें व अपवित्र ठेवूं नये. 'अपवित्रता' हा शब्दच मनुष्यमात्राला किळस उत्पन्न करतो; मग त्याच्या अस्तित्वानें किती किळस येईल याचें भडक चित्र वठविण्याची मुळींच जरूरी नाहीं.

(६) **आहार**—मनुस्मृतीमध्यें मनूनें म्हटलें आहे:—

( श्लोक )

**अनारोग्यं अनायुष्यं अस्वर्ग्यं चातिभोजनम् ।**
**अपुण्यं लोकविद्विष्टं तस्मात्तत्परिवर्जयेत् ॥२॥**

म्हणजे अति भोजन हें आरोग्य व आयुष्य यांची हानि करणारें, नरकप्रद, पुण्याचा नाश करणारें अर्थात् पापसंवर्धक, लोकांत निंदीत म्हणजे अपकीर्ति घडवून आणणारें आणि मनुष्याच्या उत्कर्षास विघातक आहे. तस्मात् तें वर्ज करावें.

खाण्यापिण्यांत नेमस्तपणा राखणें जरूर आहे. हजारों लोक या गोष्टीला विसरून भुकेबाहेर खातात व आपण होऊन रोगांना निमंत्रणें देतात. माफक आहारानें मानसिक श्रम करण्याचें सामर्थ्य वाढतें, चित्त सुप्रसन्न राहतें व अतिशयित खाण्यानें मनुष्य कर्तव्यपराङ्मुख, आळशी, सुस्त, महामूर्ख,

अभागी व दु:खी बनून रोगाचे स्वाधीन होतो. म्हणूनच दूर-दृष्टि राखून भगवद्गीतेमध्यें '**युक्ताहारविहारस्य**' असा आहाराविषयीं नियम घालून दिला आहे. जो नियमभंग करील तो व्याधि किंवा अत्याहाराचे तदुत्पन्न रोग यांना शरीरामध्यें आश्रय देईल हें क्रमप्राप्तच आहे.

जेवण हें कधींहि घाईघाईनें करूं नये अथवा पोट जड होईल इतकेंहि करूं नये त्यामुळें मेंदूचा व्यापार सुयंत्रित चालत नाहीं. जेवणानंतर एकदम कोणत्याहि कार्यास प्रारंभ करूं नये. थोडी विश्रांति घ्यावी. मधुर पक्वान्न असलें म्हणून अजीर्ण व अपचन होईल इतका यथेच्छ ताव मारूं नये. धर्मनीतीच्या नियमांप्रमाणें शारीरिक नीतिचे नियमहि पाळावयास पाहिजेत. खादाडपणानें शरीरस्वास्थ्याला कायमची तिलांजली मिळते. अन्न खातांना तें चांगलें चावून चावून खावें, म्हणजे अन्नपचनास मदत होईल. कारण आरोग्यशास्त्राचा असा एक नियम आहे कीं, अन्नांत जितकें अधिक लाळेचें मिश्रण होईल तितकें तें अधिक चांगलें पचतें. दूध घेतांना देखील एकदम घटाघटा न पितां चाखत चाखत प्यावें, म्हणजे बाधत नाहीं. बेंजामिन फ्रँक्लीन म्हणतो, 'जडत्व येईल इतकें खाऊं नये, तसेंच मद चढेल इतके पिऊं नये.' आपणांस ज्या वेळेस चांगली भूक लागेल त्या वेळेसच खावें. शारीरिक व मानसिक श्रमांमुळें उत्पन्न होणारी ग्लानि अन्नामुळें भरून निघते. अन्न हें आरोग्याला आवश्यक आहे, पण अत्याहार मात्र चांगला नव्हे. तो

आरोग्याचा बिघाड करतो. प्रत्येकानें एवढेंच लक्षांत ठेवावें कीं, आपणांस जगण्यासाठीं खावयाचें आहे, खाण्यासाठीं जगावयाचें नाहीं. जगण्याचे हेतु फार निराळे आहेत.

(७) **आनंदी मन व हास्य** :—' जेवतांना, झोंपीं जातेसमयीं व व्यायामाचे प्रसंगीं मन निश्चित व अंतःकरण सुप्रसन्न ठेवावें. हा आयुर्मर्यादा वाढविण्याचा एक उत्तम उपाय आहे.' असें बेकननें म्हटलें आहे. आनंदी मन हा एक उत्कृष्ट लाभ आहे. आरोग्य व बल हें सुप्रसन्न मनावरच बहुतांशीं अवलंबून असतें. वृथा अभिमान, रागीट स्वभाव आणि चिडखोरपणा यांमुळें आयुष्याचा क्षय होतो. हास्यरसाची ज्यांत मनमुराद लूट होत आहे असें एखादें हास्यरसप्रधान नाटक, विनोदपर भाषणें, मौजेचे प्रवेश, विनोदी संभाषण व हास्यरसप्रचुर लेख वाचून आनंद उपभोगणें हा आरोग्याचा किती सुंदर मार्ग आहे ? चिंतानलानें ज्याचें अंतःकरण करपून गेलें आहे अथवा नैराश्यतेमुळें काळोख पडला आहे, त्यांनीं आनंदी मन ठेवल्यास अवश्य फायदा होईल. हास्य हा तर आरोग्याचा, उत्साहसंपन्नतेचा व यशाचा खजिना आहे. खिन्नता ही मारक [illegible]प्रमाणें आहे. तिचा अंगिकार केल्यास मनुष्य आरोग्यापासून [illegible]धिक दूर जातो. म्हणूनच ' चिता आणि चिंता ' [illegible]क टिंबाचेंच अंतर असें म्हटलें आहे. मनुष्यानें हंसणें इष्ट असून तें सुखाचेंच काय पण आरोग्याचें देखील आहे. मनुष्य ज्या दिवशीं मनमुराद हास्याचा उपभोग

घेतो, अंतःकरण सुप्रसन्न ठेवतो व मन निर्विकार ठेवतो त्या दिवशीं त्याला फारच सुख होईल यांत काडीमात्रहि संदेह नाहीं.

(८) विषयत्यागः—**'आगमे सुखमाप्नोति निर्गमे प्राण-संकटम्'** म्हणजे प्रारंभीं क्षणैक सुखप्रद परंतु अंतीं नाशप्रद असें या विषयांचें कृत्रिम स्वरूप असल्याचें शंकराचार्य वर्णन करितात. **'स्त्रियांचा तो संग नको नारायणा। काष्ठ वा पाषाणा-मृत्तिकेच्या'** अशी तुकोबांनीं देवाजवळ प्रार्थना केली आहे. आणि **'सर्वथा न करावा स्त्रीसंग। हेंचि वेदांचें अंतरंग'** असा विषयी जनांस उपदेश केला आहे. शास्त्रांत किंवा वरील अभंगांत जी स्त्रीनिंदा केली आहे ती स्त्रीनिंदा नसून विषयनिंदा आहे. तेव्हां स्त्रीवाचकांनीं त्याविषयीं गैरसमज करून येऊं नये.

हालाहाल देखील ज्यापुढें कःपदार्थ ठरेल असे हे विषय आहेत. म्हणून शंकराचार्यांनीं म्हटल्याप्रमाणें **'विरज्य विषय-व्राताद्दोषदृष्ट्या मुहुर्मुहुः'** (भावार्थ :—संपूर्ण विषयाकडे—मग तो कोणताहि विषय असो—दोषदृष्टीनें पाहाणें यांतच आत्मोद्धार आहे. वैराग्य, ब्रह्मचर्य किंवा आरोग्य यांचें यांतच श्रेष्ठ रक्षण आहे.) आपली वर्तणूक ठेवावी. 'Beauty is but skin-deep' हें लक्षांत ठेवून विषयापासून परावृत्त व्हावें.

(९) **खेळ** :—मोकळ्या हवेंत खेळ खेळावेत. अनेक प्रकारचे आहेत, आट्यापाट्या, खोखो, हुतुतु, वगैरे मर्दानी खेळ आरोग्यवर्धक असतात. खेळापासून हे फायद्याचें वर्णन पुढील उताऱ्यांत उत्तम प्रकारें केलें

"शिक्षणाला व्यायामाची जोड मिळाली, तर त्याच्या योगें शारीरिक व्यायाम व मनोरंजक खेळ असा दुहेरी फायदा होईल. निवळ श्रमसाध्य असा कोणताहि व्यवसाय करीत असतां कंटाळा येऊन आपल्या आवडीप्रमाणें मनोरंजक खेळ खेळणें त्यांतच जीवितसाफल्य असतें. बंदिवासांतून निघून स्वतंत्र हवेंत येणें, अंधकारांतून प्रकाशांत येणें, एकतानतेला कंटाळून नानाविधतेचा आश्रय घेणें, दानावस्थेंतून ग्रहणावस्थेंत प्रवेश करणें, याचेंच नांव दुःखाचा विसर पाडून सुखोपभोग घेणें. हेंच श्रमाचें अप्रतिम असें पारितोषक आहे व तें द्विगुणित उत्साहानें दीर्घ परिश्रम करण्यास अंगीं सामर्थ्य व सहनशीलता हे गुणहि उत्पन्न करतें."—बेनकृत 'Education as Science'

वर विवेचन केलेल्या सर्व साधनांचा उपयोग केल्यास पुरुषार्थाचें साधन जें आरोग्य तें संपादन करितां येईल.

---

सर्वांग सुंदर ] [ सर्वांग सुंदर

## नवयुगमाला

तिसरें वर्ष ऑागष्टपासून सुरू झालें. ४ आण्यांचीं
ष्टाचीं तिकिटें पाठवून—

**नमुना अंक मागवा.**

पत्ता—'**नवयुगमाला**' कार्यालय, पुणें नं. २

# प्रकरण चवथें

## ईश्वरोपासना

हा नरदेह उत्तम पूर्ण। केवळ भगवत्प्राप्तीचें कारण।
म्यां आत्महित न करून। बुडालों कीं अंध तमीं ॥ १ ॥
पुण्य क्षेत्र सरसाविलें। तेथें कनकबीज लाविलें।
कनकाचें ताट घडिलें। त्यांत वाढिलें तृणबीज ॥ २ ॥
सुधारसकुंभ दैवें जोडला। तो नेऊनि उकिरडा ओतला।
चिंतामणी फोडोनि घातला। पायरीस अभाग्यें ॥ ३ ॥
सुरभी शोधीत आली घर। तिशी मारूनि काष्ठप्रहार।
अभाग्यें घातली बाहेर। तोंच प्रकार मज जहाला ॥ ४ ॥
बळें कल्पवृक्ष तोडून। वाढविलें कंटकवन
राजहंस दवडून। दिवाभीत पाळिले ॥ ५ ॥ —श्रीधर

Pray for my soul. More things are wrought by prayer
Than this world dreams of. Wherefore, let thy voice
Rise like a fountain for me night and da
For what are men better than sheep or
That nourish a blind life within the brai
If knowing God, they lift not hands of
Both for themselves and those who call
fr

For so the whole round earth is every way
Bound by gold chains about the feet of God.
—Tennyson's "Morte d' Arthur."

( श्लोक )

**तप्यन्ते लोकतापेन साधवः प्रायशो जनाः ।**
**परमाराधनं तद्धि पुरुषस्याखिलात्मनः ॥ १ ॥**

**भावार्थः**—दुसऱ्याच्या दुःखानें जो दुःखित होतो व दुःखी जनांचा परमर्ष घेतो, त्याची हीच सर्वांत श्रेष्ठ अशी परमेश्वराराधना होय.

—भागवत

तो एक देव सर्व भूतांच्या ठायीं गूढ आहे. तो सर्वव्यापी सर्व भूतांतरात्मा आहे. तो सर्व कर्मे पाहाणारा आहे. तो सर्व भूतांच्या ठायीं वास करणारा आहे. तो साक्षी, ज्ञाता, अनन्य व निर्गुण आहे.

—श्वेताश्वतरोपनिषद् ( ११. ६. मं. अ. )

या पृथ्वीमध्यें जिचा सर्वत्र संचार आहे, कर्तुमन्यथाकर्तुं असें सामर्थ्य जिच्यांत वास करीत आहे, जिच्या स्वरूपाचें वर्णन करीत असतां श्रुतींनीं देखील 'नेति नेति ' म्हणून हात टेकले अशी ...तीय शक्ति या जगामध्यें वास्तव्य करीत आहे. ती सर्वज्ञ ...ची आणि सर्वव्यापी आहे. अखिल विश्वांतील अव्यय, अविनाशी, निरुपाधिक, मंगलमय, गुणातीत, दिव्य, , अचिंतनीय, गूढ, शाश्वत, निष्कलंक व सर्वसत्ताधारी

अशी तीच '**एकमेवाद्वितीयम्**' अशी शक्ति आहे. या शक्तीच्या अस्तित्वाबद्दल कोणीहि समजदार व श्रद्धावान् मनुष्य आशंका घेणार नाहीं. या शक्तीला कोणी परमेश्वर आणि कोणी ब्रह्म असें म्हणतात.

या अवाढव्य जगद्रूपी आश्चर्याचा जनक, सजीव निर्जीव सृष्टीचा उत्पत्तिस्थितिलयकर्ता, मांगल्य, पावित्र्य, सौंदर्य इत्यादि गोष्टींचें आगर, सर्व सद्गुणांचें प्रभवस्थान एक परमेश्वरच आहे. याला कोणी खिस्त, कोणी आकाशांतील बाप, कोणी राम, कोणी अल्ला तर कोणी रहीम अशीं नानाविध विशेषणें देतात. पण ईश्वराला रूप नाहीं आणि गुणहि नाहीं. तो निराकार व निर्गुण असा आहे. त्याच्या इच्छेवांचून त्रिभुवनांतील एक पानहि हलूं शकत नाहीं. तो सम्राटांचाहि सम्राट आहे.

याला कोणी आत्मसाक्षात्कारानें, कोणी भक्तीनें, कोणी निष्कामकर्माचरणानें तर कोणी ज्ञानानें जाऊन मिळण्याचा प्रयत्न करितात. जो मनुष्य त्याला पाहण्याकरितां बाह्यदृष्टि अंतःमुख करून प्रत्यग्वृत्ति धारण करील व ज्या वेळेस त्याची 'समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं परमेश्वरम्' अशी भावना होईल त्या-वेळेस त्याला त्याचें दर्शन होईल. '**यतो वाचो निवर्तं[illegible] अप्राप्य मनसा सह**' असें त्याच्या स्थितीचें तैत्तिरीयोप[illegible] वर्णन केलें आहे. याला वेदान्तांत अपरोक्षानुभूति—आ[illegible]त्कार—अशी संज्ञा आहे.

ऐहिक मदाच्या भरानें धुंद झालेला, जगांतील दिखाऊ थाटमाटानें व झगझगाटानें दिपून गेलेला, कामक्रोधादिक विकारांच्या योगानें अंतःकरण मलिन झालेला आणि विषयामध्यें लंपट होऊन त्याची निंदा करणारा मनुष्य नास्तिकतेचीं पाखांडीं मतें खुशाल प्रतिपादन करो, पण जगांत अशी एक अदृश्य शक्ति आहे कीं, त्या शक्तीच्या प्रभावानें त्याला परमेश्वराचें उन्नत स्वरूप दिसल्याविना राहणार नाहीं. क्षुद्र विषयांत ज्याचें मन निमग्न व रममाण झालें आहे त्याला ईश्वराचा अगाध महिमा कळत नाहीं; परंतु ज्यावेळेस त्याच्या अंतःकरणांतील कुसंस्कार नष्ट होतील त्या दिवशीं त्याला "**एष देवो विश्वकर्मा महात्मा सदा जनानां हृदये संनिविष्टः।**" (श्वेताश्वतर ४–१७) असा प्रत्यय येऊन त्याची ईश्वरावरील श्रद्धा अभिव्यक्त होईल व तो ऋषीनें म्हटल्याप्रमाणें म्हणावयास लागेल कीं, "**देवस्यैष महिमा तु लोके येनेदं भ्राम्यते ब्रम्हचक्रम्**" वादविवाद करणारे शास्त्रवेत्ते पाहिजे तें म्हणोत, हें अखिल विश्व परमात्म्याच्या महिम्यानें चाललें आहे यांत तिलप्राय संदेह नाहीं. अशाप्रकारचीं उदाहरणें इतिहासांत व पुराणांत जागोजाग पहावयास मिळतात. त्यांपैकीं दोनतीन उदाहरणें येथें दिल्यास अस्थानीं [illegible]ार नाहीं.

[illegible]दर बादशाह स्वतःला केवळ परमेश्वर समजत असे. [illegible] किल्ल्याची पहाणी करीत होता. इतक्यांत एक बाण [illegible]त त्याच्या पायांत घुसला. त्यामुळें त्याला अतिशयित

वेदना होऊन त्याचा प्राण व्याकुळ झाला. त्या वेळीं त्याच्या मुखांतून सहजोद्गार निघाले, "मी इतक्या दिवस स्वतःला परमेश्वर समजत असे पण मी देव नसून माणूस आहे. कारण यःकश्चित् बाण लागल्यामुळें मला आज दुःख होत आहे."

भीमाला आपल्या प्रचंड शक्तीचा इतका गर्व झाला होता कीं, त्याला त्रिभुवन ठेंगणें वाटूं लागलें. पण एके दिवशीं तो अरण्यांतून जात असतां त्याची व एका वानराची गांठ पडली. ही भेट घडवून आणण्याची क्लृप्ति श्रीकृष्णाची होती. मार्गांत वानर दिसल्यामुळें भीमानें त्याची जी शेपटी मार्गांत पडली होती ती त्या वानराला दूर करावयास सांगितली. वानरानें म्हटलें 'बाबा भीमा, मी अगदीं वृद्ध झालों आहें. मला माझी शेंपटी देखील उचलण्याचें सामर्थ्य नाहीं. तेव्हां तूंच ती बाजूला उचलून ठेविल्यास मजवर अत्यंत उपकार होतील.' वानराची कींव येऊन भीमानें आढ्यतेनें ती दूर लोटण्याचा प्रयत्न केला. पण त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. त्याला ती दोन बोटें देखील पलीकडे सारतां येईना. त्या दिवसापासून त्याला आपल्या सामर्थ्याचा गर्व वाटेनासा झाला.

वरीलप्रमाणेंच नेपोलियनची गोष्ट. अनेक राजाधिराजांना आपले दासानुदास बनविल्यामुळें नेपोलियनला वाटलें अशक्य असें या जगांत कांहींच नाहीं. सर्व कांहीं प्राप्त होतें. पण वॉटर्लूच्या रणसंग्रामांत पराभूत होऊन प्राप्त झाला तेव्हां 'प्रारब्ध म्हणून कांहींतरी चीज

आहे' असें त्याच्या चांगलेंच प्रत्ययास आलें. अशीं शेंकडों उदाहरणें सांपडतील.

यावरून एवढेंच प्रत्ययास येतें कीं परमेश्वराइतकें प्रचंड सामर्थ्य कोणत्याहि ठिकाणीं आढळणार नाहीं, अगाध समुद्रामध्यें एक जलबिंदु, अफाट वाळवंटांत एक वाळूचा कण, हजारों खंडी धान्याच्या राशींत एक दाणा असावा तितकी त्या परमेश्वराच्या वैभवयुक्त सामर्थ्यापुढें आपली किंमत आहे आणि देव नाहीं ही कल्पना अज्ञानदर्शक व भ्रांतिमूलक आहे.

इहपर सुख साधण्यास परमेश्वरभक्तीसारखें सुलभ व खरेंखुरें असें दुसरें साधन नाहीं आणि परमेश्वरभक्ती करण्यास नरदेहासारखें उत्तम स्थळ नाहीं. तारवांस जसें सुकाणूं, समुद्रपर्यटणास जसें दिङ्निर्णायकयंत्र, सुवर्णकारास जशी निकषशिला, अंधास जशी यष्टी तशीच प्रपंचांत सुख लागण्यास परमेश्वरभक्ती पाहिजे. या नरदेहाला जो सार्थकी लावीत नाहीं आणि परमेश्वरभक्ती न करितां कुत्र्याप्रमाणें विषयांच्या मागें लागून त्यांतच कालक्रमणा करितो—रममाण होतो—त्याच्याइतका कपाळकरंटा कोणीच नाहीं. कारण—

भूमि नरदेहा ऐसें । निधान लाधलें अनायासें ॥
निहि आयुष्यें । जो विषयविलासें गुंतला ॥ १ ॥
मृत विकूनि कांजी प्याला । रत्नें देऊनि कोंडा घेतला ।
फोडूनि टोळ धरिला । गज विकिला इटेसाठीं ॥२॥

**डोळे फोडूनि काजळ त्याला। नाक कापोनि शिमगा खेळला।**
**तैसा नरदेह नाडला । नाश केला आयुष्याचा ॥३ ॥**

—एकनाथी भागवत

असेंच म्हणावें लागेल. भगवंताला शरण जाऊन अनन्यभक्तीनें, निष्ठेनें व श्रद्धेनें त्याची करुणा भाकणें हाच मुक्त होण्याचा मार्ग आहे. परमेश्वरप्राप्ती होण्यास भक्ति हाच एक उपाय आहे व या विषयीं सर्वांची एकवाक्यता आहे. तुकोबा म्हणतात—

**"देवापाशीं मागे आवडीची भक्ति। विश्वासेशीं प्रीति भावबळें"**

देव भावाचा भुकेला आहे. परमेश्वराची प्राप्ति करून घ्यावयाची असेल तर तर्ककुतर्क किंवा शंकाकुशंका उपयोगी नाहींत. त्यानें सुखाऐवजीं शीणच वाढेल. अंतःकरणांत एक पवित्र भावच उदित झाला पाहिजे. तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर, एकनाथ, सांवतामाळी इत्यादि प्राकृत संत केवळ भक्तीनेंच तरून गेले असें आपणांस आढळून येईल, तो आपल्या प्राणाचा प्राण, आत्म्याचा अंतरात्मा आहे, ह्या गोष्टीचा अनुभव आला पाहिजे. परमेश्वरावर जो विश्वास ठेवील त्यास अपयश कधींहि यावयाचें नाहीं. दुःखार्णवांत बुडणारा मनुष्य ईश्वराचा आश्रय कर[illegible] त्याला तो कधींहि दूर लोटणार नाहीं. पण अंतःकरणां[illegible] झरा मात्र अखंड वहात असला पाहिजे. प्रेमाचा उदय [illegible] कळवळा उत्पन्न झाला पाहिजे. स्वार्थ, काम, क्रोध, लो[illegible]

शत्रूंना प्रबल होऊं देतां कामा नये. नाहींतर आपण ईश्वरापासून दूर लोटलें जाऊं. भक्तीनें काय होतें म्हणाल तर—

## अभंग

भक्तीचें तें वर्म जयाचिये हातीं । तया घरीं शांति क्षमा दया॥१
अष्ट महासिद्धी ओळंगती द्वारीं । नच जाती दुरी दवडीतां ॥२
तेथें दुष्ट गुण न मिळे निःशेष । चैतन्याचा वास जयामाजीं॥३
संतुष्ट हें चित्त सदासर्वकाळ । तुटली हळहळ त्रिगुणाची॥४
तुका म्हणे येथें काय तो संदेह । आमचे गौरव आह्मी करूं॥५

अशा प्रकारचे अनंत फायदे होतात. कोणत्याहि धर्मांत पाहिलें तर, मुख्य भक्तिमार्गच सांगितला आहे. म्हणून प्रापंचिकांनीं अनीश्वरवाद्यांचें म्हणणें लक्षांत न घेतां ईश्वरोपासना करावी. समर्थांनीं म्हटलें आहे––

## ( ओंव्या )

देवाच्या इच्छेनें वर्तावें । देव करील तें मानावें ।
मग सहजाचि स्वभावें । कृपाळू देव ॥ १ ॥
पाहतां देवाचे कृपेसी । मातेची कृपा कायसी ।
माता वधी बाळकासी । विपत्ती काळीं ॥ २
देवें भक्त कोण वाधिला । कधीं दोखिला ना ऐकिला ।
शरणागतासि देव झाला । वज्रपंजरू ॥ ३ ॥
देव कृपेचा सागर । देव कृपेचा जळधर ।
देवासे भक्तांचा विसर । पडणार नाहीं ॥ ४ ॥

देवप्रीति राखणें जाणे। देवासी करावें संगपणें।
जिवलगें अवघीं पिशुनें। कामा न येती॥ ५ ॥
सख्य देवाचें तुटेना। प्रीति देवाची विटेना।
देव कदा पालटेना। शरणागतासी॥ ६ ॥
म्हणूनि सख्य देवासी करावें। हितगुज तयास सांगावें।
आठवें भक्तीचें जाणावें। लक्षण ऐसें॥ ७ ॥ --दासबोध.

---


सर्वांग सुंदर ] [ २ रें वर्ष सुरूं

नवयुगमाला

नमुना अंक ४ आणे.

रफ् कागद वा. व्ह. ट. ख. सह २॥ रु.

ग्लेज कागद. .... .... ३॥ रु.

दर महिन्याच्या १ ल्या तारखेला प्रसिद्ध होते.

पत्ता-'नवयुगमाला' कार्यालय, बुधवार पुणें.

## प्रकरण पांचवें

# आमचा हिंदु धर्म आणि समाज

( श्लोक )

अर्थाः पादरजोपमा गिरिनदीवेगोपमं यौवनम् ।
आयुष्यं जललोलबिन्दुचपलं फेनोपमं जीवितम् ॥
धर्मं यो न करोति निन्दितमतिः स्वर्गार्गलोद्घाटनम् ।
पश्चात्तापयुतो जरापरिगतः शोकाग्निना दह्यते ॥ १ ॥

भावार्थ—द्रव्य हें पायांच्या धुळीसारखें आहे. यौवन हें पर्वतावरून येणाऱ्या नदीप्रवाहासारखें हां हां म्हणतां निघून जाणारें आहे. आयुष्य हें लोंबणाऱ्या जलबिंदुसारखें चंचल आहे. असें असतां जो मनुष्य स्वर्गद्वार उघडण्याची धर्मरूपी किल्ली हस्तगत करून घेत नाहीं, त्याला वृद्धापकाळीं पश्चात्ताप होऊन तो शोकाग्नीनें जळून मरतो.

—हितोपदेश

That God, which ever lives and loves,
One God, one law, one element.

Tennyson.

( श्लोक )

न तत्परस्य संदध्यात्प्रातिकूलं यदात्मनः ।
एष संक्षेपतो धर्मः कामादन्यः प्रवर्तते ॥ १ ॥

भावार्थ—जो भोगण्याचा प्रसंग आला असतां आपणांस दुःख होतें, तो दुसऱ्यावर आणूं नये हें संक्षेपतः धर्माचें लक्षण होय.

—महाभारत

आपल्या जीवनाला हृदयाची जितकी आवश्यकता आहे तितकीच धर्माचीहि आहे.

—कौन्ट टॉलस्टॉय

'ज्या गुणांची सर्व आर्य लोक अतिशय प्रशंसा करितात तो धर्म हा होय व ज्याची ते निर्भर्त्सना करितात तो अधर्म होय.

—आपस्तंब धर्मसूत्र

**यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः ॥**

—वैशेषिकशास्त्र कणादमुनि

धर्म हा प्राणिमात्रांचा आधारस्तंभ आहे. प्रत्येक गोष्टीचा धर्मांत अंतर्भाव होतो. अतएव धर्माला सर्वोत्कृष्ट असें म्हणतात.

—तैत्तिरीयारण्यक

घटपट, माया, चैतन्य, पुनर्जन्म, ब्रह्म, आत्मा इत्यादि प्रश्नांचा ऊहापोह, एकाद्या परमार्थविषयक प्रश्नाची चर्चा, एकाद्या विशेष धर्ममताचें खंडन किंवा नानाप्रकारच्या धार्मिक गोष्टींचा काथ्याकूट करण्याचें प्रस्तुत स्थळ नव्हें आणि लेखकाचा अधिकारहि नाहीं. श्रुति, स्मृति, वेद, उपनिषदें इत्यादि धर्मग्रंथांनीं हें कार्य केलें आहे. परंतु अखिल मनुष्

जो एक मार्ग सनातन वैदिक ऋषींनीं लावून दिला आणि ज्यापासून मनाला महदानंद व समाधान प्राप्त होतें असा धर्म हा एक शुद्धानंदाचा मार्ग आहे. तेव्हां या विषयाबद्दल थोडें तरी लिहिलेंच पाहिजे. धर्म म्हणजे काय आहे? अनेक शतकां-मागें त्याची स्थिति कशी होती? सांप्रत काळीं तो कसा पाळला जात आहे? धर्माचा अवलंब न केल्यास जीवात्म्याची आणि राष्ट्राची अवस्था काय होईल? रूढि म्हणजे धर्म आहे काय? वगैरे प्रश्नांचा वेदान्तदृष्टया व व्यवहारदृष्टया विचार करणें जरूर आहे.

धर्म यांत "धृ" हा धातु आहे. "**धारणाद्धर्म-मित्याहुः**" म्हणजे धारण करणारा तो धर्म. ज्या धर्माच्या योगानें मनुष्यप्राण्यास इहपरलोकीं सुख लाभतें तो धर्म. धर्मांत मुख्यतः दोन गोष्टींचा अंतर्भाव–समावेश–होतो. एक मनुष्याचें वर्तन अथवा कर्तव्यकर्म आणि दुसरी परमात्म्याचें स्वरूप, जीवात्म्याची मरणोत्तर अवस्था आणि शास्त्रविहित आचरणांचे नियम. वैश्वदेवादि पंचमहायज्ञ, एकादशिनी, होमहवन, श्राद्ध-पक्ष, संध्यावंदनादि कर्में करणें हा द्विजांचा धर्म म्हणजे कर्त-व्यकर्म आहे. अर्थात् हीं सर्व कर्में चित्तशुद्धि व्हावी याकरितां शास्त्रानें सांगितली आहेत. "**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्**" या गीतोक्तीप्रमाणें सर्व कर्में परमेश्वरास अर्पण करणें व अंतीं त्यापासून अलिप्त रहाणें हा एक निराळा धर्म आहे. सर्व कांहीं "**ब्रह्मार्पणमस्तु**" करून '**इदं न मम**'

म्हणून त्यावरील आसक्ति, ममत्व व अहंकार सोडून देणें याला "**शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः**" अशी भावना झाली पाहिजे. अशी भावना ज्याला अपरोक्षानुभूति—आत्मसाक्षात्कार–झाला त्याचीच होईल आणि त्याच मनुष्याला परमात्म्याचें स्वरूप गोचर झालें असें म्हणतां येईल. परंतु सांप्रत काळीं या धर्माची एवढी आवश्यकता नाहीं, कारण आत्मज्ञानी मनुष्यालाच हा सूक्ष्म धर्म अवगत होईल. याची व्याख्या खालीलप्रमाणें आहे—

**सूक्ष्मः परमविज्ञेयः सतां धर्म प्लवंगमाः ।**
**हृदिस्थः सर्वभूतानामात्मा वेद शुभाशुभम् ॥**

——रामायण

तेव्हां हा अत्यंत सूक्ष्म धर्म आहे. तो समजण्यास कठीण असून बहुजनसमाजाला मुळींच झेंपणारा नाहीं. प्रत्येकाच्या हृदयांत गुप्तरूपानें वास करणारा हा धर्म फक्त आत्मानुभवी मनुष्याच्याच उपयोगाचा आहे.

धर्म हा वस्तुतः जीवमात्रानें समाधान व्हावें, त्याची सुमार्गाकडे प्रवृति वळावी आणि त्याची संयमनशक्ति वाढावी एतदर्थ अस्तित्वांत आला आहे. धर्म हा बुद्धिप्रभाव अगर सूक्ष्म बुद्धिकौशल्य दाखविण्याकरितां अगर वादविवाद करून एकमेकांची नालस्ती, यथेच्छ निंदा, करण्याकरितां नाहीं. अशा प्रकारची प्रवृत्ति पुरातन काळीं होती हें त्या वेळच्या परिस्थितीवरून दृष्टोत्पत्तीस येईल.

एकानें ' पुनर्विवाह करूं नये ' असें म्हणावें. तर दुसऱ्यानें **"सा चेदक्षतयोनिः स्यात्पुनः संस्कारमर्हति"** असें त्याच्या विरुद्ध प्रतिपादन करावें. एकानें ब्राह्मणांस चारी वर्णांच्या भार्या करण्यास परवानगी आहे असें लिहावें, तर दुसऱ्यानें " **यदुच्यते द्विजातीनाम् शूद्राद्दारोपसंग्रहः। नैतन्मम मतम्** " म्हणून त्याचा निषेध करावा. एकानें एका स्त्रीला एका काळीं एकच पति असावा असें प्रतिपादन करावें तर दुसऱ्यानें " **नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ । पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते** " अशी पांच अवस्था प्राप्त झाल्यास अन्य पति करण्याची परवानगी दिली आहे. एकानें स्त्रियांना स्वातंत्र्य पाहिजे असें म्हणावें, तर दुसऱ्यानें " **न स्त्री स्वातंत्र्यमर्हति** " असें म्हणावें. एकानें **"चोदनात् लक्षणो धर्मः"** अशी धर्माची व्याख्या करावी तर दुसऱ्यानें " **आचारः प्रथमो धर्मः** " अशी व्याख्या करावी आणि तिसऱ्यानें " **अहिंसा परमो धर्मः** " असें धर्मवाक्य आहे असें म्हणावें. प्रत्येकाच्या मतांत सत्यता आहे परंतु यांत खरा धर्म कोणता याचा उलगडा न झाल्यामुळें सामान्य मनुष्य गोंधळून जातो. ही पूर्वकालची स्थिती सोडून देऊन आपण कांहीं शतकामागें जी स्थिती होती तिचें सिंहावलोकन केलें तरी आपणांस अशीच परिस्थिती असल्याचें आढळून येईल.

कोणी संन्यास आणि मायावाद यांचें स्तोम माजवावें, कोणी जगन्मिथ्यात्व प्रतिपादन करावें, कोणी " **निर्वाहापुरतें अन्न**

अच्छादन। रहावया स्थान कोपीगुहा" व "**पोटापुरतें देई, मागणें लई नाहीं, लई नाहीं**" असें म्हणून लोकांची अल्पसंतुष्टता आणि उदासीनता वाढवावी. कोणी प्रपंच हा दुःखरूपी समुद्र आहे असें सांगून एकदेशी भक्तीचा डांगोरा पिटावा, कोणी इस्लामी धर्मांतील स्त्रियांविषयींच्या अनुदार कल्पना हिंदु धर्मांत घुसडून त्या पापखाणी मोक्षमार्गांतील वाटमाऱ्या, सुमार्गावरील मांगिणी, त्यांना मन नाहीं, आत्मा नाहीं, सदसद्विवेकबुद्धि नाहीं असें म्हणावें, तर कोणी याच्याहि पुढें जाऊन त्या उपभोगाचें साधन आहेत, त्यांचा वाटेल तसा लिलांव करावा, त्यांना पतीनें वाटेल तसें राबवावें, त्यांनीं पति सांगेल त्याप्रमाणें वागावें कारण पति हाच त्यांचा परमेश्वर, मग तो कितीहि स्वैराचरणी असो; त्यांनीं पतीची अनुज्ञा करतां कामा नये. असलें क्षुद्र व कोते विचार सनातन वैदिक ग्रंथांत मुळींच नाहींत. उलट स्त्री हा आत्म्याचा अर्धा भाग असून मनुष्य गृहस्थाश्रमी झाल्याविना तो पूर्ण होत नाहीं (असर्व) असें वाजसनेय ब्राह्मण प्रतिपादन करितो. "**गृहं तु गृहिणीहीनं कान्तारादतिरिच्यते**" गृहिणीहीन गृह अरण्यसदृश समजावें असें महाभारतांत म्हटलें आहे व त्यांच्याविषयीं जागोजाग उत्कृष्ट उद्गार काढिले आहेत. मनुस्मृतीमध्यें "**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः**" असें म्हटलें आहे. "स्त्री व पुरुष हीं द्विदल धान्यें एकदम निर्माण झालीं, ती एकमेकांची पूरक असून हे दोन्हीहि घटक तुल्यबल आहेत" असें

बृहदारण्यकोपनिषदांमध्यें वर्णन आहे. गृहपत्नीला "**सम्राज्ञी**" असें विशेषण अथर्ववेदामध्यें दिलें आहे. तेव्हां बौद्ध व इस्लाम धर्मांतील विचार उत्कृष्ट कीं, उपनिषदें, महाभारत, वेद व श्रुति-स्मृति इत्यादि वैदिक ग्रंथांतील विचार उत्कृष्ट याचा वाचक-वृंदांनीं विचार करावा.

वर विवेचित केलेल्या मतमतांतरामुळें व अनेक धर्मसांप्र-दाय निर्माण झाल्यामुळें मूळ सत्य धर्माचा जवळजवळ लोप झाला आहे. सामान्य मनुष्याला एकहि मार्ग सुव्यवस्थित दिसत नाहीं व तो मग अर्जुनाप्रमाणें "**किं कर्म किं कर्मेति**" असा प्रश्न करूं लागतो. अशा नानाविध परस्परविरोधी दृश्य-मान् होणाऱ्या गोष्टींपुढें भगवान् व्यासांनीं सुद्धां हात टेकले व त्यांनीं

## ( श्लोक )

**श्रुतिर्विभिन्ना स्मृतयश्च भिन्ना । नैको मुनिर्यस्य वचः प्रमाणम् ॥**
**धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां । महाजनो येन गतः स पंथाः ॥ १ ॥**

असे उद्गार काढले. श्रीसमर्थरामदासस्वामीसुद्धां या मतभेदामुळें व धर्मसांप्रदायामुळें आशंका घेऊन म्हणतात—

## ( अभंग )

**आतां कोणा शरण जावें । सत्य कोणाचें मानावें ।**
**नाना पंथ नाना मतें । भूमंडळीं असंख्यातें ॥**

आणि नंतर तेंच ईश्वरप्राप्तीची खूण सांगतातः—

रामदास सांगे खूण, भक्तिवीण सर्व शीण ॥

सांप्रतच्या काळाकडे नजर टाकली तरी असाच मतभेद चाललेला दिसून येईल. चांगले सुशिक्षित, तज्ज्ञ व विचारशील म्हणविणारे लोक देखील नानाप्रकारचे धर्मसांप्रदाय निर्माण करितात. उदा० आर्यसमाज, ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज इत्यादि अनेक समाज धर्माच्या नांवावर निर्माण होत आहेत. प्रत्येकजण स्वमताभिमानानें वेडा होऊन स्वतःचाच ' उदो, उदो, ' करीत आहे व आपली तळी उचलून धरीत आहे. शिवाय त्यांत सत्य काय तो मी आणि बाकीचे सर्व धर्म खोटे व अहितकर असाच आग्रही हट्ट चाललेला पाहिला म्हणजे तर मोठी मौज वाटते. यामुळेंच सत्य धर्म कोणता असा मनुष्याला व्यामोह उत्पन्न होतो. त्याला उत्तर हेंच देतां येईल कीं, मनुष्यानें स्वहितार्थ कांहींतरी अनुमानें काढून त्याला ' धर्म ' असें नामाभिधान दिलें. धर्म कांहीं आकाशांतून अगर स्वर्गांतून भूतलावर अवतीर्ण झालेला नाहीं. सर्व धर्म सत्यच असून त्यांतील मतेंहि ग्राह्यच आहेत परंतु बहुजनसमाजानें तीं तावूनसुलाखून घ्यावीं; आणि त्या मतांची सत्यता पहावी. येथें श्रद्धा मात्र पाहिजे. आठ आणि चार, नऊ आणि तीन, पांच आणि सात हें आंकडे घेऊन त्यांची बेरीज केली तर बाराच येणार हें जसें निश्चित आहे तद्वतच कितीहि धर्मसांप्रदाय निर्माण झाले तरी परमेश्वर हा अनाथांचा वाली व परमकृपाळू आहे हेंच तत्त्व त्यांच्या बुडाशीं असलेलें आढळून येईल. धर्माची व्याख्या

केली तर ' धर्म म्हणजे परमेश्वर प्राप्तीचा मार्ग ' अशी करतां येईल. आणि अशी व्याख्या केल्यास धर्माच्या नांवावर वितंडवाद करण्याची वास्तविक आवश्यकता नाहीं असें आमचें स्पष्ट मत आहे. गतानुगतिकत्वाचा मार्ग जसा त्याज्य तसा धर्माचा व्यर्थ कीस काढण्याचाहि मार्ग त्याज्यच होय, अशी कोणताहि सुज्ञ मनुष्य कबुली देईल. वाद उत्पन्न होण्याचें मुख्य सूत्र धर्मशास्त्राचा अभ्यास करणारे सुधारक, धर्मप्रवर्तक व पंडित यांच्याकडे आहे. खरें पाहूं जातां भूतलावर शांततेचें साम्राज्य नांदावें. मनुष्यप्राण्यांत प्रेमाची व ऐक्याची भावना वास्तव्य करीत असावी, प्रवृत्तिपरता, निष्कामकर्माचरण, सततोद्योग, औदार्य, विश्वबंधुत्व, सौजन्य इत्यादि अनेक गुणांचा मनुष्यमात्राचे ठायीं परिपोष व्हावा आणि त्याला परमेश्वराचें भव्य, उदात्त, व उन्नत स्वरूप दिसूं लागून त्याची पापाचरणाकडे प्रवृत्ति होऊं नये. हींच धर्माचीं खरीं तत्त्वें आहेत. ज्या धर्मामुळें वादविवाद उत्पन्न होऊन त्याचें रूपांतर द्वेष व मत्सर यांत परिणत होतें आणि एकमेकांचा छळ सुरू होऊन भयंकर रणें माजतात. अशा धर्माला खऱ्या धर्मविचारांत बिलकुल स्थळ नाहीं. असल्या धर्माचे अनुयायी नुसती शाब्दिक कसरत करीत असतात. अध्यात्मज्ञानाचा त्यांना गंधहि नसतो आणि धर्माचा भावार्थ व त्यांतील हृद्गतहि त्यांना यथातथाच नव्हे—बिलकुल कळत नाहीं. असाच शेवटीं या सर्व गोष्टींचा निष्कर्ष निघतो असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें.

ज्या वेळेस शंकराचार्य, रामानंद, चैतन्य, माध्व, रामानुज, वल्लभ इत्यादि वैदिक तत्त्वज्ञानविषयक पंथांचे पुरस्कर्ते संन्यासी आचार्य निर्माण झाले त्या वेळेस देखील निवृत्ति, द्वैताद्वैत, संन्यास वगैरे झगडे उत्पन्न होण्याखेरीज कांहींच निष्पन्न झालें नाहीं. जगाला उपयोगी असा धर्म कोणीच दिला नाहीं. उलट 'ब्रम्ह सत्यं जगन्मिथ्या' या दुर्बल वृत्तीलाच भरपूर अवसर मिळाला. सनातन वैदिक कर्मयोग आणि जयिष्णु, वर्धिष्णु व तेजस्वी असा धर्म यांचा संस्कार या कालांत जनतेच्या मनोभूमिकेवर मुळींच झाला नाहीं. जीं तत्त्वें, भावना व संस्कार समाजाच्या प्रगतीला आवश्यक होतीं त्यांची या कालांत चांगली जोपासना झाली नाहीं आणि म्हणूनच मुसलमान लोकांनीं वेळोवेळीं आर्यसंस्कृतीवर जोराचे आघात केले. यामुळें हिंदु धर्म अगदींच खिळखिळा होऊन गेला. त्यानंतर झालेल्या साधुसंतांच्या हातूनहि कांहींच कार्यनिष्पत्ति झाली नाहीं. कारण ते स्वतःच जर प्रपंचाचा द्वेष करीत असत तर ते जनतेला निष्कामकर्माचरणाचा, प्रपंच व परमार्थ यांच्या एकीकरणाचा आणि प्रवृत्तिपर वेदांताचा कित्ता घालून देणार कसा? तत्त्वविचाराला साधुसंतांनीं अगदींच फांटा दिला होता. त्रिविधतापानें हैराण झालेल्या, संसारतापामुळें पोळलेल्या, आणि जगांतील दुःखदायक गोष्टींमुळें सतावून गेलेल्या लोकांना मोक्षाधिकारी बनवून त्यांनीं भक्तिमार्गाचा पुरस्कार केला ही गोष्ट मात्र खरी आहे. पण त्यामुळें समाजाचा एक अति भयं-

कर असा तोटा झाला तो हा कीं, मोक्षाच्या एकदेशीय तत्त्वज्ञानामुळें व्यष्टिधर्माला बळकटी आली. आणि समष्टिधर्माचा पूर्णपणें लोप झाला. त्यांचा सर्व कल परब्रह्माची प्राप्ती कशी होईल इकडे होता. मग संसार, राज्य, सत्ता, समाज, राष्ट्र, स्त्री, पुत्र, वित्त यांची वास्तपुस्त कोण करतो ? पंढरीची वारी, एकादशी, आणि विठोबा यांतच त्यांचा सर्व वेदांत सामावलेला होता. या कालांत सहिष्णुवृत्तीचा तर कळसच झाला. प्रपंच आणि परमार्थ यांचें एकीकरण—समन्वय, 'Tit for tat' म्हणजे 'शठं प्रति शाठ्यम् ' अथवा 'जशाच तसें' कसें वागावें याचा धडा फक्त रामदासांनींच घालून दिला. अपकाऱ्यावर उपकार करण्याचा मारक वेदान्त न शिकवितां त्यांनीं 'अहिंसा परमो धर्मः ' हें धर्मवाक्य अन्य दृष्टीनें पाहण्यास समाजास शिकविलें. " देशसेवा हेंच खरें परब्रह्म आहे " याची शिकवण समर्थांनीं अखिल महाराष्ट्रियांस करून दिली. आणि तत्कालीन परिस्थितीला त्याच धर्माची आवश्यकता होती. धर्म कालमानाप्रमाणें कां बदलावा याचें रहस्य रामदासांच्या शिकवणींत प्रत्ययास येतें.

**"ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या"** आणि **"दिधलें दुःख परानें उसनें फेडूं नयेचि सोसावें"** या शिकवणीमुळें आम्हांला प्रवृत्तीपरतेपेक्षां निवृत्तीपरतेची व सत्त्वज्ञानापेक्षां तत्त्वज्ञानाची जास्त किंमत वाटणें सहजसिद्ध आहे. पण आमचें असें म्हणणें आहे कीं, परकीयांचे तुमच्या धर्मावर हल्ले झाले अथवा एकाद्यानें

प्रत्यक्ष तुमच्या स्त्रीवर अत्याचार केला तर तुम्हांला या दुबळ्या वेदान्ताचा कांहीं उपयोग होईल काय? तेथें " **यो यथा वर्तते स मनुष्यः तस्मिन् तथा वर्तितव्यं इति धर्मः** " याच धर्माची आवश्यकता आहे. साप, विंचू अगर एकाद्या क्रूर प्राण्याची हत्या केली अथवा त्यांचें तात्काळ निर्दलन केलें तर तुमचा वेदान्त तो अधर्म आहे असें मुळींच सांगत नाहीं. त्या वेळेस ' कंटकेन एव कंटकम् ' असें वागणें हाच श्रेष्ठ धर्म आहे. पुढील श्लोकांत काय सांगितलें आहे पहा——

**गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतम् ।**
**आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयत् ॥**

——मनुस्मृति ८, ३५०

म्हणजे आततायी—दुष्ट मनुष्य तो गुरु आहे, वृद्ध आहे किंवा बाल आहे कां विद्वान् ब्राह्मण आहे, याचा विचार न करतां त्याला बेशक, बेधडक एकदम ठार करावा. ज्या पुरुषाला राग येत नाहीं त्या पुरुषाचें विदुलेनें कसें वर्णन केलें आहे तें पहा——

**एतावानेव पुरुषो यदमर्षी यदक्षमी ।**
**क्षमावान्निरमर्षश्च नैव स्त्री न पुनः पुमान् ॥**

——महाभारत उ. १३२-३३

भावार्थः—ज्या पुरुषाला अन्यायाचा क्रोध येतो व जो अपमान सहन करीत नाहीं त्यालाच " पुरुष " अशी संज्ञा

शोभते—तोच पुरुष म्हणावयाचा. ज्या पुरुषाला राग, चीड व संताप येत नाहीं तो आणि नपुंसक सारखेच समजावें. म्हणून दुष्टांचा प्रतिकार करण्यास अवश्य शिकलें पाहिजे. नाहींतर तुकोबांनीं म्हटल्याप्रमाणें—

**गेली वीरसरी । मग त्यासि रांड मारी ॥१॥**
**मग नये तैसी सत्ता । गेली मागील आणतां ॥ २ ॥**
**भंगलिया चित्ता । न ये कशानें सांधितां ॥ ३ ॥**
**तुका म्हणे धीर । भंगलिया पाठीं कीर ( पीछेहाट ) ॥ ४ ॥**

अशी आपली अवस्था होईल. याकरितां खरा धर्म जाणून "**सावधान**" असावें. '**ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या**' असें तत्त्वज्ञान उराशीं कवटाळून प्रपंच आणि राष्ट्र यांच्या घातास कारणीभूत होऊं नये. आचार्योत्तरकालांत असल्या शिकवणीच्या निराशामय कल्पनेचें विष अशिक्षित जनता व रूढिवश आणि अंधानुकरणप्रिय स्त्रिया यांच्या हाडींमांसीं रोमरोमांत भिनल्यामुळेंच मुसलमानांनीं त्यांच्या दुर्बलवृत्तीचा फायदा घेतला. दया, क्षमा आणि शांति यांचा येथें (समाजामध्यें) चांगलाच पाय रोंवला गेला होता. हें शिवकालीन ऐतिहासिक सत्यावरून दृष्टोत्पत्तीस येईल आणि हल्लींसुद्धां हा मारक वेदांत राष्ट्रांतून नामशेष झालेला नाहीं.

मुसलमानांनीं गोमातेच्या माना चरचरां चिरून रक्ताचा सडा घातला तरी त्याचा आम्हांला राग येत नाहीं, परक्यांनीं

आमच्या देवाधर्माची नालस्ती केली तरी आमचें तापट रक्त सळसळत नाहीं, स्वतःच्या स्त्रीवर एखाद्या मदोन्मत्त गुंडानें घाला घालून तिचें पातिव्रत्य भ्रष्ट करण्याचा उद्योग आरंभिला तरी आमचें मस्तक तापून जात नाहीं, देवाची पालखी अगर भजनी दिंडी मुसलमानांनीं अडविली तरी आमच्या अंतःकरणांत प्रतिकार करावा अशी इच्छा उत्पन्न होत नाहीं, एवढेंच नव्हे तर, प्रत्यक्ष एकादा धटिंगण आमच्या नरडीला नख देण्यास प्रवृत्त झाला तरी सहिष्णुत्वामुळें आम्ही अगदीं थंड असतो. कारण तें " ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या " तें " शान्तितुल्यं तपो नास्ति " तें " न च धर्मो दयापरः " तें " क्षमा शस्त्रं करे यस्य दुर्जनः किं करिष्यति । अतृणे पतितो वन्हिः स्वयमेवोपशाम्यति " तें " दया क्षमा शांति । बाण अभंग हे हातीं " तें " का तव कांता कस्ते पुत्रः " ही आपपर सारखी मानण्याची निराशामय कल्पना—हें पारमार्थिक तत्त्वज्ञान आम्हांस मारावून टाकीत आहे. त्यामुळें वरील सर्व कृति " मिथ्या " समजून आम्हीं फक्त तें अज्ञेय व अज्ञात ब्रह्म तेवढें सत्य समजतों. तें अतीन्द्रिय व पारलौकिक ज्ञान यांनाच जास्त मोल देतों. पण त्यांनीं एवढेंच लक्षांत ठेवावें कीं, दुर्जनांचा—खलांचा वध करणें हाच श्रेष्ठतर धर्म आहे. भुजंगापेक्षांहि दुष्ट लोक अत्यंत क्रूर असतात, ते असे—

**सर्पः क्रूरः खलः क्रूरः सर्पात् क्रूरतरः खलः ॥**
**मंत्रेण शाम्यते सर्पो न खलः शाम्यते कदा ।। १ ॥**

सर्प हा मंत्रानें शांत होतो आणि खल हा कोणत्याहि उपायानें शांत होत नाहीं. कारण " अपानं मृत्सहस्रेण धौतं चास्यं कथं भवेत् " अपानद्वार ( गुदस्थान ) मृत्तिकेनें सहस्र वेळां धुतलें तरी तें मुख कसें होईल ? म्हणून तुकारामबुवा असा धर्म सांगतात कीं—

**पाया झाला नारू । तेथें बांधिला कापरू ॥**
**हें तो बिबव्याचें काम । अधमासी तो अधम ॥१॥**

समाजाच्या उपयोगी पडणारा हाच सर्वोत्कृष्ट धर्म होय.

वर विवेचन केलेल्या एकंदर गोष्टीवरून वाचकांचा असा गैरसमज होईल कीं, प्राचीन संतकवींनीं जी अलोट कामगिरी केली व समाजाला उपदेशामृत पाजिलें त्याविषयीं आम्हांस आदर व पूज्य बुद्धि नाहीं. ज्यांनीं प्रचंड स्वार्थत्याग करून लोककल्याण केलें, मोक्षमार्ग दाखवून दिला, ज्ञानभांडाराचा मार्ग मोकळा केला, अपार शारीरिक कष्ट सोसून बहुजन-समाजाला ज्ञानार्जनाची गोडी लाविली, " **वसुधैव कुटुंबकम्** " अशी उदार वृत्ति बनवून परोपकार केला आणि पारमार्थिक तत्त्वांची ओळख पटवून दिली, समाजाला परोपकार, सन्मार्ग, भूतदया इत्यादि गुणांची महति सांगितली त्यांच्याविषयीं आमच्या अंतकरणांत पूर्ण आदर वास करीत आहे. परंतु आमचें एवढेंच म्हणणें आहे कीं, हे '**सर्वं खल्विदं ब्रह्म**'चें तत्त्वज्ञान व्यव-हारांत नको. सर्व अन्याय, अपमान, अत्याचार, व जुलूम जबरदस्ती निमुटपणें सोसा व पूर्ण क्षमावृत्ती धारण करा हा

सहिष्णु व राष्ट्राला ठार मारण्याचा वेदान्त सांगणारे जे लोक आहेत, त्यांच्याशीं ज्याला कांहींतरी सारासारविचारशक्ति परमेश्वरानें दिली आहे तो मनुष्य विरोध केल्याखेरीज कसा राहील? हें ' **मिथ्या** 'चें तत्वज्ञान जिकडेतिकडे मायेचा बाजार व मायावाद यांचा सांवळागोंधळ घालतें. मग अशा दुर्बल व सामर्थ्यहीन पंगु समाजावर परके लोकांनीं कुरघोडी करून व त्याच्या भोंवतीं पारतंत्र्याचें पाश टाकून त्याला जखडून टाकला तर त्यांत कांहींच आश्चर्य नव्हे !

श्रीज्ञानेश्वर, श्रीनामदेव, श्रीएकनाथ, श्रीतुकाराम यांचे तत्वज्ञानविषयक विचार अत्यंत उच्च कोटींतले होते यांत तिळमात्रहि संशय नाहीं. पण निवृत्तिपरतेचे विचार कांहीं वेळेस बाजूस सारले पाहिजेत हेंहि तितकेंच खरें आहे आणि म्हणून आम्ही प्रवृत्तीपर वेदांतावर इतका जोर दिला आहे. तसेंच " **वादे वादे जायते तत्वबोधः** " हें जरी खरें आणि " **ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या** " हेंहि खरें; परंतु ज्यांना ब्रह्मज्ञान, अध्यात्मविद्या आणि निवृत्तिमार्ग हीं प्रिय व प्रशस्त वाटत असतील त्यांनींच हा मार्ग स्वीकारावा असें आमचें मत आहे. सामान्य जनांस देशसेवेचाच मार्ग दाखवून देणें अधिक इष्ट आहे. अनाथअपंगांची सेवा करणें हाहि एक ईशसेवेचाच मार्ग नव्हे काय?

आमचा वेदांत दुबळा नाहीं. त्यांत अग्नीची प्रखरता, शस्त्रास्त्रांची तीक्ष्ण धार, चंडरश्मीची तेजस्विता, सौदामिनीची चमक एकवटली आहेत. तो वर्धिष्णु, जयिष्णु आणि सनातन

आहे. त्याला सहिष्णु साधुसंतांनीं बनविला आहे. म्हणून धर्मवीरहो! धर्मानें चाला, परंतु तुम्ही कांहीं विशिष्ट प्रसंगीं रागावलें हें पाहिजेच. कारण कांहीं विशिष्ट प्रसंगीं रागावणें हा धर्म होतो. तो कसा याचें विवरण वर आलेंच आहे. प्राचीन व अर्वाचीन धर्मग्रंथ यांची किंमत अमोल आहे व त्यांचें तत्त्वज्ञानहि लाखमोलाचें आहे पण अशिक्षित जनता त्या तत्त्वांचा दुरुपयोग करते आणि म्हणूनच त्यांना तत्त्वज्ञान व व्यवहार यांची सांगड घालून देणें जरूर आहे.

कित्येक लोक आम्ही प्रवृत्तीपर वेदान्त सांगितल्यामुळें आमचा अनत्याचारित्वाच्या चळवळीला विरोध आहे अशी कल्पना करतील. पण आमचें तर उलट असें म्हणणें आहे कीं, सांप्रतकाळीं आपण हाच धर्म पाळला पाहिजे. पूर्वकालीं आमच्याजवळ जीं साधनें होतीं तीं हल्लीं नसल्यामुळें 'ठोशास ठोसा' हें तत्त्व आमलांत आणून कसें चालेल? महात्मा गांधींनीं जी निःशस्त्रप्रतिकाराची चळवळ सुरू केली आहे ती वेदान्ततत्त्वास धरूनच आहे. तेव्हां गांधींनीं अनत्याचार हा धर्म बहुजनसमाजाला सांगून एक प्रकारें वेदान्ताचाच अवलंब करण्यास त्यांना शिकविलें आहे. धर्म हा जगविणारा असल्यामुळें त्यांत परिस्थितीनुरूप फेरफार करणें इष्ट आहे.

"**अदीनाः स्याम शरदः शतम्**' आणि "**मुहूर्तं ज्वलितं श्रेयः न च धूमायितं चिरम्**" इत्यादि तत्त्वांची वेदांतांतील शिकवण आपणास जगांत तेजस्वी वृत्तीनें राहण्यास

सांगत आहे. जशीजशी परिस्थिती निर्माण होईल तशी तशी कालानुसार आपण आपली धर्माची व्याख्या बदलावी पण त्या-बरोबरच हेंहि लक्षांत ठेवावें कीं, मूळ सत्य धर्माला धक्का लागेल असें वर्तन कदापि करूं नये. व "**गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत्**" असें समजून मनुष्यानें धर्माचरण करावें. स्वामी रामतीर्थ म्हणतात "धर्म हा हिंदु जनतेची किंबहुना सर्व जगताची स्थिती सुधारण्यास एकच रामबाण उपाय आहे." तेव्हां धर्माला थोतांड म्हणून कोणाचे चालावयाचें नाहीं. जे म्हणत असतील त्यांनीं एवढेंच लक्षांत ठेवावें कीं, या थोतांडाच्या जाळ्यांत अनेक नव्हे जवळजवळ सर्वच सांपडले आहेत आणि ज्यांनीं धर्मावर श्रद्धा ठेविली त्यांचें कांहींहि वाईट झालें नाहीं. एकाद्दुसरा अश्रद्धावान् मनुष्य अपवादा-दाखल सांपडतो. धर्माच्या दोन बाजू आहेत. एक अध्यात्म-विद्या व धर्ममतें आणि दुसरी धर्माचरण. यांत बहुजनसमाजाला दुसऱ्या गोष्टीची आवश्यकता आहे. कारण अध्यात्मविद्येचा मार्ग मोठ्या विद्वान् मनुष्याला देखील गहन, दुर्गम व दुर्बोध आहे. आणि धर्माचरण किंवा आत्मकर्तव्य हें एखाद्या लहानग्या बालकासहि सुबोध आहे. जीझस् ह्यास एका गृहस्थानें धर्मा-विषयीं प्रश्न केला तेव्हां त्यानें उत्तर दिलें—

( श्लोक )

निष्ठा प्रभूवरि अनन्य तुझी असावी ।
तूं आपुल्यासम जनांवरि लोभ ठेवी ॥

**तत्त्वें अशीं उभय वागविं तूं मनांत।**
**सद्धर्मसार सगळेंच असें तयांत ॥ १ ॥**

या श्लोकांत मनुष्येतर प्राण्यांचा स्पष्ट उल्लेख नसल्यामुळें दुसरें तत्त्व विशेषसें व्यापक वाटत नाहीं. पण त्यावरून एवढेंच प्रत्ययास येतें कीं, निराश्रित व विपत्तीनें गांजलेल्या मनुष्यांचा समाचार घेणें व त्यांस सहाय्य करणें, स्वतः निष्कलंक राहून परोपकार करणें हाच सत्य व शुद्ध असा धर्म होय. परलोकप्राप्तीकरितां व मोक्षाकरितां आपण संसाराचा त्याग करून वैराग्य धारण करावें असें धर्माचें सांगणें नाहीं. संसारांत राहूनहि निरपेक्षबुद्धीनें व निष्कामतेनें नेमलेलें कर्तव्य आपणांस बजावितां येतें. त्याला 'कर्मयोग' असें धर्मानें नांव दिलें आहे. इहपरलोकीं निर्भेळ सुख लाभावें—प्राप्त व्हावें—असें आपणांस वाटत असेल तर भगवद्गीता निष्कामकर्माचरणाचा जो मार्ग दाखवून देत आहे त्या मार्गाचा अवलंब करावा. "**योगः कर्मसु कौशलम्**" यालाच योग म्हणतात.

कित्येकजण धर्माच्या नांवावर बलिदान करण्याची पद्धत प्रचारांत आणतात. कारण काय तर देवाला मांस प्रिय आहे आणि परमेश्वर तें त्यांच्या जवळ मागतो. किती या क्षुद्र व बावळ्या कल्पना ? कधीं कधीं तर नरबलि दिल्यानें देवता संतुष्ट होतात अशा कांहीं रानटी लोकांच्या कल्पना आहेत. ईश्वर जर दयाळू आहे तर त्याला ही हिंसा मानवत असेल काय ? ज्यानें "**अहिंसा परमो धर्मः**" असें धर्मवाक्य

घालून दिलें तो 'मला नरमांस किंवा पशूंचें मांस द्या' असें कधीं तरी म्हणेल काय ? तो जर असली मागणी करीत असेल तर तो क्रूर, स्वार्थी, दयाहीन, निष्ठुर, मत्सरी, द्वेषी, पोरकट, थिल्लर व आकस धरणारा असा भयंकर केवळ सैतानवतच असला पाहिजे. शिवाय इतकें करूनहि त्या देवता—तो देव—संतुष्ट होतो कीं नाहीं किंवा तृप्त होतो कीं नाहीं याची वानवाच आहे. अरेरे ! केवढें हें अज्ञान ?

तसेंच तें विटाळचांडाळाचें थोतांड, शकुनापशकुनांचीं भूतें, एक कीं दोन धर्माच्या नांवावर वाटेल तसा धांगडधिंगा घातला जात आहे. एका ग्रंथांत म्हटलें आहे:—

" एकाद्या मनुष्यास पृथ्वीचें राज्य मिळालें असलें, तथापि जर तो मनुष्य धर्मापासून भ्रष्ट झाला असेल तर त्याचें जिणें व्यर्थ होय. धर्मच्युत मनुष्यास जो कोणी धर्मनिष्ठ करील त्याच्या पायांत त्यानें आपल्या कातडीचे जोडे करून घातलें तरी देखील तो आपल्या उपकारकर्त्याचा उतराई होणार नाहीं. "

—सेंट माथ्यूज.

म्हणूनच आपणांस वामन पंडित म्हणतात—

( श्लोक )

काळ चोर घिरट्या घरिं घाली । पामरा निज कशी तुज आली ॥
जाग तूं निशिदिनीं लवलाहें । जातसें वय अमोलिक पाहें ॥

वर यथामति सांगितलेले विचार " भिन्नरुचिर्हि लोकः" या न्यायानें कोणास रुचतील तर कोणास रुचणार नाहींत. कारण मतवैचित्र्यामुळें एकाला जी गोष्ट चांगली दिसेल ती दुसऱ्याला चांगली दिसेलच असें नाहीं.

( आर्या )

बा गा धर्माच्या तो कोणी सोडुं नयेचि कांसेतें ।
निष्फल होती मेघें त्यजिली आलीहि जीविका सेतें ॥ १ ॥
निजहितकर धर्माचें कुशलें विटवुं नयेचि मन कांहीं ।
यापरि पोषण-पालन-लालन करिजे न अन्य जनकांहीं ॥२॥
अंभोदास पहाती जैशीं पसरोनि नित्य आ शेतें ।
धर्मासि तशीं भूतें करि पूर्ण समर्थ हाचि आशेतें ॥३॥
साधु म्हणति जो न करी धर्माशीं नीतिशीं विरोधा त्या ।
रक्षीं व्यसनीं तदितर जन उदकीं लोष्टसा विरो धात्या ४

सर्वांग सुंदर ] [ सर्वांग सुंदर

नवयुगमाला

तिसरें वर्ष ऑगष्टपासून सुरू झालें. ४ आण्यांचीं पोष्टाचीं तिकिटें पाठवून—

नमुना अंक मागवा.

पत्ता—'नवयुगमाला' कार्यालय, पुणें नं. २

## प्रकरण सहावें

# यशाची गुरुकिल्ली

In the world's broad field of battle,
In the bivouac of life,
Be not a dumb, driven cattle;
Be a hero in the strife.

Trust no future, however pleasant;
Let the dead past bury its dead;
Act, act in the living present,
Heart within and God o'er head.

—Longfellow.

न्याहाळूनि निरोकितां मजपुढें आकार आभासला ।
पाठीला फिरवूनि तो मजकडे होता झणीं चालिला ।
मी पाठीवर त्याचिया ' फुकट ' जो घालीवला तास तो !
ज्वालाहि लिहिलें, असें निरखितां, तो गुप्तता पावतो !॥
'धिङ् माम्' बोलत अश्रु ढाळित, पदें मागें जरा गाळित
पश्चात्ताप अधोमुखें मजमधें तो जाय संचारत ॥

—केशवसुत, 'फुकट दवडलेला तास'

All things are best fulfilled in their due time;
And time there is for all things—Milton.

अनवरत कर्म, अविश्रांत परिश्रम, सततोद्योग ह्याच प्रापंचिकांचा अत्यंत श्रेयस्कर धर्म—श्रेष्ठतर योग होय.

—स्वामी रामतीर्थ, ( भाग ५ फडके व बर्वे )

(श्लोक)

यो हि कालो व्यतिक्रामेत्पुरुषं कालकांक्षिणम् ।
दुर्लभः स पुनस्तेन कालः कर्मचिकिर्षुणा ॥

भावार्थः—जो मनुष्य एकादें कार्य करण्याची उत्तम संधि इच्छीत असून ती आली असतां दवडतो, त्याला पुनः तें कार्य करणें झाल्यास तशी संधि मिळत नाहीं.

—महाभारत

A man of pleasure is a man of pain.

—Edward young

Tomorrow is a period nowhere found, unless perchance in a fool's calendar.

—Cotten.

आपला उत्कर्ष व्हावा, अलोट संपत्ति मिळावी, चारचौघांत मानमान्यता वाढावी आणि सर्व आयुष्य सौख्यांत व आनंदांत जावें असें न वाटणारा मानवप्राणी या पृथ्वीच्या पाठीवर एकहि सांपडणार नाहीं. प्रत्येकाची यश मिळण्यासाठीं अहमहमिका चाललेली आहे. प्रत्येकजण फलप्राप्त्यर्थ झटत आहे. या सर्व धडपडी केवळ सुखास्तव आहेत. आणि मनोरथांच्या

पूर्ततेस्तव आहेत. सुख मिळावें अशी प्रत्येकाची इच्छा असते खरी पण मनःकल्पित मनोरथ सत्यसृष्टींत उतरण्यास प्रचंड इच्छाशक्ती, अनन्यसाधारण चिकाटी, अविश्रांत उद्योग, दांडगा उत्साह, अलोट धैर्य, खंबीर मन व बळकट निर्धार यांचें साहचर्य पाहिजे. कर्तव्यानुसंधान ठेऊन व सतत कार्यव्यापृत राहून उत्कर्षाचा मार्ग नेटानें, हिंमतीनें आणि धडाडीनें पार पाडला पाहिजे. संपूर्ण यशस्वितेचें, अभ्युदयाचें व सुख प्राप्तीचें रहस्य भगवद्गीतेंतील " **सततं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः !** " या सूत्रमय वाक्यांत आहे. नुसती प्रचंड इच्छाशक्ती असून तिला जर कृतीचें पाठबळ नसेल तर त्या जोरदार इच्छाशक्तीचा तिळमात्रहि उपयोग नाहीं. पोकळ मनोरथ करून केव्हांहि कार्यसिद्धी होणार नाहीं. तेथें उद्योग, उद्योग आणि उद्योगच केला पाहिजे. कारण सर्व कार्यें उद्योगानेंच सिद्ध होतात. केवळ मनोराज्यानें—मनोरथानें—होत नाहींत. निद्रिस्त केसरीच्या मुखांत मृग आपण होऊन प्रवेश करील नाहीं. तेथें " क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे " ही तुकोबांची उक्ति लागू पडते. " आपणांस यशःप्राप्ति व्हावी, आपली भरभराट व्हावी व उत्कर्ष व्हावा अशी जर तुमची इच्छा असेल, तर तुमच्या नित्य आणि नैमित्तिक कर्मांत, प्रत्येक व्यवहारांत या क्षुद्र शरीराचा होम केला पाहिजे. राबवून राबवून शरीर आणि मन हीं नाहींशीं करून टाकलीं पाहिजेत. " असें स्वामी रामतीर्थ म्हणतात. म्हणून सुखप्राप्ती

व्हावी अशी इच्छा असल्यास सततोद्योग हाच त्याला रामबाण उपाय आहे. लक्ष्मी ही उद्योगी पुरुषालाच माळ घालते व त्याचेंच पाणिग्रहण करते. निरुद्योगी व आळशी मनुष्याकडे ती ढुंकूनहि पहात नाहीं. उद्योगप्रिय मनुष्यानें आलस्यराजांना आपल्या शरीरांतून हद्दपार करावें व उद्योगाची—कर्तव्याची-सोबत करावी. कारण—

( श्लोक )

**आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महान् रिपुः।**
**नास्त्युद्यमसमो बंधुः कुर्वाणो नावसीदति ॥ १ ॥**

—भर्तृहरि

" आळस हा मनुष्याच्या शरीरांत राहणारा त्याचा एक प्रचंड शत्रु होय आणि उद्योग हा त्याचा बंधु होय. उद्योग करणारा मनुष्य कधींहि कष्ट पावत नाहीं. " तो एक आपला आप्त असून त्याची मैत्री केल्यास आपल्या आंगीं जगांतील मोहमाये-पासून अलिप्त राहण्याचें सामर्थ्य निर्माण होतें.

जगांत जे आपणांस अलौकिक थोर पुरुष दृष्टोत्पत्तीस येतात त्यांच्या यशाची गुरुकिल्ली ' दीर्घोद्योग ' व ' वेळेच सदुपयोग ' यांतच होती असें त्यांचें चरित्र पाहूं जातां आप-णांस आढळून येईल. मोठमोठे राष्ट्रधुरिण, महत्पदावर विराज-मान झालेले महात्मे, प्रतिभासंपन्न कवि, उत्कृष्ट ग्रंथकार, जगांत कीर्तिरूपानें उरून अजरामर झालेले महान् तत्त्ववेत्ते, पंडित,

वक्ते, सेनापति, एकाद्या संस्थेचे जनक किंवा चालक इत्यादिकांचीं चरित्रें आपल्या डोळ्यांपुढें हीच गोष्ट ठळकपणें आणतात कीं, त्यांनीं वेळेचा सदुपयोग करून दीर्घोद्योग केला. " **नष्टा वेला या गता सा गतैव** " आणि " **अमोल काया जाइल वांयां जशी कांच कीं फुटे फटकन्** " हें सदैव ध्यानांत ठेवून तें अंगीकृत कार्यांत मग्न झाले. ते कोणताहि उद्योग अत्यंत कळकळीनें, एकाग्रतेनें, निःस्वार्थ बुद्धीनें व पद्धतशीरपणें करीत असत. " **श्वःकार्यमद्य कुर्वीत पूर्वाह्णे चापराह्णिकम्** " अशी त्यांची व्यवहारांत वागणूक असे म्हणूनच यश त्यांच्या मालकीचें झालें. "**यशःश्री पायींची दासी** " झाली. लो० टिळक, महात्मा गांधी, न्या. मू. रानडे, आगरकर तसेंच पाश्चात्य देशांतील पंडित मोर्ले, टॉमस आल्वा एडिसन, डॉ० जॉन्सन, सर वॉल्टर स्कॉट, राजकार्यधुरंधर मुसोलिनी, इतिहासकार रॉबर्टसन किंवा जगांतील दुसरे कित्येक थोर पुरुष यांच्या उत्कर्षाचें रहस्य आपणांस हेंच सागतें कीं त्यांनीं आपला निष्कारण वेळ कशांतच खर्ची न घालतां " क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत् " या वचनानुरूप ज्ञानार्जन केलें.

( श्लोक )

**मोठे महत्वगिरिशेखरीं बैसताती ।**
**उड्डाण एक करुनी नच तेथ जाती ॥१॥**

जेव्हां दुजे जन सुषुप्तित मग्न होती ।
हे तेधवां सतत उद्यम चालवीती ॥ १ ॥

——ॲबटकृत, नेपोलियनचें चरित्र

हेंच त्यांच्या अभ्युदयाचें व उत्कर्षाचें खरें रहस्य होय.

सृष्टि देखील आपणांस हाच धडा शिकविते. रानांतील वनस्पति किंवा पुष्पें यांच्याकडे पहा. त्यांचा उद्योग अखंड चाललेला आहे. परकार्याकरितां देह झिजविणें हा फुलांचा तर गुणधर्मच आहे. पुढील वर्षीं उत्पन्न होणाऱ्या फुलांच्या उपयोगाकरितां प्रत्येक फूल आपल्या मुळांत जीवन सांठवून ठेवीत असतें. त्याप्रमाणेंच मधुमाक्षिका पिपीलिका यांचे परिश्रम अवलोकन करा. मनुष्य करीत नसेल इतका त्यांचा दीर्घोद्योग चाललेला असतो. कोळ्यासारखा यःकश्चित् प्राणी देखील यशःसिद्धी प्राप्त होईपर्यंत थांबू नकोस असाच आपणांस बोध करीत आहे. पण हें सर्व दिसण्यास ज्ञान मिळविलें पाहिजे आणि ज्ञान मिळविण्यासाठीं दीर्घोद्योग केला पाहिजे. शेक्सपिअर म्हणतो, " ज्ञानी मनुष्याला अरण्यांतील वृक्षांत आपणांपाशीं प्रेमसंवाद करणाऱ्या जिव्हा, पर्वतांतून वाहणाऱ्या निर्झरांत तात्त्विक वाङ्मय, आणि पाषाणांत धर्मग्रंथ यांचें दर्शन घडतें. " भगवद्गीतेंत देखील " **न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते** " असें म्हटलें आहे. तात्पर्य काय कीं, ज्ञानासारखी पवित्र वस्तु मिळण्यासाठीं आपण वेळेचा

सदुपयोग करून शंकराचार्यांनीं चर्पटपंजरींत म्हटल्याप्रमाणें "**दिनमपि रजनी सायंप्रातः शिशिरवसन्तौ पुनरायातः**" इतकी एकसारखी सृष्टीची घडामोड चालू असली तरी आपला दीर्घोद्योग चालू ठेवावा व जें कार्य हातीं घेतलें जाईल तें "**देहं वा पातयेत् । इष्टं वा साधयेत्**" इतक्या प्रचंड निर्धारानें व दृढनिश्चयानें चालू ठेवावें. मग त्या मनुष्याला इच्छित फल मिळाल्याखेरीज कसें राहील ? कारण " **निश्चयाचें बळ तुका म्हणें तेंचि फळ** " इच्छाशक्तीचें बळच तेवढें प्रचंड असतें.

कित्येकांना उद्योग हें एक मोठें संकट व त्रास वाटतो. परंतु उद्योगानें अद्वितीय अशा सुखाचा व आनंदाचा लाभ होतो. प्रपंचांतील विवंचना, संकटें आणि दुःखें यांची विस्मृति केवळ उद्योगानेंच होतें. "भुकेला कोंडा आणि निजेला धोंडा" या म्हणींतील सार शोधून पहावें म्हणजे आमचे मताची सत्यता कळून येईल. मनःशांतता आणि शारीरस्वास्थ्य हें उद्योगानेंच प्राप्त होतें. कारण शरीर व मन हीं दोन्हीं कामांत गढून गेलीं म्हणजे आपोआपच बाह्यसृष्टींतील घडामोडींचा आपणांवर परिणाम होणार नाहीं. उद्योग अनेकविध असून प्रत्येकाचें सुख आपणांस वेगवेगळ्या प्रकारचें होतें. एका उत्कृष्ट ग्रंथकारानें आपल्या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, " शेतांत काम करणें हा सर्वोत्कृष्ट उद्योग आहे. तेथें आपणांस मोकळ्या व ताज्या हवेचा भरपूर लाभ होऊन व्यायामही चांगला घडतो.

तेथें नेत्रांना सृष्टिसौंदर्याचे रमणीय देखावे दिसतात. पक्षांचे मधुरालाप ऐकून चित्त संतोषित होतें. पशूंच्या नानाविध लीला दृष्टिगोचर होतात. सृष्टींतील अनेक चमत्कृति निदर्शनास येऊन ईश्वरावरील श्रद्धा द्विगुणित होते. पुष्पपरिमलानें किंवा इतर कांहीं वनस्पतींच्या वासानें घ्राणेंद्रिय तीक्ष्ण होतें. वनस्पतींची उत्पत्ति, वृद्धि व लय दृष्टोत्पत्तीस येऊन सृष्टीच्या रहस्याचा उलगडा होतो. शिवाय हें कार्य हा उद्योग इतका आल्हाददायक आणि पवित्र आहे कीं, त्यांत मलिनतेचा, अपवित्रतेचा व पापाचा यत्किंचितहि गंध नाहीं. " कित्येकांना लेखनव्यवसायांत मनोरमता वाटेल. प्रत्येकजण आपापल्या ध्येयानुरूप उद्योग करील. परंतु कोणताहि उद्योग करीत असतांना तो यशस्वी रीतीनें पार पाडला पाहिजे व त्यांत पूर्ण एकाग्रता धारण केली पाहिजे.

**" ब्रह्मानंदीं लागली टाळी। कोण देहातें सांभाळी "**

या कव्युक्तीचा अनुभव व्यवहारांत घडला पाहिजे म्हणजे तो मनुष्य ' यशोमंदिर ' गाठणार हें निश्चित समजावें. श्रीसमर्थ म्हणतात:—

## ( ओंव्या )

**सुखा अंग देऊं नये । प्रेत्न पुरुषें सांडो नये ।**
**कष्ट करितां त्रासों नये । निरंतर ॥ १ ॥**
**गुप्त तेंचि प्रगटवावें । असाध्य तेंचि साधावें ।**
**कानडेंचि अभ्यासावें । सावकाश ? ॥ २ ॥**

**विवेकाचें फळ तें सुख । अविवेकाचें फळ दुःख**
**आनंद सांडोनियां शोक । कैसा घ्यावा ? ॥ ३ ॥**

कांहीं लोकांची अशी एक कुरकुर नेहमीं ऐकण्यांत येतें कीं, मनुष्यास क्षणभरसुद्धां विश्रांति नको काय ? आजन्मपर्यंत मनुष्याच्या पाठीमागें उद्योग लागलेलाच आहे. त्याला जर विश्रांति नसेल तर सुखप्राप्ति कशी होईल ? या शंकेचें निराकरण किंवा समाधान असें आहे कीं, विश्रांति याचा अर्थ स्वस्थ हात जोडून व डोळे मिटून बसणें नव्हे किंवा व्यसनांत, कलहांत आणि निद्रेंत कालक्षेप करणें असाहि नव्हे. विश्रांति म्हणजे कामाचा पालट. अगदीं कांहीं एक न करतां स्वस्थ बसणें म्हणजे जाणूनबुजून काळाचा आणि पर्यायानें आयुष्याचाहि नाश करण्यासारखें आहे. कांहींतरी उद्योग हा केलाच पाहिजे. अगदीं क्षुल्लक कर्तव्यांत देखील हयगय अगर हेळसांड करतां कामा नये. असली विश्रांति ही खरी विश्रांति नव्हेच. रस्किन्‌नें असल्या विश्रांतीमुळें काय तोटा होतो तें फारच मार्मिक शब्दांत सांगितलें आहे. तो म्हणतो "आपली विश्रांति फत्तराच्या अढळ स्थिरतेसारखी होऊं देऊं नये. धोंड्यांचें वैभव जोंपर्यंत विद्युल्लतेच्या तडाक्यानें व जलाच्या लोटानें ते इकडे तिकडे लोटले जातात तोंपर्यंत चिरस्थायी स्वरूपाचें वाटतें. परंतु जेव्हां जलाचे लोट शांत व स्तब्ध होतात, वादळाचें उग्र रूप जाऊन त्याची इतिश्री होते, तेव्हां ह्या धोंड्यांचें बाह्यांग शेवाळानें व गवतानें भरगच्च भरून जातें व तें कृमिकीटक

खाऊन फस्त करतात. व शेवटीं नांगरलें जाऊन कायमचें धुळीस मिळतात. " वरील विश्रांतीची हुबेहुब अशीच स्थिति होते. तेव्हां असली विश्रांति मिळण्याची कोणीहि इच्छा करूं नये.

नेपोलियन बोनापार्ट म्हणत असे कीं, "एक क्षणहि व्यर्थ दवडूं नये. कारण त्यायोगें दुर्दैवाला आपल्या पाठीमागें लागण्याची संधि मिळते." विश्रांति घ्यावयाची ती आपल्या कार्यक्रमांत फेरबदल करून घ्यावी. म्हणजे अशी कीं, पुस्तक वाचून कंटाळा आल्यास मोकळ्या हवेंत सहल करण्यास जावें किंवा पेटी, तबला, सारंगी, दिलरुबा, अलगुज, सतार अथवा ग्रामोफोन—जीं आपणाजवळ करमणुकीचीं साधनें असतील त्यांत मन रमवावें. शेतांत काबाडकष्ट करून शीण आल्यास एकाद्या ग्रंथाचें वाचन करावें. लेखनव्यवसायानें कंटाळा वाटत असल्यास बागेंत जाऊन निरनिराळ्या फुलांचें अवलोकन करावें; नाहींतर एकादें उद्बोधक, नितांतसुंदर, चटकदार व हृदयंगम असें काव्य वाचून मन आनंदित करावें. काव्याचा कंटाळा आल्यास एकाद्या सद्ग्रंथाचें पठन करावें. भगवद्गीता, मनाचे श्लोक, शंकराचार्यांचा आत्मबोध असलीं लहानसहान पुस्तकें खिशांत बाळगणें फार चांगलें. कारण आपणांस तीं कुठेंहि चटकन् वाचतां येतात. हेंहि एक प्रकारचें करमणुकीचें साधन आहे. अश्लील व कुमार्ग दर्शविणारीं पुस्तकें यांचा उत्कर्षेच्छु मनुष्यानें त्याग करावा. असा आपल्या कार्यक्रमांत फेरबदल

झाल्यास उद्योग होऊन शिवाय ज्ञानहि मिळतें. आणि विश्रांतीचें सुखहि लाभतें असा यांत दुहेरी तिहेरी फायदा होतो; आणि मन सदैव सुप्रसन्न, शांत, उत्साही व शरीर कार्यप्रवण राहण्यास याच विश्रांतीची आवश्यकता आहे. वेळेच्या सदुपयोगाबद्दल चेस्टरफील्ड यानें आपल्या पुत्रास जो उपदेश केला आहे तो वाचकांनीं नेहमीं ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. त्यानें आपल्या पुत्रास असें उद्देशून म्हटलें आहे कीं, " बाबारे, आपलें आयुष्य अत्यंत अल्प आहे. तेव्हां तूं जितका निष्कारण वेळ घालविशील तितका तूं आपल्या कल्याणास मुकलास आणि जितक्याचा तूं सदुपयोग केलास तितकें तूं आपलें धन शहाणपणानें व्याजीं लावलेंस असें समज म्हणून वेळेचें मोल मनांत आण. त्याची मूर्खपणानें उधळपट्टी करूं नको. व ज्या क्षणाचा तुला लाभ होईल त्या क्षणाचा चांगला उपयोग कर. " आळसांत दिवस घालविणें हें खरोखरीच वाईट आहे. गेलेली घटका आपणांस कालत्रयींहि परत मिळवितां येणार नाहीं. " Time is money " किंबहुना पैशापेक्षांही वेळेचें महत्त्व अधिक आहे. धनुष्यापासून सुटलेला बाण जसा परत येणार नाहीं त्याप्रमाणेंच गेलेला वेळ आपले हातीं लागणार नाहीं. अमृतराय म्हणतात कीं बाबांनो " गेली आजची घडी न ये उद्यां" म्हणून कसून परिश्रम करा. श्रीसमर्थ देखील म्हणतात " ऐका सुदैवपणाचें लक्षण। रिकामा जाऊं नेदी एक क्षण " (१३–३) त्याप्रमाणेंच बर्न्स नामक कवीनें म्हटलें

आहे.—"If you take care of minutes, the hours will take care of themselves." तेव्हां आपला केवळ प्राणच असा जो वेळ तो वृथा न वेंचता सांपडेल तो क्षण उद्योगांत घालवावा हाच जीवित-साफल्याचा सुंदर मार्ग आहे. स्वामी रामतीर्थ म्हणतात:—" कुजट पाण्यानें भरलेल्या डबक्याप्रमाणें आळशी न बनतां धैर्यानें आणि नेटानें कार्य-तत्पर व्हा; कामाची कशी तरी वेठ न वळतां सर्व क्रिया लीलेनें होऊं द्या; संशयग्रस्त स्थितींत न रहातां चित्त शांत आणि स्वस्थ असूं द्या; आपसांत फूट पडूं न देतां संघशक्तीचा आश्रय करा; परंपरागत रूढीचें गळ्यांत लोढणें अडकवून न घेतां कालानुसार सुधारणा करीत जा; रिकामी प्रौढी न बाळ-गतां व वटवट न करतां अंतःकरणांत खरी व दृढ कळकळ असूं द्या. काल्पनिक मनोराज्यांत भराऱ्या न मारतां वास्तविक स्थितींतील काव्याचा आस्वाद घ्या; 'बाबावाक्यं प्रमाणम्' या गतानुगतिकत्वाच्या तत्त्वाला फांटा देऊन प्रमाणशुद्ध तत्त्वें ग्रहण करा. वेदान्ताच्या सिद्धान्ताची पोपटपंची न करतां जिवंत ज्ञान अंगीं बाणवून घ्या व ह्यालाच "**प्रवृत्तीपर वेदान्त**" असें म्हणतात." (स्वामी रामतीर्थ, फडके व बर्वे, भाग ५) एवंच काय कीं अंतःकरणापासून व मनापासून कोणतेंहि कार्य करावें म्हणजे तें कर्म विश्रांतीरूपच आहे. वेदान्तदृष्ट्यादेखील हेंच कर्म विश्रांतीरूप होतें. भगवद्गीतेंत म्हटलें आहे:—

**कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ।**
**स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥** –गीता. ४।१८
**तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ।**
**असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ॥** –गीता. ३।१९

तेव्हां कर्म करणें हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे. कर्म करावयाचें नाहीं असें म्हटलें तरी आपलें चालणार नाहीं आणि कर्म करीत राहणें हाच यशःप्राप्तीचा खरा मार्ग आहे. उद्यमाविना कांहींहि प्राप्त होणार नाहीं " **नोद्यमेन विना राज्यं न सुखं न च वै यशः ।** " ( देवीभागवत, पंचमस्कंध, अध्याय ५ ) हें त्रिवार सत्य होय. बायबलांत म्हटलें आहे. " **ज्याला शाश्वत जीवित हवें असेल, त्यानें अगोदर मरण्याला तयार झालें पाहिजे.**

"For whosoever will save his life shall lose it : and whosoever will lose his life for my sake shall find it. " ( St. Matthew, chapter 16-25) म्हणून ज्यांना खरा उद्योग करावयाचा असेल त्यानीं **पश्यन्शृण्वस्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपन्श्वसन्** " ( गीता ५।८ ) पहातांना, ऐकतांना, स्पर्श करितांना, वास घेतांना, खातांना, चालतांना, निजतांना आणि श्वासोच्छ्वास करितांना एकसारखा उद्योगाचा ध्यास घ्यावा इतके अखंड परिश्रम–अविरत कर्म-जो मनुष्य करील त्याला रुपयांतील बारा आणे तरी यश आलेंच पाहिजे असा त्रिकालाबाधित सिद्धांत आहे.

दुसरे कित्येक लोक यावरहि अशी तक्रार करतात कीं, " आम्ही तुमच्या म्हणण्याप्रमाणें झटून उद्योग केला आणि एक पळहि व्यर्थ दवडिलें नाहीं तरी आमचें दैव जर प्रतिकूल असेल तर त्याचा काय उपयोग ? कारण " यत्पूर्वं विधिना ललाटलिखितं तन्मार्जितुं कः क्षमः " पूर्वी जें कांहीं ब्रह्मदेवानें ललाटावर लिहिलें असेल तें पुसटून टाकण्यास कोण समर्थ आहे ? " **उद्योगे नास्ति दारिद्र्यम्** " आणि " **किं दूरं व्यवसायिनाम्** " या तुमच्या कव्युक्ति खऱ्या आहेत, यांत बिलकुल प्रत्यवाय नाहीं. पण जिथेंतिथें हें दैव आम्हांला गोता देतें त्याची काय वाट ? " यावर उत्तर असें कीं, या लोकांचें म्हणण्यांत कांहींसा सत्यांश आहे. परंतु हे लोक " दैव, दैव " म्हणून उद्योग न करितां जो दैववाद माजवीत राहून देवाचे नांवानें खडे फोडीत राहतात त्याची प्रथम चीड येते. हे लोक भवितव्यतेचे देव्हारे माजवीत राहतात आणि अंगीकृत कार्यात ढिलाई करितात. जितका कसून प्रयत्न व्हावयास पाहिजे तितका यांचे हातून होत नाहीं. आळस, अनियमितपणा, अव्यस्थितता, बेशिस्त, गबाळेपणा आणि अज्ञान हीं तर त्यांच्या जणूं काय पांचवीला पूजलेलीं असतात. उद्योगाचें तर नांवच नाहीं; मग दैव काय तिथें रडेल? ज्यांना दैववाद नको असेल त्यांनीं " **यत्करणीयं तन्निश्चेयं। यच्च निश्चितं तत्करणीयम् ।।** " ज्या कार्याचा निश्चय झाला असेल तें कार्य ताबडतोब करण्यास आरंभ करावा. पण हें व्हावें कसें ? पत्ते, गंजिफा, सोंगट्या,

निष्कारण गप्पा आणि गांवांतील रिकामटवळ्या चकाटया यांची तर यांना अत्यंत आवश्यकता असते—नव्हे हे लोक तें एक आपलें प्रधान कर्तव्यच समजतात. या गप्पांत वास्तविक पहातां कांहींच अर्थ नसतो. " अमका मेला अन् तमक्याची नोकरी गेल्यामुळें त्याचे हातीं चौपदरी आली " " अमक्या तरुणीची चालण्याची ढब फारच चांगली आहे, अन् ती फारच सुंदर दिसते आणि तमकी तरुणी नुसती शूर्पणखा आहे. " " अमक्या गोमाजीला रेसेसचा नाद आहे नि तमक्या चिमाजीला कांहीं रोमान्स कळत नाहीं. " असल्या अर्थहीन चकाटया पिटून नंतर हे उद्योग करावयास लागतात. तो उद्योगहि एकाग्रतेनें किंवा ध्येयाला धरून नसतो. मग दैव अनुकूल कसें होणार ? एका संस्कृत श्लोकांत म्हटलें आहे:—

(श्लोक)

आस्ते भग आसीनस्योर्ध्वस्तिष्ठति तिष्ठतः !
शेते निपद्यमानस्य चराति चरतो भगः ॥ ॥

**भावार्थ** :—" बसणाऱ्याचें दैव बसतें, उभा राहणाऱ्याचें दैव उभें राहतें, निजणाऱ्याचें दैव निजतें, चालणाऱ्याचें दैव चालतें. " तसेंच महाभारतांत एके ठिकाणीं कर्ण म्हणतो, " दैवायत्तं कुले जन्म । मदायत्तं तु पौरुषम्. " तेव्हां या लोकांची वरील शंका निराधार आहे आणि त्यांत कांहीं सत्यांश जरी असला तरी हे लोक दीर्घोद्योग करीत नसल्यामुळें तिकडे दुर्लक्षच करणें योग्य होय.

With fingers weary and worn
With eyelids heavy and red,
A woman sat in unwomanly rags
Playing her needle and thread—
Stich ! Stich ! ! Stich ! ! !
In poverty hunger and dirt;
And still with a voice of dolorous pitch
She sang the song of shirt.
Work ! Work ! ! Work ! ! !
While the cock is crowing aloof
And Work ! Work ! ! Work ! ! !
Till the stars shine through the roof.

—Thomas Hood—'Song of Shirt.'

इतके परिश्रम केल्यावर यश येणार नाहीं असें कधींतरी घडूं शकेल काय? परंतु इतके दांडगे परिश्रम व उद्योग करण्यास आळस व इतर यशोमार्गावरील शत्रु यांची हकालपट्टी केली पाहिजे. चिकाटी धरून त्या कार्याचा पिच्छा पुरविला पाहिजे. तरच कांहींतरी कार्य होऊन आपल्या हातून चिरंतन टिकणारी अशी कर्तबगारी होईल. म्हणून प्रत्येक उत्कर्षेच्छु तरुणानें आळस सोडून देऊन कार्यास लागावें. रामदासस्वामी म्हणतात—

( ओंव्या )

**आळस उदास नागवणा । आळस प्रयत्नबुडवणा ।**
**आळसें करंटपणाच्या खुणा । प्रगट होती ॥ १२ ॥**

म्हणौन आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा ।
अत्रीं परत्रीं जीवा । समाधान ॥ १३ ॥
--( दासबोध, दशक ११ समास २ )

डॉ. पॉल अर्लिक नामक एका जर्मन डॉक्टरानें उपदंशावर रामबाण औषध शोधून काढण्याचा निश्चय करून त्यानें मनासारखें औषध तयार होईपर्यंत शेंकडों प्रयोग केले. त्यांचा शेवटचा प्रयोग साहाशें सहावा होता. ही विलक्षण चिकाटी पाहून तरी दोनचार वेळां खटपट करून यश न आलें म्हणजे नाउमेद व निराश होणाऱ्या आमचे इकडील तरुणांनीं बोध घ्यावा. वरील औषधाचें नांव 'सॉल्वरसीन' असें आहे. त्याप्रमाणेंच प्लेटो नामक तत्त्ववेत्त्यानें जो प्रजासत्ताक नांवाचा ग्रंथ लिहिला आहे, त्याचें पहिलें पान त्यानें तेरा वेळां लिहून काढलें. तसेंच कार्लो मराटी या चितान्याची अशी गोष्ट सांगतात कीं, त्यानें अन्टिनोअस्चा चेहेरा तीनशें वेळां काढला. तेव्हां शेवटीं त्याला तें चित्र पसंत पडलें. याचें नांव परिश्रम व दीर्घोद्योग! म्हणूनच एका श्लोकांत म्हटलें आहे कीं—

( श्लोक )

नात्मानमवमन्येत पूर्वाभिरसमृद्धिभिः ।
आमृत्योः श्रियमान्विच्छेन्नैनां मन्येत दुर्लभाम् ॥ —मनु.

पूर्वी प्रयत्न केले असूनहि कार्यसिद्धि झाली नाहीं, एवढयावरूनच मी कमनशिबी आहे, अशी निराशा होऊन आपली

अवज्ञा करूं नको. आजन्मपर्यंत इष्टकार्याविषयीं प्रयत्न करीत असावें. कार्य होणार नाहीं असें कधींहि मानूं नये. हल्लीं कैदेंत असलेले पंडित मोतीलाल नेहेरु यांचे पुत्र जवाहिरलाल हे हिंदुस्थानच्या तरुणांना असेंच सांगत आहेत कीं, कार्य करीत रहा. कालांतरानें त्याचें फळ तुम्हांस आपोआप मिळेल. " Success often comes to those who dare and act " " **जे धैर्य धरून कार्य करीत राहतील त्यांचेकडे नेहेमीं विजय हा आलाच पाहिजे.**" पण जर तुम्हीं कर्तव्य न करितां हात पाय गाळून बसाल तर सर्व जग तुम्हांला विनायक कवीनें म्हटल्याप्रमाणें म्हणूं लागेल——

**कारटीं करंटीं तिथें ।**
**निपजलीं भुतें । मातृ शोणितें ।**
**स्वतांला लाली । आणाया धांवली**

व व्हिटर कविनें म्हटल्याप्रमाणें, आपणांस——

Of all sad words of tongue or pen,
The saddest are these: It might have been.

भावार्थः— चित्तीं उपजविती खेद । बोलतां लिहितां जे जे शब्द ।
तयांमाजि अत्यंत दुःखप्रद । 'असें झालें असतें' हे ॥ १ ॥

Whittier's " Maud Muller ".

पश्चात्ताप करीत बसण्याची पाळी येईल. म्हणून——

कष्टतां सौख्य मानावें । कष्टीं फळची पाविजे ।
आळसें सुख वाटें तें । दुःख ब्रह्माण्ड भोगवी ॥ १ ॥
केल्यानें होत आहे रे । आधीं केलेंच पाहिजे ।
यत्न तो देव जाणावा । अंतरीं धरितां बरे ॥ २ ॥

—रामदास

सदैव कार्यवत व्हावें व

कृतान्तकटकामलध्वजजरा दिसों लागली
पुरःस्थरगदासवें झगडतां तनू भागली ! —मोरोपंत

अशी स्थिति या देहाची होण्यापूर्वींच तुकोबांनीं म्हटल्याप्रमाणें—

( अभंग )

कांहीं धांवाधांव करी । जोंवरि आहे मृत्यु दुरी

कांहींतरी उद्योग करावा व खालील श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें हातीं घेतलेलें कार्य——

( श्लोक )

प्रारभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः ।
प्रारभ्य विघ्नविहता विरमन्ति मध्याः ॥
विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः
प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥ १ ॥

—भर्तृहरि

कोणत्याहि संकटाला भिऊन सोडून देऊं नये.

# प्रकरण ७ वें

# स्वावलंबन

जो दुसऱ्यावर विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला
जो स्वयेंचि कष्टत गेला । तोचि भला ॥ १ ॥

—श्रीसमर्थ

पिढीजात गुलामांनो, ज्यांना स्वतंत्र व्हावयाचें असेल त्यांनीं स्वतःच शत्रूंवर हल्ला चढविला पाहिजे, हें तुम्हांला ठाऊक नाहीं काय ? स्वतःच्या बाहूंच्या बळानेंच विजय मिळविला पाहिजे हें तुम्हांला माहीत नाहीं काय ?

—लॉर्ड बायरन्

( श्लोक )

“ यद्यत्परवशं कर्म तत्तद्यत्नेन वर्जयेत्,
यद्यदात्मवशं तु स्यात् तत्तत्सेवेत यत्नतः
सर्वं परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखम् ॥

भावार्थः—दुसऱ्यावर अवलंबून कोणत्याहि कामीं राहूं नये, स्वतःच्या हिंमतीचे जोरावर नेहमीं कार्य करीत असावें. कारण परावलंबन हें दुःख व स्वावलंबन हें सुख, असें म्हटलें आहे.

—मनु

**भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें ॥**

—तुकाराम

तुमचें सर्व तत्त्वज्ञान एका शब्दांत सांगा असें मला कोणी विचारिलें, तर मी म्हणेन कीं, स्वावलंबन. जे आपल्या पायावर उभे राहतात त्यांना परमेश्वर सहाय्य करतोच करतो.

—रामतीर्थ

मनुष्य कोणतेंहि कार्य करीत असतांना तें सर्वांगसुंदर बनण्याकरितां स्वावलंबनाची अत्यंत आवश्यकता आहे. कोणत्याहि धंद्यांतील मनुष्यानें दुसऱ्यावर अवलंबून राहतां कामा नये. परावलंबी जिणें जगांतील धक्काबुक्कीच्या मामल्यांत क्षणभरहि टिकाव धरूं शकणार नाहीं. जो स्वावलंबनाचा धडा गिरवील त्याचा अभ्युदय झालाच पाहिजे स्वावलंबी मनुष्य हाच '**कट्टा कर्मयोगी**' या संज्ञेला पात्र आहे. 'मनुष्यानें मनांत आणल्यास तो सर्व कांहीं करील.' अशी एक उत्तम म्हण आहे. 'परंतु नुसतें मनांत आणणें आणि कार्य करणें' या इतक्या परस्परविरोधी गोष्टी आहेत कीं, त्यांत जमीनअस्मानची तफावत आहे. कार्य करण्यास '**स्वावलंबन**' हाच अमोघ उपाय आहे.

दुसऱ्या पुढें याचना करून तोंड वेंगाळणें म्हणजे अप्रत्यक्षपणें आपण त्यांचे गुलाम आहोंत असें सप्रमाण सिद्ध केल्यासारखेंच आहे. लोकांजवळ ज्यांना याचना करावयाची असेल त्यांनीं यातना भोगण्यासहि तयार असलें पाहिजे. याचनावाचक

शब्द तोंडांतून निघाला कीं, तो प्राणरहित जीव समजावा. कारण दुसऱ्यानें याची याचना ऐकून ‘ देतों ’ असे शब्दोच्चार करतांच हा भिकारी पुन्हां जिवंत होतो. शिवाय—

**वेपथुर्मलिनं वक्रं दीनावाग्गद्गदः स्वरः ॥**
**मरणे यानि चिन्हानि तानि चिन्हानि याचके ॥ १ ॥**

“ सद्गदित स्वर, कांपरा आवाज, तेजोहीन व कळाहीन मुख, हीन भाषण, आंगीं कंप उत्पन्न होणें हीं जीं अंत:कालीन चिन्हें दृष्टोत्पत्तीस येतात तींच दाराशीं याचना करणाऱ्या याचकांचे ठायीं दिसून येतात. ” याचक हा कापसाहून हलका व कावळ्याहून नीच लेखला आहे. तो कसा तर—

**तृणं लघु तृणात्तूलस्तूलादपि च याचकः ॥**
**वायुना किं न नीतोऽसौ मामयं प्रार्थयिष्यति ॥ १ ॥**

“ तृण हलकें, त्याहून तूल म्हणजे कापूस अत्यंत हलका आणि त्यापेक्षांहि याचक तर फारच हलका होय ! मग त्यास वायु कां उडवून नेत नाहीं असें म्हणाल तर याचक अत्यंत लघु असल्यामुळें वायुला अशी धास्ती पडते कीं, मजजवळहि हा याचना करील. ” तेव्हां नीच भिक्षुकवृत्तीच्या स्थितीपेक्षां स्वत:ची जिव्हा छेदून टाकावी. किंवा पोटांत कांटे भरावे पण “ **भिक्षां देहि** ” करून दुसऱ्याकडून अपमानकारक व निंदाव्यंजक शब्द ऐकून घेऊं नयेत. ही मृतवत् व लज्जास्पद स्थिति कोणत्या जातिवंत व स्वाभिमानी मनुष्याला रुचेल? कावळ्या-

सारखा अस्पृश्य मानलेला पक्षी देखील कांहीं पदार्थ सांपडल्यास ‘ काव् काव् ’ करून आपल्या मित्रांना पाचारण करितो व नंतर ते सर्वजण मिळून तो पदार्थ भक्षण करितात. पण भीक मागणारा हा इतर भिक्षेकऱ्यांस कांहीं थांग पत्ता लागूं देत नाहीं. उलट दुसरा भिक्षुक दृष्टीस पडतांच तो श्वानाप्रमाणें गुरगुर करूं लागतो. यावरून कावळाच भिक्षुकांपेक्षां वरिष्ठ ठरत नाहीं काय ? **‘मला द्या’** या वाक्यानें मनुष्याजवळील शोभा, लज्जा, धृति म्हणजे धैर्य, बुद्धि आणि कीर्ति या पांच देवता त्याला सोडून जातात. म्हणजे सदरील गुण याचना केली कीं, नाहींसे होतात; असें जें एके ठिकाणीं म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे.

सुभाषितांत म्हटलें आहे, “ जोंपर्यंत मनुष्य इतरांजवळ कठोर वज्रपाताप्रमाणें ‘ दे ’ असें भाषण करून तोंड वेंगाडणार नाहीं तोंपर्यंतच तो सर्व गुणांचें स्थान, बुद्धिमान्, गुणवान्, साधुत्व, शौर्य, निष्कलंकता, कवित्व, दाक्षिण्य, धर्मविषयक, आस्तिक्य, सुशीलता, नीतिमत्ता, मानी, ज्ञानी, कृतज्ञभाव व सकलप्रतिष्ठायुक्त इत्यादि गुणांमुळें अलंकृत असतो, म्हणजे हे गुण कायम राहतात नाहींतर नाश पावतात. ” श्रेष्ठ लोकांचें महत्त्व देखील याचनेनें नष्ट पावतें. लक्ष्मीपति जो विष्णु त्यानें बलिराजाजवळ याचना केल्यामुळें त्यास वामनत्व-लघुत्व आलें. कारण याचना करतेसमयीं त्यास आकृतीनें ह्रस्व होऊनच त्यापुढें

हात पसरून--लघुत्व स्वीकारणें प्राप्त झालें. यावरून याचना ही केव्हांहि त्याज्यच होय.

मूल प्रथम पांगूळगाडयाच्या साहाय्यानें किंवा वडीलधाऱ्या माणसांच्या हाताचा आश्रय करून चालूं लागते. परंतु त्याची धडपड आपण कोणाचाहि आश्रय न घेतां चालूं लागावें अशी असते; आणि ज्या वेळेस तें दुसऱ्याचा आश्रय न घेतां हळूंहळूं एक एक पाऊल टाकूं लागते त्या वेळेस त्याला जो निरतिशय, अपरिमित व अवर्णनीय आनंद होतो तो दुसऱ्याचा आश्रय करून चालतांना खास होत नाहीं. त्या क्षणाचें त्याला किती महत्त्व आणि केवढी धन्यता वाटत असतें हें सांगतां येणार नाहीं. पण या बालपणामधील बुद्धीचें प्रौढावस्थेंत आपणांस विस्मरण पडतें. आमचें वय जसजसें वाढत जातें तसतसें आम्ही परावलंबी बनतो, प्रत्येक वेळेस दुसऱ्याकडून कांहीं मिळेल याची अपेक्षा आपण करीत बसतो. ही परावलंबनाची दुष्ट खोडच आमचा कार्यनाश करीत असते आणि जोंपर्यंत या दुर्गुणाची आमचेमधून हकालपट्टी होणार नाहीं तोंपर्यंत आमचा अभ्युदय कसा होणार ?

स्वावलंबनामध्यें प्रचंड व अद्वितीय सामर्थ वास्तव्य करीत असल्यामुळें प्रत्येकाला त्याची आवश्यकता आहे. जो परावलंबन टाकील तोच यशःश्रीचा मालक होईल. स्वामी रामतीर्थ म्हणतात--" स्वावलंबन, आपण स्वतः कष्टत राहणें, हेंच यशःप्राप्तीचें बीज आहे. दुसरे लोक आपल्या मदतीला

येतील अशा भरंवशावर बसूं नका. फक्त आपल्या स्वतःवर अवलंबून रहा; दुसऱ्या कशावरहि विसंबून बसूं नका. कसलीच अपेक्षा करूं नका. ‘ **भिक्षां देहि** ’ करूं नका. परावलंबी बनूं नका. ” हेंच उत्कर्षाचें आणि भाग्योदयाचें रहस्य आहे.

यशोमंदिराकडे जाण्याची ज्यांची अव्याहत धडपड चाललेली असेल त्यांनीं स्वावलंबनाची सोबत करावी. मार्गांत अनंत अडचणींचा डोंगर असो, चढउतार, खांचखळगे कितीहि दुर्लंघ्य असोत, निराशा, भीति, चिंता, संकटें, दुःखें, यांचें कितीहि काहूर माजलेलें असो; तुम्हांला हातपाय गाळून बसण्याचें कारण नाहीं. ‘ **स्वावलंबन** ’ नांवाचा मित्र तुमचा वाटाड्या होईल. त्याचा हात धरा आणि मार्गक्रमाणास सुरुवात करा. दुरून भयंकर वाटणारीं संकटें अभ्राच्छादित मेघांप्रमाणें नाहींशीं होतील. तुमच्या इच्छा, आकांक्षा, मनोरथ यांची पूर्ति होईल ‘ असाध्य तें साध्य ’ करण्याची धमक तुमच्यांत निर्माण होईल. अंतःकरणांत नूतन दिव्य सामर्थ्य निर्माण होऊन जगांत तुमचा प्रभाव वाढेल. मृत महत्त्वाकांक्षा आणि आशा यांना नवजीवन मिळून त्यांचें पुनरुज्जीवन होईल. दृढनिश्चय बळावून अधिकाधिक पुढें सरसावण्याची इच्छा उत्पन्न होईल, आणि तुमच्या मार्गावर उज्वल प्रकाश पडून बाल कवीनें म्हटल्याप्रमाणें “ **आनंदी आनंद गडे । इकडेतिकडे चोंहिकडे** ” असे तुमच्या मुखांतून उद्गार निघूं लागतील.

आत्मोद्धार स्वावलंबनानें होतो. परावलंबन दूर सारून स्वावलंबनाचा दंड हातांत धरावा, दुर्बलता सोडून सबलता आणावी, अनाथपणाला सोडचिठ्ठी देऊन सनाथ बनावें, परवशतेचा पाश तोडून स्वातंत्र्य मिळवावें असा गीतेचा देखील संदेश आहे. बलिष्ठ, पुण्यशील, नीतिमान्, धर्मनिष्ठ आणि स्वावलंबी मनुष्याचाच उत्कर्ष होतो. असा अभ्युदय ज्यांना साधत नसेल त्यांनीं खुशाल मरून जावें. परावलंबी जीवनाचा गीतेंत धिःक्कार केला आहे. असें निष्प्रभ जीवित गीतेला संमत नाहीं. समग्र गीतेचा उपदेश केल्यावर अर्जुनाला श्रीकृष्णांनीं युद्ध करणें किंवा न करणें हें त्याच्याच कार्याकार्य विवेकशक्तीवर सोंपवून अज्ञान, भ्रांति व वेडेपणा यांचा त्याग करण्यास सांगितलें. 'मी परमेश्वर आहें आणि मी सांगेन त्याप्रमाणें वाग' असें श्रीकृष्णांनीं सर्व गीतेमध्यें कुठेंहि सांगितलें नाहीं. उलट अर्जुनानें ज्या ज्या शंका विचारिल्या त्याचें उत्तम निरसन केलें. 'श्रद्धा ठेव' 'ईश्वरावर अश्रद्धा ठेवतां कामा नये' अशा शब्दांनीं त्याची मुस्कटदाबी केली नाहीं. यावरून स्वावलंबन शिकावें व स्वतःच आपला आत्मोद्धार करून घ्यावा आणि आपली जबाबदारी आपणांवरच घ्यावी असाच निष्कर्ष निघतो. मुमुक्षूला तर स्वावलंबनावांचून एक पळभरहि राहतां येणार नाहीं. कारण मोक्ष अथवा शांतिसुख हें बव्हंशीं त्यावरच अवलंबून आहे म्हणून तुम्हांला यश पाहिजे असेल तर आपल्या पायांवर उभे राहण्याची कला तुम्ही हस्तगत करून घेतली पाहिजे. स्वावलंबन हाच अभ्युदयाचा पाया आहे.

स्वावलंबनामुळें मनुष्याला यश प्राप्त होतें. त्याला कधीं अपयश येत नाहीं काय ? अशी कित्येक वाचक शंका काढतील. त्याला उत्तर हेंच कीं, अपयश हें मनुष्याला येणारच. परंतु भीरु मनुष्याप्रमाणें स्वावलंबी मनुष्य कार्यनाशामुळें निराश होत नाहीं, स्वावलंबनाचा विशेष हाच आहे. ज्या संकटामुळें भित्रा मनुष्य गांगरून व गोंधळून जातो त्याच संकटानें स्वावलंबी मनुष्याची धडाडी, शौर्य, साहस, चिकाटी, निर्धार आणि इतरेतर सद्गुण हीं द्विगुणित होतात आणि तो दुप्पट उत्साहानें कार्यप्रवण बनतो. सामान्य माणसें संकटांच्या व अडचणीच्या बागुलबोवास भिऊन स्वीकृत कार्य अर्धवटच सोडून देतात परंतु स्वावलंबी माणसें त्यांतूनहि सहीसलामत बाहेर पडतात. नेटानें प्रयत्न करून अंगिकृत कार्यांत मुळींच ढील पडूं न देतां कामाची यशःसिद्धी प्राप्त होईपर्यंत पिच्छा पुरविणें हें त्यांचें ब्रीद असतें. असें पाहूं गेल्यास एकजात यश परमेश्वरी अवतारांच्या देखील वांट्यास आलें नाहीं. रामाला चवदा वर्षें खडतर वनवास भोगण्याचें कपाळीं आलें. श्रीकृष्णास बालपणीं अनेक आपत्तींशीं झुंजावें लागलें. याचें कारण हेंच कीं संकटें कोणासहि चुकवितां येणार नाहींत, आणि सदैव यशहि पदरांत पडणार नाहीं. अवतारी पुरुषांची ही गोष्ट तर सामान्य माणसांची कथा काय ? आपलें कर्तव्य आहे तें बजाविणें हेंच मनुष्याचें कर्तव्य आहे. संकटांना भिऊन जातां उपयोगी नाहीं. काटकपणा व दमदारपणा पाहिजे. संकटें आपणांस नव्यानव्या उत्कृष्ट संधि आणीत असतात. म्हणून

त्यांच्यावर जळफळण्यांत कांहीं हंशील नाहीं. उलट त्याबद्दल आनंदच मानावयास पाहिजे. थोरथोर पुरुषांचीं चरित्रें व मोठमोठ्या महात्म्यांचे इतिहास आपणांस हाच धडा देतात.

लो० टिळक म्हणतात. "कोणतेंहि राष्ट्र अगर संस्था स्वावलंबनानें भरभराटीस येते. ज्या राष्ट्रांतील जनता स्वावलंबी नाहीं तें राष्ट्र कितीहि गुणसंपन्न असलें तरी व्यर्थ आहे. ज्या समाजांतील किंवा राष्ट्रांतील जनता स्वावलंबी बनेल तें राष्ट्र सर्वांच्या पुढें आघाडी मारून आद्यस्थान मिळवील."

एवंच काय स्वावलंबनानें मनुष्याची दृष्टि निर्भय होऊन तो स्वाभिमानी बनतो. तो कोणापाशींहि याचनेकरितां आपले हात पसरणार नाहीं. मात्र कोणतेंहि कार्य ध्येयाला धरून असलें पाहिजे. ध्येयावांचून देह झिजविणाऱ्या मनुष्याकडे ईश्वराची कृपादृष्टि कधींच वळणार नाहीं. हीच गोष्ट '**न मृषा श्रान्तं वदन्ति देवाः ।** (ऋ० ४।३३।११.) यांत अभिप्रेत आहे. म्हणून प्रत्येक तरुणानें ध्येयाला धरून खालील कवितेंत वर्णन केल्याप्रमाणें आपली मनोवृत्ति बनवावी म्हणजे तो यशाचा खास वांटेकरी होईल यांत संदेह नाहीं.

## शार्दूलविक्रीडित

**पुण्यें आचरणें इथून पुढतीं इच्छेंत माझ्याच ना ?**
**दीर्घोद्योग करूनि नित्य झटणें हातांत माझ्याच ना ?**

मार्गी ज्या मम नाचती घडिघडि आपत्तिच्या मक्षिका
त्यांना मानुनिया भुतें, दचकुनी कर्तव्य मी सोडूं कां? ॥३॥
झाले प्राप्त जरी प्रचंड चढणें ज्वालामुखी पर्वत,
नाहीं मी डरणार, लावुनि पहा कोणी तरी शर्यत,
मातींतूनि कणाकणांतुनि जरी भाले उभे राहिले
'पुष्पांची मृदु शेज काय रचली' न्यां पाहिजे मानिलें ४
ठेवा मांडुनिया पदोपदीं कुणी मार्गांतुनीं कातऱ्या,
चित्तीं मानिन 'नेति या मज सुखस्वर्गाकडे पायऱ्या'
येतां लोचनिं लोट वावटळिचे, जातां न भांबावुनी,
मी मानीन गुलाल हा उधळिला कीं अंतराळांतुनी ५
देवा! दास्य तुझें जरी न घडलें श्रीमारुतीसारखें,
आशिर्वाद तुझे मला रघुवरा! होतील कां पारखे?
कर्तव्याचरणास कां गणिसि ना सेवाच तूझी खरी
कर्तव्याविण घेसि पूजन सख्या! कां मानुनी तूं तरी? ॥६॥
देवा! प्रार्थितसे नकोस ठरवूं माझी बढाई वृथा,
कर्मे आचारितां मला लव तुझे सामर्थ्य दे गा आतां;
नाहीं अल्पहि भीति पांचहि महाभूतें जरी कोपलीं
नाहीं मी चळणार एक तसुही गात्रें जरी भंगलीं ॥ ७ ॥

( अनुष्टुप )

साचार मंत्र हा गातां प्रत्येक जन हिंदवी।
हिंद-भू फिरुनी सारी पावेल जगीं थोरवी ॥८॥

—कवि यशवंत, चाफळ.

# प्रकरण ८ वें

## सन्मित्र समागम

ढेंकणाचे संगें हिरा जो भंगला। कुसंगें नाडला तैसा साधु १
ओढाळाच्या संगें सात्त्विक नासली। क्षण एक नाडली समागमें
डाकाचे संगती सोनें हीन झालें। मोल तें तुटलें लक्षकोडी ३
विषानें पक्वान्नें गोड झाली। कुसंगानें केली तैशी परी ४
भावें तुका म्हणे सत्संग हा बरा। कुसंग हा फेरा चौऱ्यायशींचा ५

—गाथा तुकाराम

( श्लोक )

पापान्निवारयति योजयते हिताय।
गुह्यं च गूहति गुणान् प्रकटीकरोति॥
आपद्गतं न च जहाति ददाति काले।
सन्मित्रलक्षणमिदं प्रवदन्ति सन्तः॥१॥

——नीतिशतक (भर्तृहरि)

भावार्थ—योजि हिताप्रति निवारुनि पापकर्मे।
वर्णी बरेच गुण झांकुनियां कुकर्मे॥
दे आपणांस असतां व्यसनीं त्यजीना।
सन्मित्रलक्षण असें वदतात जाणा॥१॥

——वामनपंडित

A man that hath friends must, shew himself friendly; and there is a friend that sticketh closer than a brother.

—Proverbs of Solomon, XVIII, 24

( श्लोक )

मित्रं प्रीतिरसायनं नयनयोरानंदनं चेतसः ।
पात्रं यत्सुखदुःखयोः सह भवेन्मित्रेण तत् दुर्लभम् ॥ १ ॥

भावार्थः—ज्या मित्राचें दर्शन झालें असतां, नेत्रांत रसायन घातल्याप्रमाणें अंतःकरणास आनंद होतो व जो आपल्या सुख-दुःखांचा सहभागी आहे असा मित्र मिळणें दुर्लभ होय.

—हितोपदेश

( आर्या )

मित्र सुखाचा दाता देतो चित्तास नित्यविश्रांती ।
समयीं चित्त भ्रमतां बोध करुनियां निवारितो भ्रांती॥१॥
सन्मित्र करी जें हित कोणाच्यानेंहि तें न करवेल ।
साह्य कराया संकटसमयीं अन्या न धीर धरवेल ॥ २ ॥

—परशुरामपंत तात्या गोडबोले

लाधल्या सन्मित्रसंगती । सर्व आनंद दुणावती ॥
द्विधा विभागे विपत्ति । थोर महिमा मैत्रीचा ॥ १ ॥ —डेन्ह्याम

उत्कर्ष संपादन करणाऱ्या मनुष्याला इतर गोष्टींचा विचार करणें जसें अगत्याचें आहे, तसें मित्रांबद्दलहि त्याला अवश्य

विचार केला पाहिजे. सन्मित्रांची पारख करून त्यांचा समागम करून घेणें ही अत्यंत महत्त्वाची बाब समजली जाते. **'सन्मित्र'** या पवित्र नांवानें संबोधिली जाणारी वस्तु अत्यंत दुर्मिळ, अलौकिक व अमोलिक अशी आहे. सुखदु:खाचा सहभागी, संकटकाळचा मार्गदर्शक, अडचणींच्या प्रसंगीं सल्लामसलत देणारा, प्रपंचांत अनेक प्रसंगीं सहाय्यभूत होणारा, कुकर्मापासून परावृत्त करणारा, निराश जीविताच्या वैराण वाळवंटावर आशारूपी जलाचें सिंचन करणारा, नानाविध कार्यामध्यें प्रोत्साहन, उत्तेजन व धीर देऊन जगांत लौकिक संपादन करून देणारा असा जर कोणी असेल तर तो एक मित्रच होय. परंतु असा स्नेही लाभण्यास पूर्वपुण्याई व सुदैव लागतें. आपणांस " **शोकाराति भयत्राणं प्रीतिविश्रंभभाजनम्** " असें मित्ररत्न लाभत नाहीं. परंतु ' **शितें तोंवरीं भुतें** ' जमून सुखाचे भागीदार होणारे व आपत्कालीं सोडचिठ्ठी देणारे नीच वृत्तीचे, खुशामती, लाळघोटे आणि होळीचे होळकर अनंत मिळतात, हें खरें मित्र नव्हेत. " **तन्मित्रमापदि सुखे च समक्रियं यत्** " सुखदु:खप्रसंगीं सारखींच उपयोगी पडणारीं मित्ररत्नें हे खरेखुरे जिवलग मित्र होत.

मानवजातीच्या सुखसोईसाठीं परमेश्वरानें अनंत पदार्थ निर्माण केले आहेत. असंख्य नक्षत्रांभरणांनीं शृंगारलेले नयनानंदकर अफाट नभोमंडळ व जोत्स्नामय निशा, तेजस्वी व वैभवशाली चंडरश्मि, शीतरश्मि निशानाथ चंद्र, घनदाट वृक्षांनीं,

वनस्पतींनीं व पुष्पलतांनीं आच्छादित केलेले उत्तुंग पर्वत, रम्य नद्यांचे प्रवाह व स्फटिकतुल्य निर्झरोदकांचे पाट, अफाट, अगाध व अनंत रत्नाकर, लतावृक्षादिकांनीं मंडित झालेलीं उपवनें, नानाविध पशूपक्षीं, सरोवरें, रंगींबेरंगीं फुलपाखरें इत्यादि अजब व वैचित्र्यपूर्ण सृष्ट चमत्कार पाहून कोणत्या मनुष्याला दुःखाचें विस्मरण पडणार नाहीं ? हे चमत्कार निर्माण करण्यांत मनुष्यानें अत्यानंदपूर्वक जीवन व्यतित करावें हाच जगदीशाचा संकेत आहे. परंतु वर निर्दिष्ट केलेल्या वस्तूंपेक्षांहि 'सन्मित्र' ही अधिक सुखदायी, सर्वांत रमणीय आणि उदात्त अशी, देणगी आहे. ही अनेक महत्कार्यांत उपयोगी पडणारी आहे व या देणगीनेंच इतिहासाला रम्यत्व आणलेलें आहे.

क्षत्रियकुलावतंस शिवछत्रपतींनीं हिंदुपदपाच्छाईची संस्थापना केली, दशाननाचा पराभव करून रामानें जानकी मिळविली, नेपोलियननें बलाढ्य राष्ट्रें पादाक्रांत केलीं, जॉर्ज वॉशिंग्टननें विस्कळित झालेलीं अमेरिकेंतील संस्थानें स्वतंत्र केलीं, शिकंदरानें सर्व जग जिंकिलें, कौरवांचा उच्छेद करून पांडवांनीं दिग्विजय मिळविला, सुदाम्यास सुवर्णनगरी प्राप्त झाली, परतंत्र राष्ट्रांनीं स्वराज्य मिळविलें हीं सर्व महत्कार्यें होण्यास मित्रत्वाचें साधनच प्रामुख्यानें उपयोगीं पडलें असें दिसून येईल. इतर साधनांचा उपयोग झाला नाहीं असें नाहीं. परंतु तो गौणत्वाच्या सदरांत येतो. रामाची वानरसेना, शिवबाचे मावळे वगैरे लोक नसते तर यश संपादन होणें महाकर्म कठीण

होतें. "**संहतिः कार्यसाधिका**" अथवा "Many hands make music" या म्हणींत हाच अर्थ गोवला आहे. सहकारितेंत प्रचंड सामर्थ्य एकवटलें आहे पण ती सहकारिता मित्रच जर नसतील तर कशी निर्माण होईल? सहकारिता आणि मित्रत्व हेंच बळ !

Two hearts becoming one break up a mountain,
They bring dispersion to the mobs.

—Persian Couplet.

यावरून मैत्रीची केवढी आवश्यकता आहे हें कळून येईल.

मित्रांची निवड विचारानें, शहाणपणानें व कसोटी पाहून केली पाहिजे. दुर्जनसंगतीपासून अपाय होऊन आयुष्यक्रम सुखावह, शुद्ध व आनंदायक राहात नाहीं. "**संग तसा रंग**" "**संसर्गजा दोष गुणा भवंति**" "**संगतिसंगदोषेण**" इत्यादीं वचनें लक्षांत बाळगावीं. ढवळ्याशेजारीं पवळा बांधल्यास गुण तरी लागतो. दुर्जनांच्या संगतीमुळें नाश कसा होतो हें उपमा व उपमेय देऊन अत्यंत सुंदर रीतीनें सुभाषिताच्या एका श्लोकांत सांगितलें आहे, तो श्लोक असा :—

(आर्या)

पात्रमपात्रीकुरुते, दहति गुणं स्नेहमाशु नाशयति ॥
अमले मलं नियच्छति दीपज्वालेव खलमैत्री ॥ १ ॥

"म्हणजे दुर्जनाची संगति ही दिव्याच्या ज्योतीप्रमाणें पात्र (योग्य किंवा भांडें) मनुष्यास अपात्र करिते, गुण (दोरी अर्थात् वात) दग्ध करिते, स्नेहाचा (तेलाचा) नाश करिते, स्वच्छ वस्तूच्या ठिकाणीं मल (काजळ) टाकिते." शिवाय पावलोंपावलीं मानहानि होते ती वेगळीच ! लोहाच्या संगतीनें अग्नीला घणाचा मार खावा लागतो. तुकाराममहाराज देखील दुर्जनाबद्दल म्हणतात :—

**दुर्जनांची गंधी विष्ठेचीयापरी। देखोनियां दूरी व्हावें तया १**
**आईकाहो तुम्ही मात हे सज्जन। करूं संघटन बोलों नये २**
**दुर्जनांचें भय धरावें त्यापरी। पिसाळलेपरी धांवे श्वान ३**
**दुर्जनाचा भला नव्हे अंगसंग। बोलिलासे त्याग देशाचा त्या ४**
**तुका म्हणे किती सांगावें पृथक्। अंग कुंभपाक दुर्जनाचें ५**

—गाथा

यास्तव मैत्री करितांना ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवावी. प्रत्येकाशीं सौजन्यानें व मर्यादेनें वागणें इष्ट आहे. परंतु साधारण परिचित मनुष्यास तात्काळ जवळ करून त्याला मित्रांच्या मालिकेंत गोंवणें ही मोठी चूक आहे. आगगाडींत अथवा परगांवीं गेल्यास तेथें अनेक लोकांची जानपछान व संभाषण होतें. पण या मैत्रीस '**मित्रत्व**' व '**स्नेह**' या थोर उपमा साजत नाहींत. हॅम्लेट नाटकांत पोलोनिआनें जो लोर्टस्‌ला उपदेश केला आहे, तो फार मनन करण्यासारखा आहे तो म्हणतो:—

Those friends thou hast, and their adoption tried
Grapple them to thy soul with hoops of steel:
But do not dull thy palm with entertainment
Of each new hatched unfledged comrade

नंतर तो आणखी पुढें म्हणतो :—

This above all: To thine own self be true
And it must follow as the night the day,
Thou canst not then be false to any man.
—Hamlet (Act I Se. 3)

दुसऱ्याशीं सख्यत्व करण्याचा हाच सर्व श्रेष्ठ असा मार्ग आहे.

कित्येक वेळां "**समानशीलव्यसनेषु सख्यम्**" या न्यायानें ज्याचें जसें शील व व्यसन असेल व दोघांची आवड एकच असेल तर स्नेह जमण्यास अवकाश लागत नाहीं. ज्ञाते ज्ञात्यांशीं आणि मूर्ख मूर्खांशींच स्नेह करितात. दोन दारुबाजांचें किंवा दोन बदमाषांचें तेव्हांच मित्रत्व होतें. पण पवित्र संगति ठेवावी हेंच चांगलें. नीचांची संगति पवित्र मनुष्यासहि नीच बनविते. आणि सत्संगति नीचांचाहि सर्वतोपरि अभ्युदय करिते.

(आर्या)

गुणवत्संबंधानें नीचहि पावे सदा महत्त्वास,
पुष्पाच्या संगानें सूत्रालाही घडे शिरीं वास ॥ १ ॥

एकानें म्हटलें आहे "**को न कुसंगति पाय नसाई ?**" संभाजीसारखा नरकेसरी, मर्द व रणधुरंधर वीरसुद्धां कलुषासारख्या नादान दोस्ताच्या संगतीनें धुळीस मिळाला. तर वाल्याचा वाल्मिकऋषि नारदाच्या सुसंगतीमुळें बनला. सत्संगतीचा महिमा अपरंपार आहे. म्हणूनच मोरोपंत परमेश्वराला "**सुसंगति सदा घडो सुजन वाक्य कानीं पडो**" अशी मागणी करीत आहेत. गंगा ही पापाला, चंद्र तापाला आणि कल्पतरु दैन्याला हरण करितो. परंतु पाप, ताप आणि दैन्य हीं तीन्ही सत्संगतीनें नाहींशीं होतात. "**सुसंगमात्रेण दहन्ति पापम्**" ही अगदीं अनुभवसिद्ध गोष्ट आहे. सत्संगतीचा महिमा इतका थोर असतांना आम्ही नीच मित्रांची खोगीर भरती करतों हें चांगलें नव्हे.

एकदां श्रीकृष्णानें बळीराजाला असा प्रश्न केला कीं, "तूं दुर्जनाबरोबर स्वर्गांत राहणें पसंत करशील कीं सज्जनांबरोबर नरकपुरींत ?" बळीनें उत्तर केलें कीं, "मी सज्जनांबरोबर नरकांतच वास्तव्य करीन !" "असें कां ?" म्हणून शार्ङ्गधरानें पृच्छा करतांच पुण्यात्मा व धर्मात्मा जो बळी त्यानें उत्तर केलें, "सज्जन तेथें स्वर्ग आणि दुर्जन तेथें नरक ! नरकाला स्वर्गाची रमणीयता सज्जन आणतात तर स्वर्गाला देखील दुर्जन मनुष्यें नरकाची अवकळा आणितात ! कुसंग हाच नरक व सत्संग हाच स्वर्ग नव्हे काय ?" बळीचें उत्तर ऐकून श्रीकृष्ण संतुष्ट झाले.

कसोटी ठरवून संगति केल्यास ठेंचाळण्याचा प्रसंग येणार नाहीं. या जगांत कोणाचा कांहीं नेम सांगवत नसल्यामुळें प्रथम-दर्शनी दोस्त वाटणारे अंतीं शत्रू ठरलेले आहेत. रावणाचा बंधु बिभीषण रामास—शत्रूस वश झाला. हेंचसें काय ब्रूटस् जो सीझरचा परम मित्र तो सीझरच्या प्राणघातक्यांस जाऊन मिळाला. एके ठिकाणीं म्हटलें आहे, " जगांतील प्रत्येक मनुष्य लबाड आहे असें समजून वागावें; म्हणजे आपणांस कांहीं भय राहणार नाहीं. " तात्पर्य हेंच कीं, सिंहाचें कातडें पांघरून गाढव ज्याप्रमाणें मीच सिंह अशी वल्गना करूं लागलें त्याप्रमाणें वरून संभावित दिसणारीं माणसेंच सोनेरी टोळींत असल्याचा अनेक प्रसंगीं अनुभव येतो. सिंहाची योग्यता जशी गाढवाला येत नाहीं तद्वतच सज्जनांची योग्यता दुर्जन करूं शकणार नाहींत. कोठें हिरा आणि कोठें कोळसा ?

सांप्रत हिंदुसमाजांत आत्म्याचा अधःपात करणाऱ्या अनेक गोष्टीं प्रत्यहि दिसत आहेत. नाच, तमाशे, सिनेमा, नाटकें इत्यादि अनेक गोष्टीं समाजाची राखरांगोळी करण्यास जणूं काय सज्ज झाल्या आहेत. समाजाचें शील, नीतिमत्ता, दानत इत्यादी गोष्टींचें सूकाणूं सुटलें तर समाजरूपी तारूं भडकून गेल्यास नवल काय ? रामलीला आणि कृष्णलीला दाखवितांना उच्च ध्येय बाजूलाच राहून ओंगळ गाणीं, असंबद्ध प्रलापांनीं युक्त अशीं भाषणें, कामलीलेचा फार्स, बाष्कळ व निरस विनोद वगैरे गोष्टींच दिसून येतात. सिनेमांतील चुंबनालिंगनादि प्रकार

चित्त व शील भ्रष्ट करीत नाहींत असें छातीठोकपणें एकानें तरी सांगावें ? वडीलधारीं मानसें हीं कुदृश्यें पाहून तीं आपल्या मुलांबाळांनाहि हौसेनें दाखविण्यास नेतात. अरेरे! यापेक्षां किळसवाणी, नकरप्रद आणि अमंगल अशी दुसरी कोणती गोष्ट आहे? म्हणून ज्यांना आपल्या समाजाची आणि राष्ट्राची थोडीतरी पर्वा असेल त्यांनीं स्वतः "Chaste simple living and high thinking." असें ध्येय ठेवून भावी पिढीला कल्याणप्रद, उज्वल आणि आदर्शवत् असा मार्ग दाखवून द्यावा; नाहींतर राष्ट्राच्या आधींच दुर्धर, पारतंत्र्यापिढींत, कंगाल निःस्सत्व, पुरुषार्थहीन, दुर्बल आणि नामर्द बनलेल्या पिढीला अधिक नीचावस्थेप्रत नेण्याचें पुण्यकर्म ( ? ) हातीं घ्यावें ! संपूर्ण गुलामगिरीचें मूळ यांतच आहे !

ज्यांना उद्धार करून घ्यावयाचा त्यांनीं सत्संगती धरावी. विषयवासना भडकूं देऊं नये. विलासप्रियता, शृंगार, नखऱ्याचा मार्ग, अश्लीलता, बीभत्सता, अपवित्रता यांचा त्याग करावा. श्रीसमर्थ म्हणतातः—

**मना सर्वही संग सोडोनि द्यावा। अती आदरें सज्जनांचा करावा**
**जयाचेनि संगें महा दुःख भंगें। जनीं साधनेंवीण सन्मार्ग लागे १**

सत्संगानें सर्व कांहीं सफल होतें. विषयोपभोग घ्यावासा वाटणें म्हणजे मरणाची पूर्वतयारी करण्यासारखें आहे. श्रीमच्छंकराचार्य म्हणतातः—

दोषेण तीव्रो विषयः कृष्णसर्पविषादपि ।
विषं निहन्ति भोक्तारं द्रष्टारं चक्षुषाप्ययम् ॥

" विषयविष कालसर्पापेक्षांहि जहाल आहे. जहर पोटांत गेल्यानंतर मनुष्य मरण पावतो. पण विषयविषाकडे नुसतां दृष्टिक्षेप करतांच मनुष्य पार मातीस मिळतो. " यावरून हें जहर किती तीव्र आहे याची कल्पना येईल. हें आरंभीं गोड पण अंतीं कडू आहे. " **जयासी वाटे शीण व्हावा । तेणें विषयो चिंतीत जावा.** " त्यामुळें काय लाभ होत असेल तर—

**रूपहानी शक्तिहानी । द्रव्यहानी परोपरी ॥**
**यातिहानी कूळहानी । सर्व हानीच होतसे ॥ १ ॥**

**—श्रीसमर्थ**

हा होतो. तेव्हां आपण तिकडे कानाडोळा करणें हेंच योग्य होय.

**मना पापसंकल्प सोडोनि द्यावा।मना सत्यसंकल्प जीवीं धरावा**
**मना कल्पना ते नको वीषयांची।विकारें घडे हो जनीं सर्व छी छी**

हें रामदासांचें म्हणणें ध्यानांत ठेवावें. यांतच उत्कर्ष, उन्नति आणि अभ्युदय आहे.

" सत्संगती ठेवण्यांत मोठेपणा व भूषण आहे " असें एका इंग्लिश लेखकानें म्हटलें आहे. ज्यांनीं परमेश्वराची मैत्री संपादन केली असेल, त्यांच्याविषयीं तर प्रश्नच उरत नाहीं. या मैत्रीचें गुणवर्णन किती करावें ?

---

## प्रकरण ९ वें

# इंद्रियदमन आणि मोहिनी विद्या

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिंद्रियैश्चरन् ।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥ (२, ६४.)
असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥ ( ६, ३५ )

—भगवद्गीता

नांगरल्याविण मळ्यांत आम्हां पीक नये पेराया,
फूल तोडिल्याविना न त्याचा सुगंध ये हुंगाया !
छिद्र पाडल्याविना न मौक्तिक येती हातीं घ्याया,
कांति हिऱ्याची खुलवायास्तव लागे कोंदणकाया !

—केशवकुमार

क्रोध एष महान् शत्रुस्तृष्णा वैतरणी नदी ।
संतोषो नंदनवनं, शांतिरेव हि कामधुक् ॥ १ ॥

—अ. रामायण

( ओंव्या )

कां जे मार्गामार्ग देखावें । साच लटिकें ओळखावें ॥
हिताहित जाणावें । हिताचि लागीं ॥ १ ॥
पाहे पां नांव देखतां बरवी । कोणी आडघालीं काय अभावीं
कां सुपंथ जाणोनि अडवीं । रिगवत असे ॥२॥

जो विष अमृत वोळखे । तो अमृत काय सांडूं शके ॥
तेंवि जो ऋजू वाट देखे । तो आव्हांटा ( आडमार्गांत )
न वचे ॥ ३ ॥

—ज्ञानेश्वरी

गुणवान् असो कुठेंही स्वगुणें शोभाचि नित्य तो पावे ।
मोहवि रत्न शिरीं वा कंठिं भुजीं पादपीठिं ठेवावें ३२

ह्या आयुष्यांत आपणांस धन्यता व श्रेष्ठत्व संपादन करावयाचें असेल, आपल्या मनावर उदार भावनांचा संस्कार होऊन जगाचें आपणांकडे आकर्षण व्हावें अशी इच्छा असेल मानमान्यता, चांगुलपणा, सुजनता, वैभव किंवा सुख यांची आशा असेल तर इंद्रियदमन, सद्वर्तन, दानत, सत्संगति, इत्यादि गोष्टींनींच तें साध्य करून घेतां येईल. दानतीनें व नीतिमत्तेनेंच मनुष्याची पारख होत असते. ज्यांचे व्यवहार प्रामाणिक, सरळ व शुद्ध आहेत त्यांना परमेश्वराचें देखील भय बाळगण्याचें कारण नाहीं. पैसा, अधिकार, स्वातंत्र्य, विद्वत्ता, कीर्ति यांच्यापेक्षां सच्छीलतेची मातब्बरी विशेष आहे. आपला अध:पात टाळून उन्नती करून घेण्याचें हें एक साधन आहे. शीलाची पवित्रता राखणें हें आपल्या हातांत, आहे. सहिष्णुत्व औदार्य, परोपकारबुद्धि, सौजन्य, नम्रता इत्यादि गुणसमुच्चयाचा उगम शीलामध्यें आहे. दु:साध्य गोष्टी सुसाध्य होणें हें त्यावरच अवलंबून आहे. अनेक हेतू साध्य करून घ्यावयाचे असतील

त्यांनीं ही सुवर्णतुल्य दानत संपादन करावी. म्हणजे त्यांना सुवर्णतुल्य दिवस येतील यांत संदेह नाहीं. **“शीलं परं भूषणम्”** ही भर्तृहरीची उक्ति अगदीं यथार्थ आहे. शील किंवा दानत ही एक अपूर्व चीज, ईश्वरदत्त देणगी, सुखप्राप्तीचा अमोघ उपाय, उत्कर्षाची किल्ली, संतुष्ट चित राखण्याचें दिव्य औषध, निष्पापतेचें माहेरघर आणि सुखसंपदेचें भांडार आहे.

**वरें तें या देहीं महिवरि कडेलोट करणें ।**
**महा सर्पाच्या कीं वदनिं तरि हा हात धरणें ॥**
**उडी कीं वन्हींत त्वरित तरि घालूनि मरणें ।**
**जळो तें जें लोकीं त्यजुनि निज सच्छील फिरणें ॥१॥**

—वामन

असें जें म्हटलें आहे तें अगदीं योग्य होय. प्रख्यात कवि किंवा लेखक, गायक, कलाभिज्ञ तत्त्ववेत्ता, शास्त्रज्ञ किंवा पंडित होणें हें प्रत्येकास साध्य नाहीं. परंतु सद्गुण व शील हीं कोणालाहि पवित्र राखतां येण्यासारखीं असून मिळवितां येण्याजोग्या या गोष्टी आहेत. प्रत्येकास नीच किंवा उच्च भावना संपादन करण्याचें साधन परमेश्वरानें नैसर्गिकच दिलें आहे. असें असतां आम्ही जाणूनबुजून खडयांत पडण्यांत काय हंशील आहे ? एक कवि म्हणतोः—

**यात्यधोधो व्रजत्युच्चैर्नरः स्वैनैव कर्मणा ।**
**कूपस्य खनिता यद्वत्प्रासादस्येव कारकः ॥ १ ॥**

म्हणजे " मनुष्य हा आपल्या कर्मानेंच उच्च अगर नीच स्थितीप्रत जातो; जसें विहीर खणणारा खणीत खणीत खालीं जातो, आणि राजवाडा बांधणारा मजल्यावर मजले चढवीत असल्यामुळें वर वर जातो. "

विद्वत्ता अगर पांडित्य हें ग्रंथाध्ययनानें साध्य होतें. पण इतके परिश्रमहि सद्गुण किंवा शील संपादन करण्यास लागत नाहींत. विद्वत्तेनें जरी मानमान्यता व वाखाणणी होत असली तरी दानतीनें ती अधिक होते. शिवाय लोकांचें अंतःकरण आपणाविषयीं निर्विकल्प व शुद्ध राहून आपण लोकादरास अधिक पात्र होतो. क्वचित्प्रसंगीं विद्वान् देखील पापी व नीचवृत्तीचा असूं शकतो. पण शीलवान् मनुष्यास असला दुर्लौकिकाचा कलंक कालत्रयींहि लागणार नाहीं. ज्ञानदेव, तुकाराम, एकनाथ, रामदास आणि पाश्चात्य देशांतील प्लेटो, इमर्सन, कार्लाईल, जर्विन, शेक्सपीअर, न्यूटन, मिल्टन यांची योग्यता नेपोलियन, अलेक्झांडर यांच्यापेक्षां केव्हांहि श्रेष्ठ दर्जाची समजली जातें. जेथें मनाची संतुष्टता व सच्छीलता असेल तिकडेच यशःश्री जात असते. नेपोलियन, शिकंदर किंवा शिवाजी यांच्यापेक्षां व्यास, वाल्मिक, गौतमबुद्ध, कालिदास किंवा प्लेटो हेच जगाचे स्वामी होते असें म्हटल्यास चुकीचें होणार नाहीं. सत्पुरुष नसते तर जगांत मौज राहिली नसती आणि मोठमोठे ग्रंथकार व कवी नसते तर राजेलोकांचीं नांवें इतिहासांत चमकलीं नसतीं. व्यासमहर्षींच्या योगानें धर्माचें व कालिदासा-

मुळें भोजराजाचें नांव जिवंत राहिलें आहे. नाहींतर त्यांचीं नांवें जगाला महशूर होण्याचें काय कारण होतें? साधुत्व, सच्छीलता, इंद्रियनिग्रह यांमुळेंच सकल ऐश्वर्य प्राप्त होतें; हा बोध चित्तांत नित्य ठसविल्यास पापाचे दुष्परिणाम भोगावे लागणार नाहींत. भीष्म, अर्जुन, कर्ण, अभिमन्यु यांच्यापूर्वीं अनेक शूर योद्धे जन्म पावले असतील; पण ते अजरामर झाले नाहींत. त्यांचा गौरव अगर प्रसंशा कोठें झाली नाहीं. याचें कारण एकाद्या कवीनें, इतिहासकारानें किंवा व्यासासारख्या प्रासादिक वाणीच्या महात्म्यानें त्यांचे गुण गायिले नाहींत हेंच होय. यावरून धर्मनिष्ठ, सत्यनिष्ठ आणि शीलश्रेष्ठ महात्म्यांचें महत्त्वच अधिक आहे.

आपली प्रगति कशानें होईल असा प्रश्न प्रत्येक मनुष्यानें स्वत:च्या मनाशीं केल्यास ज्ञान, सद्गुण, सुविचार, सद्वर्तन, परोपकार आणि सत्कृत्यें हीं ज्या प्रमाणांत अधिक वाढलीं असतील किंवा एकंदर आयुष्यांत त्यानें ज्या उत्तमोत्तम गोष्टी केल्या असतील त्यावरून होतें असें त्याला आढळून येईल. प्रत्येक गोष्ट करतांना ती भली किंवा बुरी याचा विचार करून केल्यास त्यामुळें आपल्या उत्कर्षाचा हेतू साध्य होईल. शील, दानत आणि सद्वर्तन या त्रयींचा ज्याचे ठायीं संगम झाला त्यानें संपूर्ण जगाला अंकित करून घेण्याची मोहिनी विद्या हस्तगत केली असें समजावें. ही मोहिनी विद्या केव्हांहि उच्च दर्जाची समजली जाईल. या मोहिनी विद्येची सर नीच हेतूच्या पूर्तीस्तव

केलेल्या मोहिनी विद्येला कदापि येणार नाहीं. या प्रगतीला अंत नाहीं आणि तिला अडथळा होण्याचा तर संभव नाहींच नाहीं.

मन हा इंद्रियरूपी सैन्याचा अधिपती आहे. सैन्य हें नेहेमीं सेनापतीच्या ताब्यांत असलें पाहिजे तरच तें कुठेंहि विजय मिळवितें; तद्वत् ज्यानें हट्टानें आपलीं इंद्रियें भडकूं न देतां त्यांचें निवारण केलें आहे, त्याला यश हें मिळालेंच पाहिजे. विषयोपभोगापासून इंद्रियें अलिप्त ठेवणें व तीं तिकडे वळलीं तर त्यांना खेंचून आणणें यालाच इंद्रियनिग्रह किंवा इंद्रियदमन अशी संज्ञा आहे. विषयांचा इंद्रियांशीं अत्यंत निकट संबंध आहे. तेव्हां तीं केव्हां सैरावैरा धावूं लागतील याचा नियम नाहीं. तस्मात् त्यांचें नियमन करावें. त्यांना विषयापासून परावृत्त करावें. मथळ्यावर दिलेले भगवद्गीतेंतील श्लोक हेंच सांगत आहेत कीं, "इंद्रियें मनाच्या स्वाधीन ठेव. प्रीति किंवा द्वेष न ठेवतां विषयांचा उपभोग घे म्हणजे त्यापासून तुझें अंतःकरण शुद्ध व मन सुप्रसन्न राहील. चंचल मनाचा निग्रह अभ्यासानें आणि वैराग्यानें करतां येतो." इंद्रियनिग्रहानें मन शांत, स्थिर, योगयुक्त, विवेकी व समतोल बनतें. शाश्वत शांति आणि समाधान इंद्रियदमनानेंच प्राप्त होईल. विषयांनीं किंवा कुविचारांनीं घेरलेलें मन अलौकिक कृत्यें करण्यास नालायक आहे.

मन हें उद्दाम, उच्छृंखल व शिरजोर बनूं देऊं नये. आत्मसंयमन हा त्या वरील अधिकारी आहे. हा अधिकारी असा करडा व उग्र आहे कीं, त्याच्यापुढें मनरूपी सेवकाची कांहींएक

मात्रा चालत नाहीं. मन भलत्या मार्गानें जाऊं लागलें कीं, मनः-संयमनरूपी अधिकाऱ्याला त्याला खेंचून आणतां येईल. तें जरी चपळ, प्रबळ, अस्थिर व चंचल आहे तरी योगेश्वर श्रीकृष्णांनीं सांगितलेली युक्ति लागू केल्यास तें निमूटपणें कह्यांत राहील. तेव्हां इंद्रियांचा विषयोपभोगांपासून विरोध करणें हें प्रत्येक प्राणिमात्राचें व हितेच्छु, कल्याणेच्छु आणि उत्कर्षेच्छु तरुणाचें आद्य उच्च, पवित्रतम आणि महत्त्वाचें कर्तव्य आहे. उत्कर्षाची ही एक प्रमुख व श्रेष्ठ अशी पायरी आहे.

---

सर्वांग सुंदर ] [ २ रें वर्ष सुरू

नवयुगमाला

नमुना अंक ४ आणे.

रफ् कागद वा. व. ट. ख. सह २॥ रु.

ग्लेज कागद. .... .... ३॥ रु.

दर महिन्याच्या १ ल्या तारखेला प्रसिद्ध होते.

पत्ता-'नवयुगमाला' कार्यालय, बुधवार, पुणें, २.

## प्रकरण १० वें
# स्वदेशभक्ति

(श्लोक)

सृष्टी तुला पाहुनी धन्य माते, अशी रूपसंपन्न तूं निस्तुला ।
तूं कामधेनू, खरी कल्पवल्ली, सदा लोभला लोक सारा तुला ॥
त्या वैभवाला तुझ्या पाहुनीयां, मला स्फूर्ति नृत्यार्थ होई जरी।
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी ! तसें पाहिलें मी न कोठें तरी॥
माते ! महात्मे तुझे, तत्त्ववेत्ते तुझे, शूर योद्धे तुझे, सत्कवी ।
श्रेणी ययांची सदा माझिया गे ! मना आपुल्या पूजनीं वांकवी
यांचीं यशें ज्या नव्या सद्गुणांना, मला अर्पिती ध्येय ते गे जरी।
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी! तसें पाहिलें मी न कोठें तरी॥
तूझ्या महोदार सारस्वताच्या महासागरींचा जरी मीन मी ।
झालों तरी गे ! तृषा मन्मनाची कधींही कधींही न होणें कमी।
माते ! गुरुस्थान अंतीं जगाचें तुझें, यांत शंका न कांहीं जरी॥
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी ! तसें पाहिलें मी न कोठें तरी ।
वारा तुझ्या स्पर्शनें शुद्ध झाला, मला लाधला भाग्य हें केवढें ।
माते ! स्वयें देशि जें अन्नपाणी, सुधा बापुडी कायशी त्यापुढें।
तूं वाळगेशी मला स्कंधिं अंकीं, सुखाची खरी हीच सीमा जरी।
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी ! तसें पाहिलें मी न कोठें तरी ॥

—ना. वा. टिळक

हा माझा देश, ही माझी पवित्र जन्मभूमी, ज्या देशामध्यें जगदीशानें मला जन्म दिला आणि जिनें माझें पालन, पोषण व संवर्धन केलें ती ही माझी वंदनीय व पूज्य माता, असें अंतः-करण उचंबळून प्रेमपरिप्लुत उद्गार मुखांतून निघत नाहींत तो मनुष्य पशूकोटींतील होय. स्वदेशजननीबद्दल ज्याला आदर, अभिमान व पूज्यबुद्धि नाहीं त्या मनुष्याचें जीवन व्यर्थ आहे. देशाकरितां अखंड तळमळणारा आणि तिच्या प्रीत्यर्थ प्रसंगीं बलिदान देणारा वीर पुरुषच धन्य आहे. असले पुरुष ज्या माउलीच्या उदरीं जन्म पावतात ती माउली धन्य आणि ज्या स्त्रियांस असले पति प्राप्त होतात त्या स्त्रिया धन्य होत! असल्या आदर्शवत् महात्म्यांना शतशः प्रणाम असो!

निरपेक्ष बुद्धीनें हालअपेष्टा सोसून स्वदेशकल्याणाकरितां पंचप्राणाची आहुति देणारा आणि निर्मळ सत्याचें अवलंबन करून देशांतील अहितकर, पोरकट, क्षुद्र, अपायकारक, वेड-गळ आणि कोत्या समजुतींचें निर्मूलन करणारा हाच देशाचा खरा हिंतचिंतक होय! दांभिक, लोभी व मानमान्यतेला हपाप-लेला हा देशाचा भयंकर असा कट्टा शत्रु आहे. असल्या स्वार्थ-साधु, दांभिक व नकली देशाभिमानास कवडीचीहि किंमत नाहीं. हीं माणसें नकलीं नाण्यांच्या खणखणाटाप्रमाणें शेवटीं खोटीं निघून उपहास व दुष्कीर्ति यांना पात्र होतात. केवळ लोक-प्रियता संपादन व्हावी एतदर्थच त्यांचे अहर्निश परिश्रम चालू

असतात. हे देशाचे खरे हितकर्ते नव्हत, तेव्हां या भेसळ नाण्यांचा स्वदेशास काय उपयोग होणार ?

स्वदेशभक्ती ही अनेक प्रकारांची असूं शकते. आपले प्राचीन धर्मग्रंथ व इतिहास, मातृभाषा, आपले तत्त्वज्ञानी कवि, ग्रंथकार, मुत्सद्दी, साधुसंत व मोठमोठे महात्मे, आपले आचारविचार व चालीरीती, पोषाख, आपली उज्ज्वल स्वकीय संस्कृति वगैरे गोष्टींबद्दल अभिमान बाळगणें हें स्वदेशभक्तीचेंच द्योतक आहे. हा एक देशाभिमानाचाच प्रकार होय. ज्या राष्ट्राला आपल्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचा अभिमान नाहीं त्या देशाचा भाग्योदय दूर आहे असें निःशंक समजण्यास बिलकुल प्रत्यवाय नाहीं.

हल्लीं देशाभिमान फारच बोकाळला आहे. प्रत्येक जण स्वतःस देशाभिमानी म्हणवितो. ज्याला देशस्थिति कशी आहे याचाहि उलगडा झालेला नाहीं तो देखील मी स्वदेशाभिमानी अशी घोषणा करीत आहे. सरकारवर यथेच्छ तोंडसुख घेणें, परक्यांना नांवें ठेवणें व आमचीच संस्कृति अधिक श्रेष्ठ असल्याचा डांगोरा पिटणें, देशांतील अज्ञान, कोत्या समजुती यांचें निर्मूलन न करतां फक्त त्यांना दोष देत रहाणें, "**अप्रियस्य च पथ्यस्य**" न बोलतां लोकांना जें प्रिय वाटेल तेवढेंच बोलणारा आणि आचारविचारांत जो कमीपणा आहे तो भरून न काढतां त्याला दूषण देत बसणारा, लंब्याचवड्या पोकळ पांडित्याच्या गप्पा मारणारा पण हातून

मोठ्या थोरल्या वर्तुळाइतकें कार्य बजाविणारा हा खरा देशाभिमानी व राष्ट्राच्या उद्धारासाठीं झटणारा आहे काय ? असले देशाभिमानी व स्वातंत्र्याभिमानी शतशः सांपडतात. या लोकांपासून देशहित बाजूलाच राहून अनवस्था प्रसंग मात्र देशावर कोसळतात. ब्राह्मण-ब्राह्मणेतर, हिंदु-मुसलमान, हिंदु-पार्शी, स्पृश्य-अस्पृश्य यां परस्परांमध्यें द्वेषाची भावना व मत्सरबुद्धीचें विष यांचा फैलाव करून देणारे हेच भोंदू स्वदेशाभिमानी असतात. एकीच्या ठिकाणीं बेकी कशी करावी याचा धडा घालून देणारे हेच देशाभिमानी गुरु असतात.

लो० टिळक, महात्मा गांधी, पंडित मोतीलाल व जवाहरलाल नेहेरु, दास बाबू, स्वामी श्रद्धानंद, देवी सरोजिनी नायडू, लाल लजपतराय इत्यादिकांची देशभक्तीच खरी व अलौकिक असते. तरड्याच्या रंगाप्रमाणें पालटणारा देशाभिमान कांहींच फलनिष्पत्ति करूं शकत नाहीं. आपल्या देशाची प्रगति आणि उन्नति व्हावी, देशबांधवांचें व भावी पिढीचें कल्याण व्हावें जातींजातींत संघटन होऊन त्यांचें एकदिल व्हावें, अशा प्रकारचे प्रयत्न करण्यांतच राष्ट्रोन्नतीचा पाया आहे. आणि हेंच प्रत्येक देशाभिमानी म्हणविणाराचें आत्यंतिक पवित्र कार्य आहे. यांत तिळमात्र जरी हयगय, कसूर आणि हेळसांड झाली तरी त्याचा देशाभिमान तो कोठें राहिला ? अशा स्वार्थपरायण व स्वकार्यसाधु ढोंगी देशभक्तांना उद्देशून एका आधुनिक कवीनें म्हटलें आहे :—

( श्लोक )

मातेचे परि पोसुनी, अगणितें दुःखें महा सोसुनी ।
द्रव्यें त्या निरपेक्ष देउनि किती केला सुखी जाणुनी ॥
हा हा विस्मृति आर्यभूजननिची अंतीं जहाली जया ।
गेला जन्मुनि व्यर्थ तो नर खरा धिःकार माझा तया ॥ १ ॥
माथाकूट अहर्निशीं करुनियां विद्या जरी लाधली ।
किंवा स्वोदरपूरणादिक कल कोणी किती साधली ।
देशाचे हितकारणींच झटण्या आली न बुद्धी जया ।
गेला जन्मुनि व्यर्थ तो नर खरा धिःकार माझा तया ॥ २ ॥
माझें हें घरदार वित्त मुलगे माझे सगे सोयरे ।
केलें म्यां अमकें करीन तमकें मत्कीर्ति देशीं फिरे ।
" माझा देश " असे न शब्द सुचती स्वप्नांत हा हा जया
गेला जन्मुनि व्यर्थ तो नर खरा धिःकार माझा तया ॥ ३ ॥

असे धिःकारयुक्त शब्दच खोटा देशाभिमान धारण करणाऱ्या मनुष्याला ऐकावे लागून त्याची जिकडेतिकडे छीःथू होईल. अरेरे ! ! अशा प्रसंगीं त्याला निशाचराप्रमाणें तोंड काळें करून कोठेंतरी शेष जीवित कंठण्याचा प्रसंग आला असतांना जगण्यापेक्षां मरणेंच अधिक श्रेयस्कार वाटल्यास नवल नाहीं.

कितीहि संकटें कोसळलीं, हिमालयासारखीं मोठालीं दुःखें प्राप्त झालीं, नानाविध दुर्धर प्रसंगांनीं पाठपुरावा केला तरी ज्याची हिंमत प्रचंड, मेरूतुल्य अढळ, धैर्य, अभंग व शांति हीं

कायम राहतात व जो स्वदेशहितास्तव प्रत्यक्ष आपलीं मुलेंबाळें स्वतःचा प्यारा जीव अर्पण करितो, तोच जयजयकार व गौरव करण्यास अगदीं योग्य महात्मा होय. त्यालाच धन्यवाद देऊन त्याच्यावर आनंदाश्रु ढाळिले पाहिजेत. त्याला मानव-कोटींतून उचलून देवकोटींत घातला पाहिजे. असे महात्मे ज्या देशास लाभतील तो देश धन्य होय ! पण असे देशाभिमानी क्वचित्च सांपडतात आणि म्हणूनच त्यांना पूज्य लेखलें पाहिजे. इटलीचा प्रसिद्ध स्वदेशाभिमानी गॅरिबॉल्डी याचा देशाभिमान तर अलौकिक होता. स्वदेशांत अधिकाऱ्यांचा उपसर्ग व छळ झाल्यामुळें त्यानें स्वदेशत्याग केला. आपलें आप्तस्वकीय, नातेवाईक, इष्टमित्र यांना तो पारखा झाला. अन्नपाण्याचे अत्यंत हाल होऊन शत्रूंपासून त्यास त्रास होऊं लागला. प्रियपत्नी इहलोक सोडून गेली. काकपक्षी ज्याप्रमाणें फळांवर टोंची मारतात त्याप्रमाणें बहुजनसमजानें त्याला कटु, तीव्र व ज्वलज्जहाल शब्दांनीं नांवें ठेवून त्याची अनेक प्रकारें निंदा केली. पण त्यानें लोकांकडे यत्किंचित्हि लक्ष न पुरवितां देशसेवा केली. संपत्ति, मान, अधिकार वगैरे अनेक स्वकल्याणाचे प्रसंग त्याला प्राप्त झाले तरी त्यानें त्याची आसक्ति केली नाहीं. स्वदेशासाठीं तो स्वप्राणाची आहुति देण्यास सिद्ध झाला. धन्य तो नरश्रेष्ठ ! धन्य त्याचें शौर्य ! ! असे पुरुष हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेंच सांपडतात.

देशभक्तीचा आणखी एक प्रकार आहे तो म्हणजे परकीय राष्ट्रांपासून ग्रहण करण्यायोग्य ज्या गोष्टी असतील त्या घेणें ही होय. त्यामुळें देशभक्तीस बाध न होतां उलट अधिक उत्कर्षच होईल. दुसऱ्याचे दुर्गुण घेणें जितकें सोपे आहे तितकें सद्गुण घेणें सुलभ नाहीं. यास्तव सद्गुण चांगले आहेत याची खात्री करून ते घ्यावेत. यूरोपियन लोकांपासून नियमितपणा, टापटीप, स्वच्छता, दृढनिश्चय, सततोद्योग, धाडस, साहस, पराक्रम, शौर्य, एकी, देशभक्ति वगैरे अमोलिक गुण अनुकरण करण्यासारखे आहेत. त्यांचा पेहराव आणि चालीरिती यांचें अनुकरण करण्यापेक्षां असल्या गुणांचें अनुकरण करणें हिंदुसमाजाला अधिक तारक होईल. प्रत्येकानें—

( गज्जल )

हिन्दुओंका देश प्यारा, एक हिन्दुस्थान है।
धर्म भी है प्राण—प्यारा सब सुखों की खान है॥
धर्म ही के कारणे यह, देश अविनाशी हुआ।
धर्म रिपु का दमन करने, जन्म मेरा है हुआ॥१॥ —वामन

असे विचार मनाशीं बाळगून देशाचें कल्याणासाठीं झटावें, नाहींपेक्षां—

( श्लोक )

जे स्वत्पुत्र उदारधी झिजविती काया तुझ्या सेवनीं।
जाळाया निज पोटही शिणविली वाणी तयां निंदुनी॥

व्हावा तोष धन्यास यास्तव सदा मी हासलों त्यांजला ।
आतां तूं कुरवाळशील वद का ऐशा कुपुत्रा मला ? ॥ २ ॥
' खोटी ही दुबळी, गुलाम, भरला वृद्धापकाळीं चळ ' ।
ऐसा दोष दिला तुला वश परां होवोनियां केवळ ॥
आतां हें स्मरतां मना, हळहळें तें, गे ! गळा दाटला ।
डोळे तूं पुसशील काय पदरें घेवोनि अंकीं मला ॥ ३ ॥
जें त्वां जीवन हें दिलें सकळही सत्ता तुझी ज्यावरी ।
जातां तें परसेवनीं न तिळही संकोचलों अंतरीं ॥
' धिक् धिक् जीवन हें' असें मन अतां धिक्कारितें गे ! मला।
त्यातें तूं धरिशील काय हृदयीं पान्हा फुटोनि तुला ॥ ४ ॥
आहाहा ! सुत ते असिव्रत जयीं त्वत्सेवनीं पाळतां ।
धैर्याचे गिरि ते कधीं न उगल आकाशही फाटतां ॥
नेतां त्यांस दिगंतरास फुटला आई ! उमाळा तुला ।
डोळे तूं पुसशील कां निज, यमें नरकास नेतां मला ॥ ५ ॥

—भा. रा. तांबे

असा धाय मोकलून दीनस्वरानें आक्रोश करण्याचा प्रसंग आल्याविना राहाणार नाहीं हें पूर्ण लक्षांत बाळगावें.

---

# प्रकरण ११ वें

# निष्काम कर्माचरण

(आर्या)

वाहे सर्व जगाची जगदीश्वर काळजी, तया शरण ।
भावें जाय, पडेना वाण कशाचीहि त्यास आमरण ॥ १ ॥
यास्तव तुज म्हणतों कीं, आठवुनी त्या दयाघना भावें ।
सर्वा कर्मारंभा आधीं त्याचेंच साह्य मागावें ॥ २ ॥
वागावें धर्मानें, मालवितां धर्मदीपकज्योती ।
दुर्गम मार्ग समस्तहि संसारीं ह्या तमोमयीं होती ॥ ३ ॥
जे वर्ततात धर्मे कर्मे करितात ईश्वरा स्मरुनी ।
अवतार ईश्वराचे ते नर, इतरांसि तारिती तरुनी ॥ ४ ॥

—गं. रा. मोगरे

(ओंव्या)

प्रयत्नीं चुकों नये । सुखवासी कामा नये ।
सुचावे नाना उपाय । अनेक विषयीं ॥ १ ॥
धुरेनें धीर सोडूं नये । मुख्य प्रसंग चुकों नये ।
उद्योगरहित कामा नये । पशु जैसे ॥ २ ॥
उपाधीस कंटाळला । विचाराचा आळस आला ।
म्हणजे जाणावा चेवला । बुद्धीपासुनी ॥ ३ ॥

खबरदारी आणि वेगीं । तेणें सामर्थ्य चढे आंगीं ।
नानाप्रसंगें कार्यभागीं । अंतराचि न पडे ॥ ४ ॥

—श्रीरामदासस्वामी

(श्लोक)

कर्मण्येवाधिकारस्ते । मा फलेषु कदाचन ॥
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोस्त्वकर्मणि ॥ १ ॥

—गीता

अर्जुना इंद्रियांतें जो । मनें करुनि आंवरी ॥
कर्मेन्द्रियें कर्मयोग । करी निष्काम थोर तो ॥ १ ॥

—वामन

फलाची आसक्ति न ठेवतां, विवेकबुद्धि व कार्याकार्यविचार-शक्ति यांनीं युक्त, रागद्वेषविरहित अनासक्त बुद्धीनें आणि कर्माकर्माचा निवाडा करून जें कर्तव्य केलेलें असतें त्यांस निष्काम कर्माचरण अशी संज्ञा आहे.

कर्तव्य करणें हा मानवाचा अधिकार आहे, परंतु त्याचा मोबदला मिळावा अशी इच्छा धरूं नये असें भगवंताचें सांगणें आहे. असें कर्म करणाऱ्या पुरुषाला सात्विक कर्म करणारा असें म्हणतात.

प्रत्येकास आमरण उद्योग हा केलाच पाहिजे. कारण स्वतःची धारणा ही त्याशिवाय होणें शक्य नाहीं. एक क्षणभर-सुद्धां मनुष्यास कर्म केल्यावांचून राहतां येणार नाहीं. कर्म अढळ असून तें चुकवितां न येणारें आहे. तेव्हां तें स्वतःस

हितावह कसें होईल याचा प्रत्येकानें स्वतःच्या शिक्षित, विचारी व सुसंस्कृत मनाशीं प्रश्न करून आपलें नेमलेलें कर्तव्य बजाविण्यांत चुकूं नये. "**योगः कर्मसु कौशलम्**" हें गीतावचन ध्यानांत ठेवावें.

कर्तव्य क्षुल्लक असो वा महत् असो; तें सर्वांगसुंदर करावें, पण फलासक्ति ठेवूं नये. तुम्हांला कर्तव्य करीत असतांना जो आनंद होईल तेंच तुमच्या उद्योगाचें फळ समजा. योगीजनांचा योग यापेक्षां निराळा कां आहे ? श्रीकृष्णांनीं संन्यास व कर्मयोग असे दोन मोक्षदायक मार्ग अर्जुनाला सांगितले आहेत. पण त्यांत कर्मयोग अधिक प्रशस्त म्हटला आहे. "**तयोस्तु कर्म संन्यासात्कर्मयोगो विशिष्यते**" हेंच तें गीतावचन होय. हाच मार्ग प्रत्येकाला अवलंबन करण्यास योग्य आहे आणि तो निःश्रेयसकर आहे.

आपण लहानसहान कर्तव्यांना तुच्छ लेखतों. पण ही मोठी चूक आहे. लहान कर्तव्य केल्याविना महत्कार्य साधत नसतें. केबलनें बारीकसारीक कार्यांविषयीं म्हटलें आहे :—

The trivial round, the common task,
Will furnish all we ought to ask.
Room to deny ourselves, a road,
To lead us daily nearer God.

यावरून त्यांचें महत्त्व लक्षांत येईल.

पण कर्म हें शुद्ध स्वरूपाचें असावें. अन्याय, अनीति किंवा पापी हेतूंच्या सिद्धीस्तव केलेलें कार्य हें खरें कर्म नव्हें. अशा कर्माला परमेश्वर सहाय्यभूत होत नाहीं. त्या मनुष्याला मोक्ष तर मिळणार नाहींच, पण रौरक नरकांत पिचत पडण्याचें मात्र त्याच्या नशिबीं येईल. केवळ लोककल्याणाच्या सदिच्छेनें प्रेरित होऊन, यशापयशाची पर्वा न बाळगतां, शुद्ध व पवित्र बुद्धीनें कर्मफलाची आकांक्षा अंत:करणांत न बाळगतां, जो कर्तव्य पाळलेंच पाहिजे, अशा विचारानें आजन्म उद्योग करीत राहील तोच खरा कर्मयोगी ! हा कर्मयोग जो आचरणांत आणील, जो या क्रियात्मक ज्ञानाचा अनुभव घेईल, तो “ **नराचा नारायण** ” होईल.

प्रकृतीचे गुणधर्म प्रत्येक मनुष्याकडून कांहींना कांहीं तरी कर्म करवून घेतातच. क्रोध, येणें, हंसणें, रडणें, प्रीति, द्वेष, स्तुति, निंदा, परोपकार इत्यादीं कर्में करणें, श्वासोच्छ्वास करणें, आशा-निराशेचीं हृदयांत तुंबळ युद्धें माजणें इत्यादी क्रिया कर्मांतच अंतर्भूत होतात. तात्पर्य काय कीं—

> **नहि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।**
> **कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ १ ॥** –गीता

आम्ही कर्म करावयाचें नाहीं म्हटलें तरी चालणार नाहीं. प्रयत्नत: किंवा अप्रयत्नत: घडणाऱ्या सर्व क्रियांचा ‘कर्म’ या द्व्यक्षरी शब्दांत समावेश होतो.

कर्म माणसांस चुकवितां येत नाहीं हें सिद्ध झालें. पण इष्टफलप्राप्त न झाल्यास जें आपणांस दुःख, शोक, क्लेश, इत्यादी उत्पन्न होतात ते चुकवावयाचे कसे? श्रीकृष्ण यास उत्तर देतात–" **असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः** " म्हणजे कर्माच्या ठायीं आसक्ति न ठेवतां सतत कर्म करीत रहावें म्हणजे त्याला उत्तम गति प्राप्त होते. विहित कर्म निरंतर करावें, परंतु त्यांत स्वत्व, अहंकार अथवा फलाशा ठेवूं नये. ब्रह्मार्पण किंवा कृष्णार्पण बुद्धीनें कर्म करीत रहावें. ज्या कर्मांत अनासक्ति व निरपेक्षत्व अधिक प्रमाणांत होईल त्या प्रमाणांत तें कर्म अधिक सुंदर, लोककल्याणास सहाय्यभूत व चिरंतन कीर्तीस पात्र होईल. हीच जीविताची इतिकर्तव्यता होय. ज्या कर्मामुळें मनुष्यास संतोष, शांति, सुख व समाधान लाभतें तें कर्म श्रेष्ठ दर्जाचें समजावें. असत्कर्मापासून दुःखाचे डोंगर भोगावे लागतात. एकनाथ महाराज म्हणतात–" प्रयत्न करण्यांत केहांहि कसूर करूं नये. मग त्याचें फळ मिळो वा न मिळो ! प्रयत्नीं मग्न असणें हेंच पुरुषत्वाचें लक्षण आहे." तेव्हां हें नियतकार्य प्रत्येकास केलेंच पाहिजे. त्यांत अपमान अथवा कमीपणा समजण्याचें करण नाहीं. मनानें केलेलें कार्य हेंच खरें कार्य आहे. " **मनःकृतं कृतं राम न शरीरकृतं कृतम्** " असें योगवासिष्ठांत म्हटलें आहे. अविरत कर्म करणें ही वेदांतदृष्ट्या विश्रांतीच समजली जाते आणि कर्म हेंच कर्माचें सत्य पारितोषिक आहे. आणखी निराळ्या बक्षिसाची काय जरुरी आहे?

तेव्हां प्रत्येक मनुष्यानें आणि अभ्युदयार्थ अहर्निश धडपड करणाऱ्या व कर्मभूमीवर नुकताच पदविन्यास करणाऱ्या तरुणानें निष्काम कर्मयोगाचा धडा अंगीं बाणवून घ्यावा. त्याला व्यवहारांत यश आणि अंतीं मोक्ष मिळेल. असें योगेश्वर श्रीकृष्ण सांगत आहेत. हाच जीवितसाफल्याचा खरा मार्ग आहे.

---

सर्वांग सुंदर ] [ सर्वांग सुंदर

नवयुग माला

तिसरें वर्ष ऑगष्टपासून सुरू झालें. ४ आण्यांचीं पोष्टाचीं तिकिटें पाठवून—

नमुना अंक मागवा.

पत्ता—'नवयुगमाला' कार्यालय, पुणें नं २

प्रथम आमच्याकडेच चौकशी करा !

पी. डी. ब्रदर्स बुधवार, पुणें शहर

आमच्याकडे सर्व तऱ्हेचीं फाउंटन्पेनें विकत मिळतील व त्याचप्रमाणें रिपेअरहि केलीं जातील. प्रथम आमच्याकडे चौकशी करा.

—हलकीं पेनें घेऊन फसूं नका—

# प्रकरण १२ वें

# शांति, सौख्य व दिव्यदृष्टि

( श्लोक )

ज्यांचें निर्मल, शांत शुद्ध मन त्यां पीडा करूनी बळें,
लोहाच्या जरि पंजरीं अडविलें, कारागृहीं कोंडिलें,
त्यांतें दु:सह अंध दु:ख न शिवें, आनंदहानी न हो;
मानीती निजआश्रमासमचि तीं दंडस्थळें चित्तिं हो !

—लव्हलेस

( श्लोक )

योऽन्त:सुखोन्तरारामस्तथाऽन्तर्ज्योतिरेव य: ।
स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥ १ ॥

—भगवद्गीता

भीतीस गर्तेत मिळेल थारा । निराशतेचा न शिवेल वारा ॥
न प्रीतिचा निर्झर शुष्क होई । पृथ्वी तदा स्वर्गचि अन्य होई॥

—मॉरिस

ऐसें भाग्य कई लाहता होईन । अवघें देखें जन ब्रह्मरूप ॥१॥
मग तया सुखा अंत नाहीं पार । आनंदें सागर हेलावती ॥२॥

—गाथा

( श्लोकार्ध )

सदा संतुष्टमनस: । सर्वा: सुखमया दिश: ॥ —भागवत

प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो ज्यानें केला ।
तो नर भला भला रे भला भला ॥

—शिवदीन केसरी

आराधिलेंचि असतें जरि प्राप्त होतें ।
नाहीं असेंच मन साक्ष दिसोनि येतें ॥
कष्टी कशास हृदयीं शिण कां धरावा ? ।
दाटून राग दुसऱ्यावर कां करावा ? ॥ १ ॥ —रामदास

(आर्या)

कोण दरिद्री ज्याच्या हृदयीं तृष्णा सदा विशाल वसे ।
धनवान् कोण म्हणावा जो नर संतुष्टचित्त नित्य असे ॥

—कृष्णशास्त्री चिपळूणकर

इहलोकचा स्वर्ग किंवा नरक, नंदनवन किंवा स्मशान बनविणें हें आपल्या मनःस्थितीवर अवलंबून आहे. "**मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः**" ही भगवदुक्ति आहे. प्रसन्नतेंत शांति, सौख्य समाधान यांचा उगम आहे. दुःखी, कष्टी, रागीट, चिडखोर व उद्विग्न मुद्रा तुमच्या शांतिसौख्यांत बिघाड करते, तर आनंदीवृत्ती जगाच्या सुखांत भर घालते. प्रसन्न मुद्रेलाच यश आहे. निर्मळ आनंदी स्वभावाच्या माणसाचा कुठेंहि गौरव आहे. आनंदी मुलाला चटकन् उचलून घ्यावेसें वाटतें. किरकिरें व रडवें मूल मनुष्याला आवडत नाहीं. पक्षांचीं प्रफुल्लित मनें पहा. नृत्य करणाऱ्या मोराकडे पहा. निसर्गाचें मनो-

हर लावण्य अवलोकन करा. चोंहीकडे आनंद, प्रफुल्लितता व हास्य दृगोच्चर होईल.

( अभंग )

**मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचें कारण ॥**
**मोक्ष अथवा भवबंधन। सुख समाधान इच्छा ते ॥१॥**

—तुकाराम

असें वेदान्ती मुमुक्षु देखील कंठरवानें सांगत आहेत. चित्तवृत्ति आनंदी ठेवा, तुम्हांला शांतिलाभ होईल; व्यापारी असाल गिऱ्हाईक वाढेल; कवि असाल काव्यांत मनोहारित्व येईल; ग्रंथकार असाल ग्रंथलेखनांत और जादू उत्पन्न होऊन लोकांच्या ग्रंथावर उडया पडतील; वक्ते असाल तुमच्या भाषणाचा प्रभाव बहुजनसमाजावर पडून लोकप्रियता संपादन कराल; शिक्षक असाल विद्यार्थ्यांचीं मनें तुमच्याबद्दल प्रेममय बनतील; इतकेंच काय तर अस्वच्छता, कुरूपता, अज्ञान यांच्यावर देखील त्यामुळें पांघरूण पडेल. दीर्घायुष्य, आरोग्य, सौख्य, शांति, समाधान व लोकप्रियता मिळविण्याचें हें एक सुलभ साधन आहे. स्नेह-संबंध व मैत्री दृढतम होईल. खिन्नता आणि औदासिन्य यांचा वरचष्मा कार्यनाशक—उच्छेदक—आहे. अतएव आनंदी—प्रफुल्लित—वृत्ति ठेवा. आपल्या मनाचा समतोलपणा ढळूं देऊं नका. कुठेंहि जा, पण उदासीनता व निराशा यांचा त्याग करून जा. जगांत तुमचा जयजयकार व्हावा अशी इच्छा आहे ना? आनंदी मुद्रा धारण करा! मग जगावर तुमची छाप बसेल. तुम्ही

धनिक असा, विद्वान् पंडित असा किंवा समाजाचे अध्वर्यु असा पण प्रसन्नतेचा अंशहि जर तुमच्या मुखावर दृष्टीस पडला नाहीं तर, जगाला तुमचें सान्निध खास आवडणार नाहीं. कुणीकडे आनंदी वृत्ति व प्रसन्नचित्त आणि कुणीकडे खिन्न तिरसट, उर्मट व गर्विष्ठ अशी वागणूक ? इहलोकची विपत्ति आणि मुक्तांचें स्वर्गसुख यांत जितका फरक आहे, तितकाच वरील गोष्टींत आहे. म्हणून आपण —

**गणावें दु:खातें स्थिर, अढळ, आनंदभरतें,**
**तयासंगें व्हावें दृढ, निवळ, उन्नीत मन तें;**
**तसें यावें त्यातें बल, सकल जें ताप निववी,**
**मनीं, ध्यानीं, अंतीं, स्थिरतर विवेका निपजवी.**

—डिन्देरी

अनंत सुख भोगण्याचा जो हा मनाचा नैसर्गिक धर्म आहे तो मिळविण्याचा प्रयत्न करावा. मन तापत्रयांत व दु:खांत चूर होऊं देऊं नये. त्याचा अवलंब केल्यास मनुष्य शोकानें व्याप्त होईल. “ **संपूर्ण जगदेव नंदनवनं** ........... **दृष्टे पर-ब्रह्मणि** ” ( श्रीशंकराचार्यकृत धन्याष्टक ) ही वेदान्ती-दृष्टि सोडून दिल्यास व्यावहारिकदृष्टीनें यालाच ‘ **दिव्यदृष्टि** ’ अशी संज्ञा देतां येईल. कारण दु:खांचा विनाश होऊन मह-त्सुख ज्या गोष्टीनें मिळते ती गोष्ट दिव्यदृष्टीचीच द्योतक नव्हे काय ? रामतीर्थ व विवेकानंद यांचें देखील हेंच सांगणें आहे कीं, “ तूं प्रकाश आहेस. दिव्य आनंद तुझ्या अंत:करणांत

निर्माण होऊं दे. प्रत्यक्ष आनंद तूंच आहेस. प्रेमानें जें काय होईल, हंसतमुखानें जो तुमचा लोकांवर प्रभाव पडेल, त्याची सर कशासहि येणार नाहीं." "**इति वेदान्तडिंडिमः**"

शेक्सपीअरच्या हॅम्लेट नाटकामध्यें जेव्हां नायकाची व रोझिनक्रांट याची गांठ पडली त्या वेळेस नायकानें म्हटलें, "बाबारे, जग हा एक प्रचंड कारागृह असून त्यांत साध्या व अंधार-कोठड्या आहेत. त्यांतील जी अत्यंत वाईट आहे. ती हा डेन्मार्क देश समज." रोझिनक्रांटला ही विचारसरणी मानवली नाहीं. तेव्हां तो पुनश्च म्हणाला " हें जग तुला कारागृह आहेसें वाटत नाहीं, हें रास्तच आहे. कारण चांगलें वाईट व सुखदुःख हें मानण्यावर अवलंबून आहे. मला तर बाबा तो एक तुरुंगच आहेसा वाटतो. " अगदीं बरोबर आहे. ज्याचें मन संतुष्ट आहे त्याला सर्वत्र सुखसमृद्धीच मिळणार. ज्याच्या पायांत जोडा आहे, त्याला सर्व भूमि कांतडें अंथरल्याप्रमाणें मृदु लागते. इतरांना जी गोष्ट कांट्याप्रमाणें बोंचते तीच आनंदी अंतःकरण असणाऱ्या मनुष्याला फुलाप्रमाणें मृदु लागते. तेव्हां आपण दृष्टी बदलली पाहिजे व मन आनंदींत ठेवून जगांतील शांति व सुख यांचा सुस्वाद घेतला पाहिजे. जगांत जें कुठें सांपडणार नाहीं तें यांत मिळवितां येईल. जगाला हंसवा आणि स्वतःहि हंसा. रडके चेहेरे धारण करून व नैराश्य यांनीं हतबल होऊन कां कुठें या दिव्यदृष्टीचा लाभ आणि सौख्याचा ठेवा मिळवितां येत असतो ?

ही दिव्यदृष्टि भगवद्गीतेंतहि अर्जुनाला दिली आहे. परमेश्वराचा अनन्यभक्त या दिव्यदृष्टीनें होऊं शकतो. अर्जुनाची निराशा घालविण्याकरितां व त्यास कर्तव्याचरणास प्रवृत्त करण्याकरितांच गीताग्रंथ निर्माण झाला. " **स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः** " हें वाक्य विसरून, चातुर्वर्ण्यधर्मास तिलांजली देऊन, अनेक मतमतांतरें व धर्मसांप्रदाय निर्माण करून, आम्ही आत्मघाताचे अधिकारी बनलों आहोंत. परमेश्वरास विश्वबाह्य पहाण्याच्या खटाटोपांत न पडतां अनन्यभक्तीनें दिव्यदृष्टि मिळवावी. यज्ञयाग, पातंजलयोग, वेदान्तग्रंथाध्ययन इत्यादीं साधनें ' **अनन्यभक्त** ' होण्यास लागत नाहींत असें भगवंताचें स्पष्ट सांगणें आहे. ( गी० अ० ११ श्लो० ५३ –५४ पहा . ) तेव्हां आपला स्वरूपभ्रम नाहींसा करावा. शिवाय ईश्वर जर आनंदमय आहे तर आपणांसहि आनंदी बनलें पाहिजे.

अर्जुनाप्रमाणें । वेदवाक्यावरी ।
श्रद्धा ज्याची खरी । त्याला दिसे ॥ २२ ॥
हीच ' दिव्यदृष्टि, ' । हीच ' योगशक्ति, ' ।
' साक्षात्कार,' ' मुक्ति, ' । जाणा ऐसें ॥ २३ ॥

—श्रीभगवान् मायानंद चैतन्य

तेव्हां ज्यांना सौख्य व शांति हवी असेल त्यांनीं दिव्यदृष्टीनें आत्मज्ञान करून घ्यावें. श्रुतींत म्हटलें आहे—

**' नायनात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया, न बहुना श्रुतेन !
यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनुं स्वाम् ॥**
म्हणजे आत्मज्ञान हें प्रवचनाच्या योगानें; केवळ बुद्धिकौशल्याच्य योगानें किंवा नुसतें वेदाध्ययन केल्यानें प्राप्त होणें शक्य नाहीं. ज्याला आत्मज्ञानाविषयीं तीव्र तळमळ लागून राहिली असेल त्यालाच आत्म्याचें स्वरूप गोचर होतें.

हें आत्मज्ञान संसारांत राहूनहि संपादन करितां येईल. दिव्यदृष्टीचा स्वानुभव हा येथेंहि ( संसारांत ) मिळतो. लबक् म्हणतो–"ज्यानें इंद्रियदमन केलें आहे व ज्याचा आपल्या मनावर पूर्ण ताबा आहे; तोच श्रेष्ठ दर्जाचा साधु होय. मग त्याला जटा, भस्म, रक्षा, कमंडलू अथवा आसन इत्यादिकांचीं नांवेंहि माहीत नसलीं तरी हरकत नाहीं."एकनाथ, तुकाराम, साक्रेटिस, रामतीर्थ हेंहि सांसारिकच होते हें लक्षांत ठेवावें. श्रीसमर्थ, म्हणतातः—

**जो प्रपंच करील प्रमाण । तोच परमार्थ करील जाण ॥
जो प्रपंचीं अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥ १ ॥**

आपली चित्तवृत्ती शांत ठेवून साक्षी या नात्यानें सर्व व्यवहार केल्यास साक्रेटीसास व तुकारामास ज्याप्रमाणें दारिद्र्याचा, अरिस्टायडीस देशत्यागाचा, आनक्स्यागोरास कारागृहाचा व फोशियन यास देहदंडाचा विषाद वाटला नाहीं, त्याप्रमाणें आपणांस कोणत्याहि उपाधींचा विषाद वाटणार नाहीं. आत्माज्ञानाशिवाय दिव्यदृष्टि, शांति आणि सुख यांचा लाभ

होणार नाहीं. " तूं स्वतःची ओळख करून घे." अशा अर्थाची ग्रीक भाषेंत जी म्हण आहे, तिचा 'आत्मज्ञान करून घ्यावें' हाच सांगण्याचा उद्देश आहे. तात्पर्य काय कीं, मनुष्यानें नाना शास्त्रांचें पठण केलें किंवा नाना दैवतांची पूजा केली, " **नानाशास्त्रं पठेल्लोके । नाना दैवतपूजनम्** " तरी जोंपर्यंत आत्मज्ञान झालें नाहीं तोंपर्यंत ही सर्व खटपट व्यर्थ आहे.

**आत्मज्ञानं विना पार्थ । सर्वं कर्म निरर्थकम् ॥**

—उत्तरगीता

---

सर्वांग सुंदर ] [ २ रें वर्ष सुरूं

**नवयुगमाला**

**नमुना अंक ४ आणे.**

रफ् कागद वा. व. ट. ख. सह २॥ रु.

ग्लेज कागद. .... .... ३॥। रु.

दर महिन्याच्या १ ल्या तारखेला प्रसिद्ध होते.

पत्ता-'**नवयुगमाला**' कार्यालय, बुधवार, पुणें, २.

# प्रकरण १३ वें

## सम्राटांचा सारिपाट

‘ असार जीवित । केवळ माया ! ’ रडगाणें हें गाउं नका ॥
घेई झोंपा तो नर मेला, संशय त्याचा धरूं नका ॥ ध्रु० ॥
अफाट ऐशा विश्वरणांगणिं जीवित युद्धाचि चालतसें ॥
त्यांत लढोनी बहु धीरानें नांव गाजवा शूर असें ॥
जाते घडि ही अपुली साधा करा काय तें अतां करा ॥
चित्तामध्यें धैर्य धरा रे, हरिवरि ठेवा भाव पुरा ॥
थोर महात्मे होउनि गेले, चरित्र त्यांचें पहा जरा ॥
आपण त्यांच्या समान व्हावें हाच सांपडे बोध खरा ॥

—ह. ना. आपटे

( श्लोक )

देह त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना ! हेचि क्रीया धरावी ॥
मना चंदनाचेपरी त्वां झिजावें ।
परी अंतरीं सज्जना नीववावें ॥ १ ॥ —रामदास

( श्लोक )

धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे । भार्या गृहद्वारि जनः स्मशाने ॥
देहाश्रितायां परलोकमार्गे । कर्मानुगोगच्छति जीव एकः ॥ १ ॥

—भर्तृहरि

भावार्थः—व्रजांत धेनू धन तें निधानीं ।
स्त्री मंदिरीं बंधुजन स्मशानीं ॥
चितेंत काया, परलोकपंथें ।
जीवासवें कर्मचि एक जातें ॥ १ ॥

( श्लोक )

चल झडकरी जाऊं कीर्तिशैलीं चढून ॥
सतत नियम ज्याचा काय त्याला कठीण ? ॥
चिरसमय रहावें आपुलें नांव लोकीं ।
सकळ बहुजनातें हें मनीं आवडे कीं ॥ १ ॥

—मो. ग. लोंढे

कांहीं धांवाधांवा करीं । जोंवरि आहे मृत्यु दूरी ॥ —तुकाराम

पशूंचा सम्राट केसरी, पक्षांचा सम्राट गरूड, परंतु अखिल त्रैलोक्यावर अप्रहित सत्ता गाजवून त्याच्यावर आपलें स्वामित्व गाजविणारा सम्राटांचाहि सम्राट एक मनुष्यच आहे ! मनुष्याइतकें लोकोत्तर सामर्थ्य, अनंत ज्ञान व अप्रतिम बुद्धिकौशल्य कुठेंहि प्रत्ययास येणार नाहीं. राजा हाच विष्णूचा अंश नसून प्रत्येक मनुष्य हा त्याचाच अंश आहे—नव्हे तो स्वतःच परमेश्वर-स्वरूप आहे. जगाचा स्वामी—सम्राटांचा सम्राट—मनुष्यच आहे.

सद्गुण व दुर्गुण हीं सारि—म्हणजे सोंगटया—आहेत. मनुष्याचें दैव हा पट आहे. भावी काळाला रम्यत्व आणून विजय मिळवावयाचा असेल तर सद्गुणरूपी सोंगटया या पटावर टाकाव्यात; आणि पराजय करून घ्यावयाचा असेल तर सद्गुणांच्या उलट सोंग-

टयांचा खेळ मांडावा ! भवितव्यता ही आपल्या हातांत आहे खरी; पण सारिपाट खेळतांना आपल्या हातून उलटा खेळ न होऊं देण्याची खबरदारी घेतली पाहिजे. सद्गुणांच्या सोंगटया भवितव्यतेला उज्ज्वल कारितात. सारिपाट खेळावयाचा असेल तर दैवी संपत्ति अधिकाधिक मिळविली पाहिजे तरच मनुष्य-रूपी सम्राट यशस्वी होईल; नाहींतर पार्वतीनें ज्याप्रमाणें महा-देवाला सारिपाट खेळतांना जिंकून त्याचें सर्वस्व हरण केलें त्याप्रमाणें दुर्गुणरूपी सोंगट्या टाकून जर आपण खेळलों तर भवितव्यता सर्वस्व गमावून बसेल. भवितव्यतेचीं सर्व सूत्रें या सोंगटयांवर अवलंबून आहेत. "**सद्गुणी तो सुखी**" हें लक्षांत ठेवावें. मनुष्यदेहाला अनुलक्षून श्रीसमर्थ म्हणतात —

**नानायोनींत फिरती । ते नरदेहींच कर्मं सारिती ।**
**बंधमोक्ष दोन्ही प्राप्ती । मनुष्य देहीं ॥ १ ॥**
**बऱ्या अथवा वाइटा । सर्वत्र जात्रया येथोनि वाटा ।**
**आणि मोक्षाचा दारवंटा ( उंबरठा )। मनुष्य देह ॥ २ ॥**
**केलीं नाना शरीरें । संतोष मानिला नाहीं ईश्वरें ।**
**नरदेह देखोनी आदरें । संतोषला ॥ ३ ॥**
**येथें ब्रह्मविद्येची प्राप्ती । ब्रह्म आत्मत्वें अवलोकिती ।**
**याकरितां करुणामूर्ति । संतोषला ॥ ४ ॥**

यापेक्षां मनुष्यदेहाची प्रशंसा अधिक ती काय करावयाची ?

प्रत्येक मनुष्यानें हें मानवी स्वरूप ओळखून आपलें एक परमोच्च ध्येय ठरवावें. ध्येय ठरविल्यानंतर आत्मपरीक्षण करावें.

कारण आत्मपरीक्षण केल्याशिवाय आपलें गुणावगुण लक्षांत येणार नाहींत. तदनंतर जीवनकलहांत टिकाव धरून राहण्यास आरोग्य पाहिजे. आरोग्य हा उत्कर्षाचा पाया आहे. पुढें आरोग्य देऊन आपणांस ज्यानें मनुष्यदेह दिला त्याची उपासना केली पाहिजे. ही उपासना शास्त्रशुद्ध व्हावयास पाहिजे. एतदर्थ खरा धर्म काय आहे हें समजून घेतलें पाहिजे. ज्याला धर्माचें ज्ञान नाहीं त्याला ईश्वरोपासना करण्याची बुद्धी होणार नाहीं हें ओघानें आलेंच. पुढें संसारांत सुख पाहिजे असेल तर वेळेचें महत्त्व जाणलें पाहिजे. परंतु तें नुसतें जाणून उपयोगी नाहीं. त्याला उद्योग हा केलाच पाहिजे. उद्योग करतांना चिकाटी व चित्तैकाग्र्य पाहिजे. चित्ताची एकाग्रता होण्यास त्या त्या कार्यास एकतानता पावण्याची कला हस्तगत करून घेतली पाहिजे. एडिसन-साहेबांच्या यशाची गुरुकिल्ली हीच. ते आपल्या मनाच्या कल त्या त्या गोष्टीकडे लावतात. सर ऐझाक न्यूटननें जे शोध लावले त्याची गुरुकिल्ली ही एकाग्रताच होती. जीवित-आचार नामक ग्रंथांत म्हटलें आहे—

> "When the great Sir Isaac Newton was asked how he had been able to achieve his discoveries, he answered, 'By always intending my mind.'"
>
> —Emerson's 'Conduct of life'

उद्योग करावयाचा तो स्वावलंबनानें केला पाहिजे. दुसऱ्या-वर अवलंबून राहाणाऱ्या मनुष्याला जन्मभर रखडतच रहावें

लागतें. जो स्वावलंबन शिकला तो दैवाला दोष देत बसणार नाहीं. उलट त्याच्या मुखांतून—

Turn, fortune, turn thy wheel and lower the proud;
Turn thy wild wheel thro' sunshine, storm and cloud;
Thy wheel and thee we neither love or hate
Turn, fortune, turn thy wheel with smile or frown ;
With that wild wheel we go not up or down;
Our hoard is little, but our hearts are great.
Smile and we smile, the lords of many lands;
Frown and we smile, the lords of our own hands;
For man is man and master of his fate.

—Tennyson.

अशाप्रकारचें आनंददायक उद्गार निघतील. स्वावलंबी माणूस भवितव्य किंवा प्राक्तन पहात बसत नाहीं.

स्वावलंबनानें सुखप्राप्ति होते. पण या सुखांत दुर्जनांची संगति विघ्न करितें. तेव्हां सन्मित्र-समागम केला पाहिजे. सज्जनांच्या संगतीमुळें साहजिकच मनुष्याची प्रवृत्ति सदाचरणा-कडे लागून त्याला स्वतःचीं इंद्रियें कह्यांत ठेवावीं अशी बुद्धि

उत्पन्न होऊन तो इंद्रियदमन करूं लागतो. इंद्रियदमनामुळें शील किंवा दानत अत्युच्च बनते. हीच मोहिनीविद्या होय.

वरील सर्व सद्गुण स्वत:करितां आचरणांत आणावयाचे हें जरी खरें आहे तरी त्यांचा उपयोग लोककल्याणाकरितां करणें अधिक भूषणावह आहे. स्वदेशभक्तीशिवाय लोककल्याण कसें साधितां येणार ? ही स्वदेशभक्ती स्वार्थी असूं नये, म्हणजे तिच्याकरितां जो आपणांस उद्योग करावयाचा तो निष्काम बुद्धीनें केला पाहिजे. म्हणून निष्काम कर्माचरण करणें हीच श्रेष्ठ दर्जाची बुद्धि होय. या बुद्धीनें कर्म केल्यावर

**हें विश्वचि माझें घर । ऐशी जयाची मति स्थिर ॥**
**किंबहुना चराचर । आपणचि झाला ॥ १ ॥** —ज्ञानेश्वरी

अशा प्रकारची उच्च कल्पना डोक्यांत खेळूं लागते. या कल्पनेचें मूर्त वा परिणत स्वरूप आपणांस मानव-जातीच्या उन्नतींत दिसूं लागतें व जगाचें कल्याण व्हावें हाच हेतु निष्काम कर्माचरणांत असतो. त्यामुळें शांति, सौख्य व समाधान हीं प्राप्त होतात. शांति व सौख्य 'दिव्यदृष्टी'नेंच प्राप्त होतात. म्हणून ती दृष्टि प्राप्त करून घेतल्यानंतर आत्मज्ञान प्राप्त होतें आणि ज्यानें आत्मज्ञान संपादन केलें त्याला या जगांत अधिक कशाची आवश्यकता आहे ? सर्व जगाची धडपड याच गोष्टीकरितां चाललेली आहे. अशा प्रकारें हे प्रकरणांचे दुवे एकमेकांस जोडलेले आहेत. हे सर्व सद्गुण एकमेकांस सहाय्य-

भूत आहेत. अशी एकामागून एक सोंगटयांची मांडणी आहे. या सर्व सद्‌गुणरूपी सोंगटया ज्यानें मिळविल्या त्याला यशः, श्री, कीर्ति प्राप्त झालींच पाहिजेत. भवितव्यतेचा सारिपाट उदात्त आहे आणि तो सद्‌गुणांनींच जगाच्या पुढें येतो. सद्‌गुणांचें मोल यश हें आहे.

म्हणून प्रत्येक होतकरू व हितेच्छु तरुणानें खालील श्लोक ध्यानांत ठेवून आपली वर्तणूक ठेवावी.

( श्लोक )

**अद्यैव कुरु यच्छ्रेयो मा त्वां कालोऽत्यगादयम् ।**
**वृकीवोरणमासाद्य मृत्युरादाय गच्छति ॥ १ ॥**

—महाभारत

भावार्थः—" तुला जें काय सत्कृत्य करणें असेल तें आजच करून टाक. कारण, वृक म्हणजे लांडगा जसा मेंढीवर झडप घालतो, त्याप्रमाणें मृत्यु केव्हां येऊन अचानक तुला घेऊन जाईल हें कळणार देखील नाहीं. " **सदनं मे, वसनं मे, जाया मे, मित्रबंधुवर्गो मे ।** " ( सुश्लोकलाघव ) असें करीत न बसतां कांहींतरी सत्कृत्यें करावीं. जीवित-साफल्य सत्कृत्यानेंच होतें. अस्तु.

शेवटीं ज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दानेंच वाचकांचा निरोप घेऊन " **विश्रामं लभतामिदं हि शिथिलं ज्याबंधमस्म-**

द्रनु: " या शाकुंतलांतील श्लोकचरणानुरूप लेखणीस किंचित्काल विश्रांति देतों.

खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रति वाढो ॥
भूतां परस्परें घडो । मैत्र जीवाचें ॥ १ ॥
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ॥
जें जें वांछील तें तें लाहो । प्राणिजात ॥ २ ॥ —ज्ञानेश्वरी

सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु न कश्चिद्दुःखमाप्नुयात् ॥ १ ॥

समाप्त.

REFBK-0004082

प्रकाशकः—तु. कृ. भुस्कुटे, संपादक
' नवयुग माला ' कार्यालय ५९१, बुधवार पुणें शहर.
मुद्रकः—स. रा. सरदेसाई, बी. ए., एल्एल्. बी.
' समर्थ भारत ' छापखाना, ९४७, सदाशिव पेठ, पुणें नं. २.

# शुद्ध स्वदेशी खऱ्या जरीचा माल !

येथें आमचा स्वतःचा जरीकांठी माल, तयार करण्याचा कारखाना आहे. त्यांत पुण्याच्या खऱ्या जरीच्या पैठण्या, खण, पितांबर, शालू, जरीचे पदर वगैरे हरएक तऱ्हेचा माल तयार होत असतो. तसेच आमच्याकडे पुण्याचे सुती व रेशमी लुगडीं, बनारसचे व सुरतचे पटके, खण, शालू, शेले, जनानी व मर्दानी कद व जरीचे व रेशमी मुकटे वगैरे मालहि विक्रीस असतो. आणि पुण्याचा खरा जराहि तयार होत असतो. तरी ग्राहकांनीं एकवेळ आर्डर देऊन खात्री करावी. **सायवन्ना गुंडा**, जरीकाठी मालाचे व्यापारी,

७८५, जुना गंज, पुणें नंबर २.

---

उत्तम अभिप्राय !] सर्वांगसुंदर [ ३ रें वर्ष सुरू !

# नवयुगमाला

वर्षारंभ ] वर्ष १ लें अंक १ ते १२ / वर्ष २ रें अंक १ ते १२ [ ऑगष्ट पासून

प्रत्येकीं ] **बांधणी जाड पुठ्याची** [ १२ आ

ट. ख. सह प्रत्येकीं १ रुपयाची

मनिऑर्डर पाठवून आजच मागवा !

" नवयुगमाला " कार्यालय,

५९१ बुधवार, पुणें शहर.